...ारक वाङ्मयमाला–पुस्तक ६ वें

म. ग्रं. सं. ठाणे
...षय निबंध
...नं. ३८५

# गीता–प्रदीप

REFBK-0005242

महादेवशास्त्री दिवेकर

हिंदुसमाजोद्धारक वाङ्मयमाला-पुस्तक ६ वें.

उद्धरेदात्मनात्मानं- गीता

# गीता-प्रदीप

मराठी ग्रंथ संग्रहालय
सं. निबंध
ता. २०१२५३५
ठाणे.
नोंद १ ०३१८
REFBK-0005242

—लेखक—

महादेवशास्त्री दिवेकर

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
ना. क्र. ५२४२

शके १८५७ ] मूल्य १२ आणे [ सन १९३५

—प्रकाशक—
महादेवशास्त्री दिवेकर
मिरज.

[ या आवृत्तीचा हक्क प्रकाशकाचे स्वाधीन ]

—मुद्रक—
शंकर रामचंद्र दाते, बी. ए.
लोकसंग्रह छापखाना,
६२४ सदाशिव पेठ, पुणें शहर

# अर्पण-पत्रिका

कै. वा. तीर्थस्वरूप

## वासुदेवपंत दादा दिवेकर

यांच्या पुण्यस्मृतीस

हा ग्रंथ

पस्तिसाव्या श्राद्धतिथीच्या दिवशीं

अर्पण केला आहे.

महादेवशास्त्री दिवेकर

# प्रस्तावना

श्रीभगवंताचे कृपेनें हिंदुसमाजोद्धारक वाङ्मयमालेचें हें सहावें पुष्प जनताजनार्दनाला अर्पण करण्याचा योग येत आहे याबद्दल समाधान वाटतें.

जेव्हां वाई सोडली, तेव्हां स्थलांतराबरोबर देहांतराचाहि योग येणार अशीच समजूत होती. परंतु हवापाणी, पथ्य, उपचार व चिकाटी यांमुळें पूर्वीप्रमाणें सर्वस्वी जरी आरोग्य लाभलें नाहीं तथापि बरेंच लाभलें व त्यामुळें थोडाबहुत उद्योग होऊं लागला. मिरजेंत आल्यापासून धर्मशास्त्र-मंथन, ब्रह्मज्ञान व बुवाशाही, व गीताप्रदीप असे तीन ग्रंथ प्रकाशित करतां आले हा योग अपूर्वच होय !

प्रत्येक मनुष्य आपल्या वयाच्या ३५–४० वर्षांच्या मर्यादेंत आला म्हणजे तो परिपक्व विचारांचा बनतो व त्याचीं कांहीं विशिष्ट तत्त्वेंहि ठरतात. या दृष्टीनें लेखकाला पुनःपुन्हां विचार करून गीतेंतील जीं तत्त्वें पटलीं तीं या ग्रंथांत स्वानुभवाची जोड देऊन मांडलेलीं आहेत.

१९२७ मध्यें संग्रहणीचा विकार जडला. पुढें २।३ वर्षांनीं थोडें बरें वाटतें तोंच प्रवास, कामाची दगदग यामुळें पुन्हां याच विकारानें १९२९ ते १९३१ पर्यंत फार जोर केला होता. त्या विकारांत इहलोकची आशा सुटली अर्थात् मृत्युशय्येवर असतांना ज्या विचारांनीं समाधान दिलें ते विचार प्रस्तुत ग्रं ांत दिलेले आहेत. वाचकांनीं ग्रंथ थोडा काळजीपूर्वक वाचला म्हणजे त्याचें मर्म त्यांना समजून येईल.

गीता ही प्रत्येक घरोघरींच काय पण प्रत्येक माणसाचे हातांत आतां खेळूं लागली आहे व प्रत्येक पुस्तकांत गीतेचे निरनिराळ्या दृष्टीनें अर्थहि दिले आहेत. म्हणून प्रस्तुत ग्रंथांत सबंध गीता व गीतार्थ देणें ही गोष्ट आम्ही मुद्दाम वगळली आहे. गीता वाचून व सामान्य गीतार्थहि समजून घेऊन ज्यांना थोडक्यांत गीतेंतील विशेष महत्त्वाचा, प्रपंचोपयोगी असा भाग समजून घ्यावयाचा असेल त्यांच्या करितांच हा प्रयत्न आहे. तो कितपत सफल झाला आहे, हें वाचकच ठरवतील.

प्रस्तुत ग्रंथांत गीताप्रदीपाच्या बारा प्रकरणांशिवाय आणखी दोन निबंध घातले आहेत. त्यांतील पहिला केसरी पत्रांत व दुसरा प्राविण्य मासिकांत प्रसिद्ध झालेला आहे. हे दोन्ही लेखहि मुख्य ग्रंथाला पोषक असेच आहेत.

गीता–प्रदीप ही लेखमाला यापूर्वीं किर्लोस्कर मासिकांत क्रमानें प्रसिद्ध झालेली आहे. त्या लेखमालेंत पुष्कळ ठिकाणीं कमी अधिक करून हा ग्रंथ तयार केला आहे. या लेखमालेचा हक्क वास्तविक किर्लोस्कर मासिकाकडेच आहे. परंतु त्यांना ग्रंथरूपानें ही लेखमाला छापण्याची सवड न झाल्यामुळें, आम्ही विनंति करतांच मासिकाचे संपादक श्री. शंकरराव किर्लोस्कर यांनीं मोठ्या आनंदानें ही लेखमाला छापण्याची परवानगी कांहींहि मोबदला न मागतां व कसलीहि अट न घालतां दिली ! तात्पर्य ब्रह्मज्ञान व बुवाशाही या ग्रंथाप्रमाणें गीताप्रदीप या ग्रंथालाहि किर्लोस्कर मासिक, किर्लोस्कर कारखान्याचे मूळ जनक श्रीमंत लक्ष्मणरावजी किर्लोस्कर यांचें आर्थिक दृष्ट्या जरी नसलें तरी इतर सर्व दृष्टींनीं बरेंच साहाय्य झालेलें आहे. याबद्दल या उभयतांचे आम्ही आभारी आहोंत.

शेवटीं या ग्रंथास ज्या अनेकांचें अनेक प्रकारचें साह्य परमात्म्याचे कृपेनें झालें त्या परमात्म्यास वंदन करून हा प्रस्ताव पुरा करतों.

बलिप्रतिपदा
शके १८५७, मिरज

महादेवशास्त्री दिवेकर

नोंद नं. ........

# अनुक्रमणिका


| प्रकरण | नांव | पृष्ठें |
|---|---|---|
| १ लें : | विषय प्रवेश व अमरत्व .... .... | १–८ |
| २ रें : | मनुष्य कधींहि मरत नाहीं ! .... .... | ९–१८ |
| ३ रें : | मनुष्याचे दृश्य पुनर्जन्म .... .... | १९–२६ |
| ४ थें : | स्वकर्तव्य हाच यज्ञ व हाच धर्म .... .... | २६–३५ |
| ५ वें : | स्वकर्तव्य–कुसुमानेंच ईश्वराचें पूजन करा.... | ३६–४५ |
| ६ वें : | अनासक्तीनें कर्म करा व ईश्वराचें अनुकरण करा .... .... | ४५–५७ |
| ७ वें : | निमित्तमात्रं भव सव्यसाचिन् .... .... | ५८–६४ |
| ८ वें : | निमित्तमात्राची यथार्थ योग्यता .... .... | ६४–७१ |
| ९ वें : | निमित्तमात्र ही भावना व सांसारिक कर्में.... | ७२-७९ |
| १० वें : | ज्ञानाचें सामर्थ्य .... .... .... .... | ७९–८७ |
| ११ वें : | ईश्वर कसा आहे ? .... .... | ८७–१०० |
| १२ वें : | चैतन्याचा ध्यास म्हणजेच हें जग .... .... | १०१–१०६ |
| परिशिष्ट १ लें : | ये यथा मां प्रपद्यंते .... .... | १०६–११४ |
| परिशिष्ट २ रें : | नव्या स्मृतीची मूलभूत तत्त्वें .... .... | ११४–१२० |

नि ५८६४
ग्रं. संग्रहालय
नोंद नं. ५३१५
ग्रंथ संग्रहालय
५२४२

# गीता-प्रदीप

## प्रकरण पहिलें
## विषयप्रवेश व अमरत्व

जगांत प्रत्येकाला प्रकाश पाहिजे असतो. अंधार, काळोख हा कुणालाच नको असतो. प्रकाशामध्यें तेज आहे, कर्तृत्व आहे, उत्साह आहे. तात्पर्य, चमकण्यांत सर्व कांहीं आहे. सूर्य, अग्नि, चंद्र, तारका हीं सर्व प्रकाशामुळेंच वंद्य आहेत. 'द्योतनात् देवा:' म्हणजे प्रकाशतात म्हणनच देव म्हणतात. सर्व वंद्य विभूति तेजामुळें जगाला आपल्याकडे आर्कांषत असतात.

गीता हा जागतिक वाङमय-क्षितिजावर तळपणारा सूर्य आहे. त्याचा उदय प्रत्यक्ष श्री भगवंताच्या प्रतिभेंतून झालेला आहे. गीता-सूर्याच्या उपदेशकिरणांच्या प्रभावानें सर्व जगाला आजवर स्फूर्ति मिळाली आहे व पुढेंहि मिळणार!

गीता हा ग्रंथ लहान आहे, पुस्तकरूपानें चिरपरिचित व अल्प किमतींत मिळणारा आहे, म्हणून त्याची योग्यता नीट समजणार नाहीं. पण महात्मा गांधी आपल्या अनासक्ति योगाच्या प्रस्तावनेंत "असा ग्रंथ जगांत नाहीं" असें म्हणतात. 'गीता हा संस्कृत वाङमयामध्यें कोहिनूर हिऱ्यासारखा आहे' असें लो० टिळक म्हणतात. श्रीवेदव्यासांनीं 'पांचवा वेद' म्हणून एक लक्ष महाभारत ग्रंथ लिहिला. त्या ग्रंथाला 'जय' असें नांव त्यांनींच दिलें आहे. हा ग्रंथ विजिगीषूनें ऐकावा असें ते म्हणतात. त्या जय ग्रंथाचें सार म्हणजे गीता होय. तिची थोरवी किती बरें वर्णन करावी ?

दशोपनिषदांचें मंथन करून बाहेर काढलेलें नवनीत म्हणजे गीता होय. अनेक कर्त्या पुरुषांच्या उलाढालींचा इतिहास देणारा जो महाभारत ग्रंथ त्याचें तात्त्विक सार म्हणजे गीता होय. श्री ज्ञानेश्वरांच्या भाषेंत बोलावयाचें म्हणजे गीता ही प्रत्यक्ष 'भगवंतांची वाङ्मयमूर्तीच' होय.

अशा सर्वश्रेष्ठ ग्रंथांत काय असावें असें वाटतें? गीता ग्रंथ म्हणजे योगेश्वर कृष्ण व धनुर्धर पार्थ यांचा संवाद होय; श्री नारायण व नरोत्तम नर या महान् कर्त्या, पराक्रमी व मुत्सद्दी पुरुषांमधील संभाषण होय. सर्वज्ञ, महापराक्रमी, यशस्वी व परमपूज्य अशा एका क्षत्रियानें दुसऱ्या एका क्षत्रियास युद्धास प्रवृत्त करण्याकरितां गीता सांगितलेली आहे. एका कर्मयोग्यानें दुसऱ्या कर्मयोग्यास, एका विजिगीषूनें दुसऱ्या विजिगीषूस युद्धाच्या ऐन प्रसंगीं गीता उपदेशिली असल्यामुळें ती पुरुषार्थी माणसाकरितां आहे; हें सिद्धच आहे. जगच्चक्र चालावें, राष्ट्रामध्यें श्री, नीति, धर्म, विजय, उत्कर्ष व उन्नति हीं अखंड नांदावीं, प्रत्येक मनुष्यानें पुरुषार्थी व्हावें, म्हणूनच गीता सांगितलेली आहे.

गीता हा ग्रंथ अवघ्या सातशें श्लोकांचा आहे. ग्रंथ अत्यंत सुटसुटीत, सुबोध, सोप्या भाषेंत प्रश्नोत्तर रूपानें सांगितलेला असा असला तरी, त्यांतील प्रमेयरत्नें इतकीं गूढ व खोल आहेत कीं त्यांनीं मोठमोठ्या बुद्धिमंतांना वेड लावून सोडलें आहे. सातशें श्लोकांमध्यें एकच सिद्धांत, एकच तत्त्व, सांगितलेलें असलें तरी व्यक्ति तितक्या प्रकृति या न्यायानें गीतेवर आजपर्यंत अनेकांनीं अनेक भाष्यें व टीका लिहून विविध सिद्धांत मांडलेले आहेत. भगवान् गीतेंत काय सांगतात हें पाहण्याची जिज्ञासा आजवर अनेकांना झाली आहे. म्हणूनच कोणी गीतेवर भाष्यें लिहितो, कोणी भावार्थ सांगूं इच्छितो तर कोणी यथार्थ दाखविण्याचा प्रयत्न करतो!! महाराष्ट्रियांना आद्य शंकराचार्यांचें भाष्य, ज्ञानेश्वरांची भावार्थदीपिका, वामन पंडितांची यथार्थ-दीपिका व लोकमान्यांचें गीतारहस्य हे ग्रंथ गीतार्थाकरितां अधिकृत असलेले माहितच आहेत. याशिवाय अनेक प्राचीन अर्वाचीन विद्वानांनीं गीतेवर परिश्रम केलेले असून प्रत्येक जण आपापल्या बुद्धीप्रमाणें या गीतारत्नाकरांत अवगाहन करीत आहे. गीता हा विषयच असा आहे कीं, तो आजवर कुणीहि कितीहि वेळ सांगितला असला, तथापि तो संपला असा मळींच नाहीं.

सूर्य दररोज उगवणारा जरी असला तरी तो जसा शिळा होत नाहीं, किंवा नित्य वाहणारी गंगा जशी पारोशी म्हणतां येत नाहीं त्याचप्रमाणें गीता-गंगाहि अखंड पाप व ताप फेडीत, दैन्य हरण करीत व खळखळा वाहात असल्यामुळें, ती सदैव आल्हादकारक आहे.

प्रस्तुत प्रदीपांत गीतेचें सार अगदीं थोडक्यांत, स्पष्ट भाषेंत व अगदीं प्राकृत माणसालाहि समजेल असें सांगण्याचा प्रयत्न केलेला आहे. श्रीमत् आद्य शंकराचार्यांचें भाष्य किंवा इतर गीतेवरील संस्कृत टीका या विद्वान् माणसांकरतां आहेत हें सांगावयास नको. ज्ञानेश्वरीसारखा प्रासादिक, अभिजात, साहित्यसुवर्णसंपन्न असा ग्रंथ मराठी भाषेंत नाहीं. नवनव स्फूर्ति देणारा, श्रोत्यांच्या अंतःकरणापर्यंत उपदेश पोंचवणारा असा हा ग्रंथ असला तरी, जुन्या प्रौढ सारस्वतांत तो निर्माण झाला असल्यामुळें प्राकृतांना दुर्बोधच आहे. वामन पंडितांची 'यथार्थ दीपिका' हा ग्रंथ विस्तृत असून पांडित्यप्रचुर आहे. लोकमान्यांचा भगवद्गीतारहस्य हा ग्रंथ जरी शुद्ध मराठींत असला तथापि तो विद्वानांनाच सुबोध आहे. महात्मा गांधींचा अनासक्ति योग हा अति संक्षिप्तपणामळें सामान्य वाचकांना दुर्बोधच आहे. अनेक बुद्धिमंतांच्य मताप्रमाणें जो गीताबोध आहे, तो अत्यंत सुबोध तऱ्हेनें लोकांना कळा-वयास पाहिजे. तो या प्रदीपाच्या साह्यानें नवी भर घालून अधिक स्पष्ट करण्याचा प्रस्तुत लेखकाचा यत्न आहे.

जगामध्यें अत्यंत सत्त्वगुणसंपन्न अशीं माणसें फार थोडीं असतात. रज–तमोगुणी विशेषतः रजोगुणी, व्यावहारिक, प्रापंचिक, पोटापाण्याच्या मागें लागलेलीं अशींच माणसें फार असतात. अशा प्रत्येक मनुष्यावर जगांतील अनेक व्यवहार करीत असतांना व पुरुषार्थ साध्य करीत असतांना कर्तव्यमूढ होण्याचे प्रसंग येत असतात. त्यांतून आजचा जीवनकलह तर अति-शय विकट व गुंतागुंतीचा झालेला आहे. जगाशीं आलेला संबंध, परकीय राज्ययंत्र, परक्या समाजांचें आक्रमण, आधिभौतिक शास्त्रांची प्रगति, जगांत उत्पन्न होणाऱ्या नव–विचारांचें आंदोलन, यामुळें हिंदुस्थानांतील मनुष्य तर प्रतिक्षणीं गांगरून जात आहे. धार्मिक, सामाजिक बाबतींत तर आजच्या माणसाला ठेवूं काय व सोडूं काय असें झालें आहे. म्हणजे अर्जुना-प्रमाणें आजहि प्रत्येक मनुष्य हृदयदुर्बल, धर्मसंमूढ व किंकर्तव्यतामूढ असा

होत आहे. भगवंतांनीं अर्जुनाला निमित्त करून सर्व जगाला गीता सांगितली असें श्रीशंकराचार्य म्हणतात. ज्या गीतेमुळें अर्जुनाला स्फूर्ति मिळाली, तो कर्तव्यतत्पर झाला व शेवटीं "करिष्ये वचनं तव" असें त्यानें भगवंताला वचन दिलें, त्याच गीतेमुळें वाचकहो, तुम्हांपैकीं प्रत्येकाला स्फूर्ति मिळणार नाहीं काय ? मार्ग दिसणार नाहीं काय ? वेळोवेळीं विषण्ण होणाऱ्या मनाला त्वरित तुष्टी देणारें गीता हें सात्त्विक अन्न आहे. मी कोण, माझा जगाशीं संबंध काय, जगांतले व्यवहार मी कां करावेत, ते कसे करावेत, जग हें कोणत्या शक्तीच्या प्रेरणेनें चाललेलें आहे, त्या शक्तीचें स्वरूप काय, माझें स्वरूप काय, इत्यादि अनेक प्रश्न प्रत्येकापुढें येत असतात. या सर्वांचीं उत्तरें गीतेनें फार स्पष्ट व तर्कशुद्ध अशीं दिलेलीं आहेत. प्रत्येक मनुष्यानें अनासक्ति, निरहंकार वृत्ति, धैर्य व उत्साह यांनीं युक्त होऊन प्राप्त परिस्थितींत अखंड कर्म करीत राहावें, असाच गीतेचा सिद्धांत आहे. जगाचें धारणपोषण याच तत्त्वानें होत आहे.

गीतेंतील अध्यायांच्या क्रमानें मुख्य मुख्य विषयांचा आतां विचार करूं:—

गीतेच्या पहिल्या अध्यायांत मुख्य विषयाचा उपक्रम आहे. कौरवांशीं सलोखा करण्याकरितां धर्मराजानें जंगजंग पछाडले. निदान पांच गांवें तरी द्या अशी मागणी केली. श्रीकृष्णाकडून शिष्टाई करविली. पण युद्धाशिवाय सुईच्या अग्रावरील मातीहि देणार नाहीं असा खडखडीत जबाब दुर्योधनानें दिल्यामुळें युद्ध करणें प्राप्त झालें. युद्ध न व्हावें, कुलक्षय न व्हावा, स्वजनांचें कल्याण व्हावें, म्हणून पांडवांनीं कांहीं थोडाथोडका यत्न केला नाहीं. शेवटीं युद्ध करावयाचें ठरलें, भगवंतांनीं सारथ्य पत्करलें व अर्जुन समरांगणावर उभा ठाकला. युद्धार्थ उभ्या राहिलेल्या अर्जुनानें मरण-मारणाची दीक्षा घेतलेली होती. बोलूनचालून तो युद्धाचा प्रसंग ! प्राण देणें किंवा प्राण घेणें, या शिवाय तेथें दुसरा विषयच नव्हता. युद्धाला उभें राहण्यापूर्वीं अर्जुनानें जरी पुष्कळ विचार केला होता, तथापि तें युद्धाचें भीषण स्वरूप पाहिल्याबरोबर अर्जुन गांगरून गेला. आप्त, इष्ट, बंधु, गुरु, सासरे, काके, मामे, पुत्रपौत्र, हे सर्व मृत्यूकरितां सज्ज झालेले पाहून कोणाला बरें मोह उत्पन्न होणार नाहीं ? हें युद्ध आहे, ह्यांत हे सर्व मरणार, अठरा अक्षौहिणी सैन्य मृत्यूच्या जबड्यांत चिरडणार, पाप लागणार, संकर होणार,

नि. ५९५ नोंद नं.

कुलधर्म उत्सन्न होणार, अधर्म वाढणार अशा एक ना दोन कल्पनांनीं तो विव्हल झाला. युद्धाच्या वेळचा तो दारुण प्रसंगच असा होता कीं त्यामळें महान् धनुर्धर अशा अर्जुनाच्या ठिकाणीं कारुण्य उत्पन्न झालें, मोह उत्पन्न झाला व युद्ध करावें कां भीक मागावी ह्या विचारानें त्याची वृत्ति धर्मसंमूढ झाली. मी मारणारा व हे मरणारे ह्या कल्पनेनें त्याला पछाडलें व तो शोक करूं लागला. दुर्योधनादिकांना मारण्यांत काय हित आहे ? स्वजनांना मारून सुखी होणें कल्याणप्रद आहे काय ? कौरवांचा वध करून जगण्यांत व राज्य भोगण्यांत काय अर्थ आहे ? इत्यादि अनेक प्रश्न त्याच्या पुढें आले व तो घाबरून गेला. भगवंतांना शरण जाऊन, इंद्रियांना पिळून काढणाऱ्या या शोकाचा परिहार कसा करावा असें तो विचारूं लागला. अर्जुनाची भूमिका भगवंतांनीं लक्षांत घेतली व पहिल्या धडाक्यासरशी मृत्यकल्पनेचें उच्चाटण केलें. भगवंतांच्या उपदेशाला प्रारंभ दुसऱ्या अध्यायांतील "अशोच्यान् अन्वशोचस्त्वं" या श्लोकापासून झाला आहे व प्रारंभा-बरोबरच मरण–मारणाची भीति किती निराधार आहे, हें दाखविलें आहे.

गीतेच्या उपदेशाचा प्रारंभ कर्मापासून नाहीं, भक्ति अगर उपासना येथून नाहीं तर एकदम आत्म्याच्या अमरत्वालाच म्हणजे मळालाच श्री-कृष्णांनीं स्पर्श केलेला आहे.

गीतेचा पहिला सिद्धांत हा आहे कीं मनुष्य कधींहि मरत नाहीं. दर-रोज जन्ममृत्यूच्या गोष्टी बोलणाऱ्यांना हा सिद्धांत कसा पटणार ? तो खरा आहे असें तरी कसें वाटणार ? कारण जगाचा व्यवहारच विचित्र तऱ्हेनें चालला आहे. म्हणून त्याचें थोडें निरीक्षण करणें क्रमप्राप्त आहे.

ह्या जगावर अनेकांचीं साम्राज्यें चालत आलेलीं आहेत, परंतु सर्व सम्राटांवर मृत्यु–सम्राटाची सत्ता त्रिकालाबाधित चालत आलेली आहे. म्हणूनच या लोकास मृत्युलोक असें म्हणतात. ह्या मृत्युलोकांत राहाणारे सर्व प्राणी मर्त्य आहेत, पण जगाचा व्यवहार कसा विचित्र आहे पाहा !

प्रत्येक जीव हा मृत्युलोकांत राहून मृत्यूशीं वैर करीत असतो. जळांत राहून माशाशीं वैर करणाऱ्या माशाप्रमाणें जगाचा व्यवहार चालला आहे. जगांत प्रत्येकाला जर कोणी मोठा शत्रु वाटत असेल तर तो मृत्यु हा होय; अशी पक्की समजूत आहे. मृत्यूसारखी हानि नाहीं व मृत्यसारखा शत्रु नाहीं

अशा म्हणीहि रूढ आहेत. "नास्ति मृत्युसमः शत्रुः" ( रामायण ) असें म्हणून अमरत्वाची इच्छा धरून अनेक असुरांनीं तपश्चर्या केल्या. हिरण्याक्ष, हिरण्यकश्यपु, रावण, कुंभकर्ण व शिशुपाल वक्रदंतादि अमर होऊं इच्छिणारे सुद्धां मृत्युवश झाले. मृत्युलोकांत देहदृष्टीनें अमरत्वाची भाषा बोलणें म्हणजे 'वदतोव्याघात' होय.

हा लोक जर मृत्यूचा, ह्या जगांत सत्ता जर त्याची, तर त्याच्या तावडींतून कोण बरें सुटेल? मृत्यूच्या राज्यांत लोकशाही नाहीं व लोकतंत्रता नाहीं; प्रजेला अधिकार नाहीं व प्रजेला मतहि नाहीं. उद्यां सर्व जगांत मोठ्या क्रांत्या होऊन सर्व राज्यांची सत्ता जरी प्रजेला मिळाली तरी मृत्यूची सत्ता प्रजेकडे कधींहि येणार नाहीं. मृत्यूच्या राज्यांत प्रजामतानुवर्तित्व नाहीं, तेथें बहुमताला मान नाहीं, कांहीं नाहीं. लोकांची इच्छा असो वा नसो; मृत्यूचा कारभार हा एकतंत्री एकमुखी व एकखांबी चालणार!

हें सर्व प्रत्येकाला ज्ञात असतां प्रत्येक मनुष्य मृत्यु म्हटला कीं शोकमोहानें ग्रस्त होतो हें महदाश्चर्य नव्हे काय?

ह्या जगांत अत्यंत तापदायक, त्रासदायक, दुःखदायक व खेदकारक अशी जर कोणती कल्पना असेल तर ती मृत्युकल्पना होय. मृत्यूचा प्रभाव क्षणोक्षणीं दिसतो, दररोज कर्णपथावर तो आदळतो व प्रत्यक्ष प्रत्ययालाहि येतो. तथापि त्याविषयीं दुःखशोकादि भावना कधींहि कमी होत नाहींत. "अतिपरिचयात् अवज्ञा" ही म्हण जगांतील सर्व व्यवहाराला लागू आहे. अतिपरिचय झाला म्हणजे मोठा कुबेर, ज्ञाता व सत्ताधीशसुद्धां अवमानित होतो; परंतु ह्या मृत्युकल्पनेची अवज्ञा म्हणजे मृत्यूविषयीं बेपर्वा जगांत मुळींच आढळत नाहीं. उत्पत्ति-स्थिति, येणें-जाणें व जन्म-मरण हीं सर्व नित्याचीं असतां त्याबद्दल मनुष्यमात्रांत तिळमात्र बेपर्वा दिसत नाहीं. "अतिपरिचयादवज्ञा" या न्यायाला हा मोठा अपवाद म्हटला पाहिजे.

प्राणिमात्राची धडपड सुखाकरितां आहे, असें शास्त्र म्हणतें. चतुर्विध पुरुषार्थमूलक मानवी व्यवहार व्हावेत असा शास्त्राचा उद्देश आहे. पण जगांतील व्यवहाराचें निरीक्षण केल्यास तो उद्देश फारसा सफल होत आहे असें वाटत नाहीं. मृत्यु हा माझा मित्र, तें एक माझ्या देहाचें इष्ट स्वरूप, ती मला एक परमेश्वराची देणगी, ह्या कल्पनेनें कर्तव्य करणारा

मनुष्य हजारांत असेल कीं नाहीं, याची शंकाच आहे व तसा असेल तर तो धन्य होय. पण जगांत शेंकडा शंभर माणसांचे व्यवहार मृत्यूची भीति वाळगून चालले आहेत असें म्हणण्याचा प्रसंग येतो. मृत्यूविषयीं बेपर्वा राहून अखंड कर्तव्य करीत राहणें हा खरा मार्ग होय. पण सारखी मृत्यूची भीति वाळगून आपले व्यवहार करीत राहणें हाच कुमार्ग जग आचरीत आहे. खूप पैसे मिळवा, चांगलीं घरें वांधा, चांगल्या हवेंत राहा, उत्तम पाणी प्या, स्थलांतर करा, औषधें घ्या, युक्ताहार–विहार करा, आरोग्याचे नियम पाळा, इत्यादि इत्यादि प्रकार जगांत चालू आहेत! हें सर्व कशाकरितां ? तर म्हणे मृत्यु दूर लोटण्याकरितां किंवा कांहीं काल तो चुकविण्याकरितां, असें उत्तर देतां येईल. मृत्युरूपी खेळाडूनें जीविताची पाटी धरून कोंडी केली आहे. मनुष्यप्राणी मार न खातां ती कोंडी फोडण्याकरितां सारखा खटाटोप करीत आहे व हुलकावण्या दाखवीत आहे. परंतु त्याचा रट्टा पाठींत बसणार व कोंडी फोडतां फोडतां शेवटीं आपला डाव संपणार हें त्याच्या ध्यानीं येत नाहीं.

ह्या लोकाला मृत्युलोक म्हणतात. कारण या लोकाचा राजा मृत्यु हा आहे. इतर राजांपेक्षां व सम्राटांपेक्षां मृत्युराजाचा स्वभाव फारच उदार आहे. मेघराजा वर्षाव करूं लागला म्हणजे सकस–निकस, उत्तम जमीन, माळ जमीन, उकीरडा अगर गांव असला तरी कसलाहि भेदाभेद न करितां ज्याप्रमाणें सम दृष्टीनें व उदारपणानें तो वर्षाव करितो, तशी स्थिति मृत्यु राजाची आहे. हा अत्यंत समदृष्टी आहे व न्यायी आहे म्हणून कोणाचीहि भीड, मुर्वत तो ठेवीत नाहीं. तो कृपाळू व उदार असल्यामुळें सर्वांना आपल्या स्वरूपांत विलीन करून टाकितो !

कांहीं राजांची बुद्धि स्वार्थी असते. त्यांचा तोंडपुजेपणा केला किंवा त्यांची खुषमस्करी केली म्हणजे ते प्रसन्न होतात. आपमतलबी राजे आपला हेतु साधण्याकरितां अन्याय, पक्षपात, जुलूम, जबरदस्ती वगैरे सर्व बरेवाईट प्रकार करितात, पण मृत्युराजा इतका कृपाळु आहे कीं त्याची कोणी निंदा केली, स्तुति केली तरी तो सर्वांवर सारखी कृपा करितो. मूल खेळूं लागलें कीं देहभान विसरतें, पण त्याच्या आईला त्याचें स्मरण असतें व ती त्याला खेळतां खेळतां घरीं आणून जेवूं घालते. मृत्युसुद्धां आई इतकाच कृपाळु आहे. त्याची आराधना किंवा उपासना कोणी करो किंवा न करो, त्याला कोणी

हांक मारो वा न मारो, त्याचें स्मरण कोणीं ठेवो वा न ठेवो, पण हा मात्र प्रत्येकाचें स्मरण ठेवून पक्षपात न करितां सर्वांवर सारखा प्रसाद करितो! स्थावरजंगम, स्थिरचर, सजीवनिर्जीव, सावधअसावध, धार्मिकअधार्मिक, रोगीअरोगी, साक्षरनिरक्षर, ज्येष्ठकनिष्ठ, बालवृद्ध असा कोणताहि भेदाभेद मृत्यूला दिसत नाहीं. फार काय पण तो प्रतापी, पराक्रमी, आढ्य, हयपती, नरपती, भूपती, चक्रवर्ती इत्यादिकांचीसुद्धां तमा न धरितां त्यांना स्वस्वरूपाप्रत नेतो. जगांत अनेक दुरात्मे, पापात्मे, व्याधिग्रस्त, संकटग्रस्त, दारिद्र्यग्रस्त लोक ह्या जगाला कंटाळलेले असतात व त्याची मार्गप्रतीक्षा करीत असतात. कित्येक वृद्ध तर मृत्यूकडे आतुरतेनें पाहात असतात. अशा सर्वांवर मृत्युराजा अनुग्रह करितो ही खरोखर ईश्वराचीच कृपा नव्हे काय ?

पण ज्ञानेश्वर महाराजांनीं गीता अध्याय ९ श्लोक ३३ वर टीका करितांना मृत्युलोकांतील उफराट्या रीतीचें जें वहारीचें वर्णन केलें आहे तें यथार्थ आहे, असें चाललेल्या व्यवहारावरून सिद्ध होतें. मृत्यु हा शब्द वावडा, मृत्युयोग हा कुयोग, दक्षिण दिशा ही मृत्युदिशा म्हणन त्याज्य, इतक्या अशुभ कल्पना करून मनुष्य मृत्यूला दूर ढकलीत आहे. 'तूं मर, मरून जा, मेल्यांनो तुमचीं तोंडें जळोत' हे शब्दप्रयोगहि सहन होत नाहींत ! ज्ञानेश्वर म्हणतात:— अगा मर हा बोल न साहाति। आणि मेलिया तरी रडती ॥ अ.९-५१३ म्हणजे मर, अशा प्रकारचा शब्दप्रयोग ऐकला कीं नेत्र आरक्त होतात, भृकुट्या वर चढतात व मस्तक भडकून जातें. पण मेल्यानंतर सर्व रडतच बसतात. मृत्यूविषयीं सर्व जग तिटकाऱ्यानें व असहकार वृत्तीनें वागत असलें तथापि मेल्यानंतर रडण्याचा क्रम कोणीच सोडीत नाहीं.

मृत्यूनंतर रडणें ही धर्मशास्त्रदृष्ट्या चकी आहे. 'अतो न रोदितव्यं हि क्रिया: कार्या: स्वशक्तित:।' (या. व. स्मृ. अ. ३ श्लो. ११) म्हणून रडूं नये तर मृताच्या राहिलेल्या क्रिया यथाशक्ति पुढें चालू ठेवाव्या असें याज्ञवल्क्य स्मृतीमध्यें म्हटलेलें आहे. पण जगाचा व्यवहार मात्र शास्त्रविरुद्ध चालला आहे. मेल्याचा शोक व मृत्यु आला असें समजतांच शोक करण्याचे व्यवहार सर्वत्र चालू आहेत. अर्जुन तरी ह्या क्रमाला कसा अपवाद ठरणार ?

## प्रकरण दुसरें

# मनुष्य कधींहि मरत नाहीं !

वरील शीर्षक वाचून आश्चर्य वाटेल ! पण भगवंतांनीं अर्जुनाला प्रथम अमरत्वाचेंच तत्त्व सांगितलें. अर्जुन जरी पंडितांच्या मोठ्या गोष्टी बोलणारा होता, संवादकुशल होता, तथापि त्यानें अशोच्यांचा शोक सुरू केला. श्रीकृष्ण म्हणाले, "अरे असा वेड्यासारखा शोक काय करतोस ? शोक कसला, कुणी व कशाकरतां करावयाचा ? शहाणे लोक मेलेल्या व जगलेल्या लोकांचा शोक करीत नाहींत. म्हणजे त्यांना मृत अथवा सजीव देहाबद्दल कांहीं वाटत नाहीं. अरे अर्जुना, तूं, मी व हे राजे कधीं नव्हतों असें नाहीं व यापुढें असणार नाहीं असेंहि नाहीं. तुम्ही आम्ही यापूर्वी होतों, आतांहि आहोंत व पुढेंहि असणार. जगांत कोणी मरत नाहीं, कोणी मारीत नाहीं जो तो निरनिराळ्या रूपांतरानें, अवस्थांतरानें व नामांतरानें सदैव जिवंत असतो. तेव्हां वेड्यासारखा शोक न करतां शहाण्याप्रमाणें विवेक धारण कर." *

आत्म्याचें अमरत्व आणि मृत्युसंबंधाचा सिद्धांत भगवंतांनीं अध्याय २ श्लोक ११ पासून श्लोक ३० पर्यंत फार सुंदर सांगितलेला आहे. तथापि त्यांतीलहि साधे, सुबोध व दृष्टांतयुक्त असे श्लोक महत्त्वाचे सिद्धांत प्रतिपादीत आहेत.

देहिनोऽस्मिन् यथा देहे कौमारं यौवनं जरा।
तथा देहांतरप्राप्तिर्धीरस्तत्र न मुह्यति ॥ १३॥
वासांसि जीर्णानि यथा विहाय। नवानि गृण्हाति नरोऽपराणि॥
तथा शरीराणि विहाय जीर्णान्यन्यानि संयाति नवानि देही॥ २२॥

---

* टीपः—परमेश्वर व मनुष्य ह्यांत फरक तो हाच आहे. एक सर्वज्ञ व दुसरा अल्पज्ञ आहे. एक सर्वशक्तिमान आहे व दुसरा अल्पशक्तिमान आहे. सर्वज्ञ ईश्वराला आपल्या भूत, भविष्य जन्मकर्माचें ज्ञान यथार्थ असतें म्हणूनच पुढें भगवंतांनीं चौथ्या अध्यायांत 'माझे व तुझे पुष्कळ जन्म होऊन गेले, ते सर्व मला माहित आहेत, पण तुला ते माहित नाहींत' असें म्हटलें आहे. त्याचप्रमाणें श्लोक ९ मध्यें 'माझें दिव्य असें कर्म जो खरेंखुरें जाणतो त्याला देहत्यागानंतर पुनर्जन्म न येतां तो, मला येऊन मिळतो' असें सांगितलें आहे.

अर्थ:—देहधारीला ज्याप्रमाणें या ठिकाणीं कौमार, यौवन व जरा यांची प्राप्ति होते, त्याचप्रमाणें दुसऱ्या देहाची सुद्धां प्राप्ति होत असते. यासंबंधीं बुद्धिवान पुरुष मोह पावत नाहीं. ज्याप्रमाणें मनुष्य जुनीं वस्त्रें टाकून देऊन नवीं धारण करितो, त्याप्रमाणें देहधारी जीर्ण होऊन गेलेल्या देहाला सोडून दुसऱ्या नव्या देहाला प्राप्त करून घेतो.

या देहाचीं कौमार, यौवन व जरा अशीं तीन स्वरूपें आहेत व मृत्यु हें त्याचें चौथें स्वरूप आहे. ज्याचें जें स्वरूप असतें, तें त्याच्याहून म्हणजे स्वरूपीहून भिन्न करितां येत नाहीं. अवयव व अवयवी, वृक्ष व शाखा प्रमाणें स्वरूपी व स्वरूप यांचा संबंध आहे. देहाचें स्वरूप जर कौमारादि आहे, त्या स्वरूपांत असतांना व जातांना जर आपणांस शोक होत नाहीं तर देहाचें जें चौथें स्वरूप मृत्यु, (देहांतर) त्यांत जातांना मनुष्यानें शोक कां करावा ? लहान मुलांना मोठें व्हावेंसें वाटतें, वृद्धांना तरुणाच्या उद्दाम वृत्तींचा हेवा वाटतो, तरुणांना पोक्तपणाची इच्छा असते, म्हणजे देहाच्या चार स्वरूपांपैकीं बाल्य, तारुण्य, वार्धक्य यांची इच्छा प्रत्येक मनुष्य जशी आनंदानें करितो, तशीच मृत्यूची अपेक्षा त्यानें कां न करावी ?

एकाच देहाच्या आश्रयानें कौमार, यौवन व जरा ह्यांचा अनुभव मनुष्य घेतो. पण त्याच देहाच्या चौथ्या स्वरूपाचा अनुभव मनुष्याला नको असतो ! बाल्यांतून तारुण्यांत आपण कोणत्या दिवशीं जातो हें मनुष्याला सांगतां येत नाहीं. तारुण्यांतून वार्धक्यांत आपण कोणच्या वर्षीं जाऊं शकूं हें कोणीहि सांगूं शकत नाही. त्याचप्रमाणें आपण कधीं मरणार हें तरी कोण सांगणार ? मनुष्याला नेहमी एकाच अवस्थेंत राहणें कंटाळवाणें वाटतें. अवस्थांतर झालें म्हणजे आनंद वाटतो. देहाच्या तीन अवस्थांतरामध्यें आनंद पण चतुर्थावस्था जी मृत्यु ती मात्र कोणालाच नको !

मनुष्य अमुक एका दिवशीं कौमारांतून यौवनांत जातो काय ? नाहीं. दररोज त्याचें अवस्थांतर चालूंच आहे. रोजच्या रोज कौमारावस्थेंतील एक पायरी ओलांडून तो यौवनावस्थेंत प्रवेश करीत असतो व पुढें यौवनावस्थेंतून जरेंतही हळहळू प्रवेश होत असतो. तात्पर्य, मनुष्याचें अवस्थांतर दररोज चालू आहे. तिकडे त्याचें लक्ष नसल्यामुळें त्याला त्या अवस्थांतराचें कांहीं वाटत नाहीं.

मृत्यु ही अवस्थाहि अशीच आनंददायक आहे. मृत्यु हा एके दिवशीं

स्थळ प्रत
सं. नि. नं. ५५५
ता. ...............



येतो असें नाहीं. मृत्यु हा सदैव आपल्या बरोबर आहे. भागवतांत म्हटलें आहे कीं मृत्यु हा शरीराबरोबरच जन्माला आलेला आहे.

मृत्युर्देहवतां वीर देहेन सह जायते ।–अ. १ श्लो. ३८

अद्य वाऽब्दशतांते वा मृत्युर्वै प्राणिनां ध्रुवः ।–भा. स्कं. १०

उदयाबरोबर जसा अस्त, सुखावरोबर जसें दुःख, त्याप्रमाणें देहाबरोबर मृत्यूचें सारखें वास्तव्य आहे. अमुक एका दिवशीं मनुष्य मरतो असें नसून दररोज त्याचा देह मृत्यूची अवस्था गांठण्याची तयारी करीत असतो. एकादा वृक्ष लहानशा रोपट्यापासून हळूहळू मोठा होत असतो व मोठा झाल्यावर कांहीं कालानें त्याला जीर्णावस्था येते. जीर्णस्थिति आली कीं तो नाशाला कवटाळण्याची सिद्धता करीत असतो. वृक्ष एकदम मोठा होतो असें नाहीं किंवा एकदम नष्ट होतो असेंहि नाहीं. या सर्व क्रिया नित्य व हळूहळू चालत असतात. एकादें घर एकदम तयार होत नाहीं, त्याचें बांधकाम जसें कित्येक दिवस चालू असतें तसेंच मानवी शरीराचेंहि आहे घर तयार झाल्यावर कालांतरानें तें जीर्णतेप्रत जातें. वृक्ष व गृह ह्यांच्यावर वायु व वीज यांचे कदाचित् आघात होऊन तीं जशीं एकदम नष्ट होतील, तसेंच मनुष्यशरीरहि अपमृत्यूला क्वचित् बळी पडेल. अपमृत्यचा अपवाद सोडून दिला तरी वर्धनाप्रमाणेंच क्षयाची क्रियाहि हळहळू नित्य चालू आहे. या क्रियेचें सूक्ष्म ज्ञान मनुष्याला असत नाहीं एवढेंच.

दररोजच्या मृत्यूचा विचार मनुष्य करीत नाहीं. पण देहांतर करून पूर्व देह टाकण्याचा प्रसंग त्याजवर आला कीं तो शोकाकुल होतो व मोहित होतो. पण धैर्यवान् व बुद्धिवान् पुरुष देहांतर प्रसंगीं कधींहि गडबडत नाहीं. एकादा विद्यार्थी एक विद्यालय सोडून परगांवच्या विद्यालयांत गेला तर त्याचा क्रम तेथें पूर्ववत् सुरू होतो. निरनिराळ्या कार्यालयांतील अधिकाऱ्यांच्या बदल्या वरचेवर होतात, क्वचित् त्या इच्छेनें किंवा अनिच्छेनेंहि होतात. दुसरीकडे गेल्यावर त्यांच्या व्यवहारांत कांहींच फरक पडत नाहीं. एका स्टेशनमास्तराची दुसऱ्या स्टेशनावर बदली झाली, कीं तिकडचा वेध त्याला लागतो. तिकडची त्याला घाई होते. दुसऱ्या स्टेशनवर जातांच पूर्वीच्या स्टेशनचे बुद्धिसंस्कार व कार्याभ्यास हीं त्याच्या उपयोगी पडतात. त्याचप्रमाणें देहांतर होतांच पुढील देहांत सर्व कांहीं यथापूर्व होऊं लागतें. विवेकी

पुरुषाला हें ज्ञान असल्यामुळें तो शोक करीत नाहीं. अविवेकी मात्र विनाकारण तळमळत असतो !

एकादें पुस्तक वाचतां वाचतां आपणांस झोंप लागली कीं जागें होतांच आपण तें पुस्तक पहिल्यापासून पुन्हां वाचीत नाहीं. कांहीं पानें चाळून इतका विषय वाचला असें ध्यानीं येतांच पुढें वाचूं लागतों. प्रवास करितांना ज्या इष्ट स्थळीं आपणांस जावयाचें असेल तेथें एका मुक्कामांत जर पोंचतां न आलें तर सूर्यास्ताच्या सुमारास आपण वस्ती करितों व दुसरे दिवशीं पहाटें उठून मागें न परततां पुढचीच वाट आपण चालूं लागतों. ह्याचप्रमाणें एका देहांतून दुसऱ्या देहांत गेल्यावर जीवात्मा पुढील मार्गच आक्रमण करूं लागतो. आत्म्याचा स्वभाव ऊर्ध्वगमन हा आहे. विकासवादाच्या सिद्धांताप्रमाणें तर मनुष्य सारखा उच्चतर स्थितीला जात असतो. अर्थात् देहांतरानें उच्च स्थितीला आपण जाऊं असा विश्वास मनुष्यानें बाळगला पाहिजे. सौजन्यानें व सरळपणानें व्यवहार करणाऱ्या माणसाचा सामान्यतः उत्कर्षच होतो. निरनिराळ्या खात्यांतील लोकांना बढत्याहि मिळतात व उच्च कार्याकरितां त्यांना स्थलांतर करावें लागतें. त्या वेळीं कोणाला वाईट वाटतें काय? कोणत्याहि नोकराला ह्या प्रसंगीं आपण उच्च स्थितीप्रत जात आहोंत ह्याबद्दल जसा आनंद वाटतो तसाच आनंद देहांतर करतांना वाटला पाहिजे. भगवंतांनीं अध्याय ६ श्लो. ४०।४१ मध्यें कल्याण मार्गानें जाणाऱ्याची कधींहि दुर्दशा होत नाहीं व योगभ्रष्ट मनुष्य पवित्र व साधनसंपन्न अशा कुलामध्यें जन्माला येतो असें ज्या अर्थी समाधानकारक आश्वासन दिलें आहे त्या अर्थी सरळ व सात्त्विक वृत्तीच्या मनुष्याला देहांतर करतांना शोक करण्याचें मुळींच कारण नाहीं.

प्रत्येक मनुष्य योगभ्रष्ट असतो असें नाहीं. पण योगभ्रष्टाला जी उच्च स्थिति देहांतरानें प्राप्त होते, ती जरी सामान्य मनुष्याला येत नसली तरी पूर्व स्थितीपेक्षां त्याची पुढील स्थिति उच्च असते असें समजण्यास कांहींच प्रत्यवाय नाहीं. सामान्य मनुष्याचा जन्म शुचि व साधनसंपन्न कुलांत न झाला तरी तो पूर्व कुलापेक्षां उच्च कुलांत होईल, ह्यांत मुळींच संशय नाहीं. आततताई, घातपात करणारे, तळतळाट घेणारे दुरात्मे सोडून दिल्यास सत्यव्रत, विचारी व सत्त्वरजोगुणी सामान्य प्रकृतीच्या मनुष्यासमुद्धां भगवंताचें

वरील आश्वासन विवेक उत्पन्न होण्यास पुरेसें आहे. तशाच व विवेकानें शांत चित्तानें देहांतर करण्याची सिद्धता नित्य ठेविली पाहिजे.

मनुष्याला जिवंत राहून कार्य करण्याकरितां दररोज पौष्टिक व पोटभर भोजन करावें लागतें. अशा एका भोजनाची तृप्ति व तज्जन्य शक्ति ही फक्त चोवीस तासच उपयोगी पडते. पुढच्या कामाकरितां व दिवसाकरितां मनुष्याला पुन:पुन: भोजन करावें लागतें; एका भोजनानें देह चालत नाहीं तर वरचेवर भोजनांतर करावें लागतें; अगदीं तसाच व्यवहार देहांतराचा आहे. मनुष्याला विवस्त्र राहावें असें वाटत नाहीं. शरीरसंरक्षण व सौंदर्य ह्या दोन्ही दृष्टींनीं मनुष्य वस्त्रें धारण करीत असतो. जुन्या वस्त्रांनीं रक्षण होत नाहीं व सौंदर्यहि बिघडतें, असें त्याला कळलें कीं जुनीं वस्त्रें टाकून नवीं वस्त्रें तो मोठ्या आनंदानें ग्रहण करितो. नवीन वस्त्र घेतांच जुन्याचा तो सर्वस्वी त्याग करितो. जीर्ण देहाचे संस्कारहि एकदम नष्ट होत नाहींत. नूतन देहधारण केल्यावर पूर्व संस्कार ताजे तवाने होतात व जीर्ण देहाचें स्मरणहि राहात नाहीं. जीर्ण व टाकाऊ वस्त्र निरुपयोगी म्हणून जसें आपण हौसेनें टाकितों, तें टाकतांना मनाला यत्किंचितहि विषाद वाटत नाहीं, तशीच वृत्ति जीर्ण देह टाकतांना असावी. पुरुषार्थसाधनीं जो देह निरुपयोगी ठरला, नराचा नारायण होण्यास ज्याचा उपयोग होणार नाहीं असें ठरलें, त्या देहाचा मोह बाळगण्यांत काय स्वारस्य आहे! अशा या जीर्ण देहाचा मृत्युकालीं आनंदानें त्याग केला पाहिजे असा भगवंताच्या सांगण्याचा आशय आहे.

नराचा नारायण होणें हें मानवी जीविताचें ध्येय आहे. विवेक व वैराग्य हीं धगधगीत असलीं तर नराचा नारायण याच जन्मीं, याच क्षणीं होऊं शकेल. परंतु विवेकवैराग्यसंपन्न अधिकारी फार थोडे असतात. ते सोडून दिल्यास इतरेजनांना, नारायण होण्याचें ध्येय गांठण्यास कित्येक जन्म घ्यावे लागतात व हजारों वर्षें साधनाभ्यास करावा लागतो. ह्या अभ्यासाकरितां अनेक देह जीर्ण करावे लागतात व जीर्ण देहांना सोडून नवदेह धारण करावे लागतात. एक साधन सोडून प्रसंगीं दुसरें हातीं घेऊन कर्ता मनुष्य आपलें कार्य फत्ते करून दाखवितो. तद्वतच मनुष्यमात्रानें जीर्ण देह सोडून व अन्य देह धारण करून सच्चिदानंद पदाची प्राप्ति करून घेतली पाहिजे.

अगदी ढोबळ व केवळ उपभोग दृष्टीनें मृत्यूचा विचार करूं लागल्यास काय दिसतें ? हें शरीर जगाचा उपभोग घेण्याकरितां आहे. प्रत्येक मनुष्याला त्याच्या कल्पनेप्रमाणें या देहानें पुष्कळांत पुष्कळ सुख भोगावें असें वाटत असतें. पण उपभोगाला तरी मर्यादा आहेच व शरीरशक्तीलाहि मर्यादा आहे. ज्या देहामुळें जगाचा उपभोग घेतां येत नाहीं तो यापुढें अधिक घेतां यावा म्हणून परमेश्वर मनष्यावर देहांतराचा अनुग्रह करितो. परमेश्वराच्या या अनुग्रहाबद्दल दुःख वाटण्याचें मुळींच कारण नाहीं. अजारी मुलाच्या जिभेला रुचि नसते म्हणून आई जशी मुलाला निरनिराळे रुचकर पदार्थ करून घालते, किंवा वैद्य जसा गुण येण्याकरितां औषधें बदलून देतो, किंवा एकादा उत्तम शिक्षक विद्यार्थ्याला एकादा विषय विविध पद्धतीनें सुलभ करून सांगतो, तसाच परमेश्वरहि देहांतराचा अनुग्रह मनुष्यावर करीत असतो.

पण एवढी प्राकृत दृष्टि उपयोगाची नाहीं. देह हा उपभोगाकरितां नसून तो कर्तव्याकरितां आहे हाच सिद्धांत खरा आहे. कर्तव्य करीत करीत देहपात झाला तरी बेहेत्तर; हीच सात्त्विक वीरवृत्ति सज्जनामध्यें असते. मृत्यु हें देहाचें स्वरूप म्हणून त्याची क्षिति व भीति न बाळगतां कर्तव्य करण्यांतच खरा पुरुषार्थ आहे. मृत्यु, मृत्यु म्हणून भ्यावयाचें नाहीं आणि मृत्यु येणार म्हणून उगाच आगींत उडीहि घालावयाची नाहीं किंवा आत्महत्याहि करावयाची नाहीं. आत्महत्या करणारा मनुष्य जगाला वैतागलेला आणि तापत्रयानें त्रस्त झालेला असतो. त्याला जीवित दुःसह होतें व देहत्याग करून मुक्त व्हावें, असें वाटतें. थोर पुरुषांची वृत्ति यापेक्षां अगदीं भिन्न असते. तेहि प्रसंगी शरीराचें बलिदान करितात व कार्य साधतात. महत्कार्य करण्याकरितां महत्त्याग करावा लागतो. फार काय, पण प्रसंगीं अनेक त्यागांचें साधन जें शरीर तेंहि टाकावें लागतें.

'तुका म्हणे व्हावें देहासी उदार। रखुमादेवीवर जोडावया' ॥

म्हणजे ईश्वरप्राप्तीकरितां भगवद्भक्ताला देहावर तुळसीपत्र ठेवावें लागतें.

जगांत जे थोर, कर्ते व निग्रही पुरुष होऊन गेले त्यांनीं मृत्यूला कःपदार्थ मानलें. समर्थसंप्रदायामध्यें मृत्युविषयीं बेपर्वा हें एक तत्त्व आहे. समरांगणावर उभा राहणारा वीर हातावर शिरकमल घेऊन सिद्ध असतो, व झुंजार वृत्तीनें देहार्पण करून विजयश्रीची आराधना करीत असतो. कोण-

तेंहि मोठें कार्य करावयाचें म्हणजे देहाला मृत्यूच्या पुढें ठेवावेंच लागतें. महत्त्वाकांक्षा व तीव्र जिज्ञासा हीं ज्यांच्या ठिकाणीं असतात त्यांना मृत्यूची भीति कधींच वाटत नाहीं. कठोपनिषदामध्यें नचिकेताची गोष्ट आहे त्याच्या पित्यानें त्याला मृत्यूच्या स्वाधीन केलें! नचिकेता हा मृत्यूकडे गेला त्यानें मृत्यूला प्रसन्न करून घेतलें व त्याचेकडून तीन वर मिळविले. शेवटचा वर मेल्यानंतर आत्मा असतो कीं नाहीं या संबंधाचा होता. मृत्यु हा त्याला या वराच्या नादीं मुळींच लागूं नकोस असें म्हणत होता. पण त्यानें तीव्र जिज्ञासेमुळें मृत्यूच्या घरीं जाऊन शेवटीं आत्मविद्या संपादन केली!! जगावर उपकार करण्याचें व्रत दधीचि ऋषींनीं घेतलें होतें. व्रत म्हणजे व्रत; तें पाळलेंच पाहिजे हाच त्यांचा दृढनिश्चय होता. वृत्रासुर हा अखिल जगताला ताप देऊं लागला. इंद्रप्रभृति देवांना मोठा पेच पडला. शेवटीं दधीचि ऋषींच्या अस्थींचें वज्र करून त्यास मारण्याची युक्ति त्यांना समजली. सर्व देवांनीं दधीचीकडे जाऊन प्रार्थना केली. त्याबरोबर या देहांतील अस्थींच्या त्यागानें जर जगाचें कल्याण होत आहे तर हा देह मी आतांच मृत्यूच्या स्वाधीन करितों असें त्यांनीं म्हटलें व आपल्या अस्थि दिल्या.

तानाजीनें आपल्या रायबाचें 'लगीन' न लावतां आधीं स्वतःचें सिंहगडाशीं लग्न लाविलें नाहीं काय? समरभूमीवर स्वदेह ठेवून मृत्यूला तृप्त केलें व विजय मिळविला नाहीं काय? शिवाजी महाराज अफजुल खानाला भेटावयाला गेले ते मृत्यूच्या गुहेंतच गेले नव्हते काय? जयसिंगाबरोबर महाराज आग्र्यास गेले व औरंगजेबाच्या अटकेंत राहिले. ती अटक म्हणजे मृत्युरूपी सिंहाची पक्कडच नव्हती काय? पण मृत्यूच्या गुहेंत शिरून त्याचे केस उपटून महाराज दक्षिणेंत आले व त्यांनीं स्वराज्याचा दुंदुभि वाजविला. मृत्यूविषयीं बेपर्वा असल्यामुळेंच अशीं महत्कार्यें घडलीं. थोरले माधवराव व नारायणराव पेशवे बसले असतांना वाड्यांतील हत्ती मस्तीनें चालून आला. त्याला पाहतांच नारायणराव पळूं लागले. पण माधवरावांनीं हात धरून त्याला बसविलें व "या हत्तीकडून आपणास मरण नाहीं" असें धैर्यानें सांगून त्याच्या सोंडेवर त्यांनीं भाला फेंकला व त्यास चीं चीं करण्यास लाविलें. नेपोलियनची अशी गोष्ट

सांगतात कीं तो अगदीं गोळ्यांचा वर्षाव सुरू असतांनासुद्धां आघाडीवर जाई व सैनिकांना उत्तेजन देई. नेपोलियनच्या जवळचे सेवक त्यास पुढें न जाण्याबद्दल विनवीत असत. पण तो म्हणे कीं मला मृत्यु आणणारी एकहि गोळी यांत नाहीं. केवढा हा विश्वास व केवढा निर्धार! सारांश, महत्कार्य करणाऱ्यांनीं कर्तव्याकरितां देह आहे हीच दृष्टि ठेवली, मृत्यूची क्षिति बाळगली नाहीं व मृत्यूबद्दल कधींही शोक व मोह करीतहि ते बसले नाहींत. तात्पर्य मृत्यु ही नित्य व्यवहारांतील एक अवस्था समजूनच कर्तव्य बजावलें पाहिजे.

उत्पत्ति व स्थिति याप्रमाणें लयाची आवश्यकता आपणास भासत नाहीं काय? जगाच्या धारणपोषणाला मृत्यु ही शक्ति पाहिजेच. उत्पत्ति, स्थिति व प्रलय असें हें चक्र सारखें चालू आहे, म्हणूनच जगाला शोभा आहे. जगांतील स्थावरजंगम, सजीव आणि निर्जीव प्राण्यांची जर सारखी उत्पत्ति व स्थितीच चालू राहिली तर जगांत अनर्थ होणार नाहीं काय? ब्रह्मा, विष्णु व महेश अशीं ईश्वराचीं तीन स्वरूपें आहेत. ह्या तिघांची आवश्यकताहि सारखीच आहे. मनुष्याला संहारकर्त्या रुद्र देवतेची भीति वाटते हा त्याचा दोष होय. घरामध्यें केव्हां केव्हां ढेकूण पिसवा, डांस व चिलटें ह्यांचाहि उपद्रव अतिशय होतो. केव्हां केव्हां चांचडांची सांथहि येते. त्या वेळीं ह्या सर्वांचा संहार केव्हां एकदाचा होईल असें मनुष्याला वाटतें. मनुष्याच्या इच्छेनें ह्यांचा संहार होतो असें नाहीं. पण कांहीं एका निमित्तानें मनुष्याला उपद्रव देणारे हे प्राणी केव्हां तरी आपोआप व केव्हां यत्नतः कमी होतात हें खरें.

पूर्वा नक्षत्राच्या पावसामुळें केव्हां केव्हां अतिशय सुरवंट होतात, पुढें ते हस्त नक्षत्राच्या वर्षावाबरोबर नष्ट होतात! म्हणूनच ठीक आहे. जगांत रोजची उत्पत्ति व प्रलय यांची घडामोड चालू नसती तर जगांत मनुष्यांना राहण्यास जागाच मिळाली नसती. एकाद्या महायात्रेच्या वेळीं तीर्थावर यात्रेकरूंची अतोनात उत्पत्ति होते. त्या सर्वांची स्थिति तेथें बहुत काल झाली तर अनर्थच ओढवेल. परंतु लगेच जादा गाड्या सोडून खेचाखेचीनें माणसें कोंबून तीर्थावरील यात्रेकरूंचा हा असा प्रळय

करण्यांत येतो हें योग्य नव्हे काय ? शेतकऱ्याला साडेसातीपेक्षां किंवा जुलमी राजापेक्षां अतिशय त्रासदायक अशी टोळधाड वाटते. ह्या दुष्ट टोळांची उत्पत्ति जमीनींतूनच अशी कांहीं चमत्कारिक रीतीनें होते की ती पाहून ईश्वरी लीलेचें कौतुकच करावेंसें वाटतें. ह्या टोळधाडीनें कित्येक मैलभर पसरलेलीं हीं हिरवीगार शेतें अवघ्या रात्रींत जळून खाक झाल्यासारखीं होतात. टोळधाडीचा क्रम अव्याहत कांहीं महिने चालला तर मनुष्यांना उपाशी मरण्याचाच प्रसंग येईल. पण ईश्वरी प्रेरणा अशी अघटित असते कीं त्या टोळधाडीला पश्चिम अगर पूर्वसमुद्राकडे जावेंसें वाटतें. पांच पंचवीस मैल ती सेना समुद्रपर्यटण करते व शेवटीं ''समद्रास्तृप्यंतु' अशी होते. ज्या कारणानें उत्पत्ति होते त्याच कारणानें प्रळयहि होतो. दोहोंची आवश्यकताहि सारखीच असते हा निसर्गनियम अगदीं बरोबर आहे.

मनुष्यानें स्वतःशीं विचार करून पाहिल्यास त्याला मृत्युरूपी नैमित्तिक प्रळयाबद्दल वाईट वाटणार नाहीं. दिवसाच्या चोवीस तासांत किती तरी विचारांची उत्पत्ति मनांत होत असते. उत्पन्न झालेले सर्वच विचार जसेच्या तसेच जर डोक्यांत राहिले तर मनुष्य क्रियाशून्य होईल. कार्यप्रवण होण्याकरितां त्याला एकच विचार ध्यानांत ठेवून वागावें लागतें. जे विचार डोक्यांतून लौकर जात नाहींत, त्यांचा प्रळय करण्याकरितां गाढ झोंप हें मोठें साधन आहे. विस्मरण आणि निद्रा ह्यामुळें मनुष्य ताजातवाना होतो. निद्रेला पंचप्रळयापैकीं नित्य प्रळय असें वेदांतशास्त्रामध्यें म्हटलें आहे, तें योग्यच आहे.

मनुष्याला विश्रांति पाहिजे. दिवस व रात्र ही ईश्वरी योजना त्याकरितां आहे. दिवसा काम व रात्रीं झोंप असा सामान्य व्यवहार आहे. थोडक्या विश्रांतीला रात्र पुरी पडते. परंतु महानिद्रेला पुष्कळ काल लागतो. मनुष्यशरीरालाच नव्हे तर प्रत्येक सजीव शरीराला केव्हां तरी महानिद्रा पाहिजेच. दीर्घकाल विश्रांति व दीर्घकाल निद्रा ही ज्या मृत्यूच्या आश्रयानें येते त्याची थोरवी किती वर्णन करावी बरें ! मृत्यूला या दृष्टीनें शत्रु म्हणतां येईल काय ? जो विसावा देतो, आराम देतो, शारीरताप

घालवितो, त्याला आपण शत्रू समजावें काय? मुळींच नाहीं. मृत्यु हा नैमित्तिक प्रलय आहे व निद्रा हा नित्य प्रलय आहे, रोजचें जेवण नैमित्तिक सणांचे प्रसंगीं अधिक व मिष्ट होत असतें त्याचप्रमाणें मृत्यू म्हणजे नित्य निद्रेपेक्षां थोडी अधिक निद्रा होय. दुसरें कांहीं नाहीं.

मनुष्याला मृत्यूबद्दल वाईट वाटतें. पण मृत्यु कोणाला? देहाला कीं आत्म्याला याचा विचार केला पाहिजे. जीवात्मा हा अविनाशी आहे. तो सत्, नित्य, शाश्वत्, व पुराण आहे म्हणून त्याला कधींहि मृत्यु नाहीं. मृत्यु हा देहाला आहे. पण देहाचें तें स्वरूपच असल्यामुळें त्यांत वाईट असें कांहींच नाहीं. बरें देह तरी मृत्यूनंतर नष्ट होतो काय? मुळींच नाहीं. देहाचें नुसतें स्वरूपांतर होतें. देहांतील सूक्ष्म तत्त्वांचा अत्यंत अभाव कधींहि होत नाहीं. कारण पंचभूतात्मक देह पंचतत्त्वांत विलीन होतो.

मेणवत्ती जळली कीं प्राकृत मनुष्य तिचा नाश झाला असें समजतो, पण रसायनशास्त्रज्ञ तिचें रूपांतर कांहीं द्रव्यामध्यें झालें असें म्हणतो. एक डबाभर तूप माणसांच्या पोटांत गेलें किंवा जमिनीवर सांडलें तर व्यावहारिक दृष्ट्या भाषा निराळी होईल. पण तत्त्वदृष्ट्या तूप जमिनीवर सांडलें अगर माणसांनीं तें खाल्लें तर पृथ्वीचा अंश पृथ्वींत जाणार व आपाचा अंश आपांतच जाणार. जेथून जें आलें असतें तें पुन्हां उत्पत्तिस्थानाकडे जातें, असा त्याचा स्वभावच आहे. आईकडे मूल गेलें, धेनूकडे वत्स गेलें, जांवयाकडे मुलगी गेली किंवा इंग्रज लोक उद्यां आपल्या देशास गेले तर त्यांत वाईट तें काय? जो तो आपापल्या स्थानाप्रत गेला ह्यांत दुःखशोकाचा संबंध तो काय आहे? तात्पर्य देहाला मरण येतें हें म्हणणें सुद्धां तत्त्वतः खोटें आहे. देह मरत नाहीं तर त्याचें रूपांतर होतें, आत्मा तर मरत नाहींच नाहीं फार काय पण देहाकडून केलीं गेलेलीं कर्में हीं सुद्धां नष्ट होत नाहींत.

## प्रकरण तिसरें

# मनुष्याचे दृश्य पुनर्जन्म

गेल्या प्रकरणांत मनुष्य कधींहि मरत नाहीं आणि मृत्यु म्हणजे देहाचें इष्ट व अवश्य असें स्वरूप असें सांगितलें. प्रस्तुत प्रकरणांत मनुष्य कर्मरूपानें याच जगांत किती पुनर्जन्म घेत असतो हें दाखवावयाचें आहे.

शरीर हें पंचतत्त्वापासून झालेलें. अर्थात् हीं पंचतत्त्वें पंचतत्त्वांत मिसळतात. आत्मा हा अविक्रिय, न मरणारा, न जळणारा, निर्गुणनिराकारच आहे. देह व आत्मा याचें हें स्वरूप आहे. आतां देहाकडून केलीं गेलेलीं जीं कर्में तीं सुद्धां कशीं अविनाशी आहेत हें आतां पाहूं. जोंवर जग आहे तोंवर कर्म आहे. जगाचा अंत झाला तरी कर्म बीजरूपानें शिल्लक राहतेंच. अखिल जगाचा अंत कल्पनेनेंच होत असतो. जलप्रळय, हिमप्रळय जरी झाले तरी ते जगांतील एकाद्या भागावरच होतात. प्रळयानंतरहि अल्प कालानें तेथें वस्ती सुरू होते. जगांत जे असंख्य जीव, त्यांचीं जीं असंख्य कर्में त्यांचा विपाक म्हणजेच ही सृष्टि होय. ही सृष्टिरचना अनादि व अखंड आहे. म्हणून कर्महि अखंड व शाश्वत आहे.

मनुष्याचा जन्म पूर्वकर्मामुळें होतो व जन्माला आल्यावर त्याला कर्में करावीं लागतात. जन्माबरोबरच कर्म आहे व कर्माबरोबरच जन्म आहे. वेदांतशास्त्रदृष्ट्या जीवात्म्याला पुनर्जन्म आहे. पुनर्जन्म कसा व कोणता येतो हा प्रश्न जरी वादग्रस्त असला तरी ढोबळ व व्यावहारिक दृष्टीनें मनुष्याचा पुनर्जन्म कर्म, पुत्र, वित्त, विद्या, पौरुष इत्यादि द्वारानें होतो असें म्हणतां येतें. मनुष्याला मुलगा होतो तेव्हां तो स्वतःच निराळ्या रूपानें बायकोच्या पोटीं जन्माला येतो. वैदिक कल्पनेप्रमाणें मलगा हा पुरुषाचा द्वितीय जन्म होय. जितके पुत्र तितके त्याचे जन्म हें सहजच आहे. मनुष्य हा मरेपर्यंत अनेक उलाढाली करीत असतो. त्या सर्व उलाढालीच्या स्वरूपानें मनुष्य जिवंत असतो. 'मरावें परी कीर्तीरूपें उरावें' या समर्थोक्तीमध्यें हाच खोल अर्थ आहे. कीर्तीच्या रूपानें मनुष्य जिवंत राहतो हें खरें. पण नुसती कीर्ति ही कार्याशिवाय कधींच असूं शकत नाहीं. पुष्पाबरोबर जसा सुगंध असतो, तद्वतच सत्कर्माबरोबर कीर्ति असते. मनु-

ष्यानें एकादें सत्कर्म केलें म्हणजे जुन्या समजतीप्रमाणें देवालय, घाट, धर्म-शाळा विहीर, तलाव ह्यांपैकीं कांहीं बांधलें किंवा नव्या समजुतीप्रमाणें शिक्षणसंस्थांना चांगली मदत केली तर त्याचें नांव राहातें; पण तें नांव अखंड कार्यपरंपरेवरच अवलंबन असतें. धर्मशाळेंत सारखी माणसांची ये जा असली व ती त्यांना सोयस्कर वाटली तरच कर्त्याचें नांव निघत असतें.

ज्या देवालयामध्यें ज्ञानचर्चा, भक्तिभाव, भजन–पूजनाची सतत गर्दी उडत असते त्याच वेळीं देवालय बांधणाराची सहज आठवण साहजिक होते. पडकें देवालय, व कुठली तरी मोडकी पडकी धर्म शाळा ह्यामुळें नांव होत नाहीं, ह्याचें कारण तेथें कार्यपरंपरा अखंड चालत नाहीं हें होय. जगन्नाथ शंकरशेट यांचें नांव संस्कृत विद्येच्या उत्तेजनार्थ कार्य-परंपरेमुळेंच सदैव निघत राहणार. कारण जोंवर मनुष्यसमाज आहे तोंवर विद्वान माणसांना जुन्यांतली जुनी म्हणून संस्कृत भाषा आदरणीय आहे. तिचा अभ्यास संशोधक दृष्टीनें कित्येक शतकें चालणार. जोंवर अभ्यास चालूं आहे तोंवर शेटजींचें नांव अभ्यासाला उत्तेजन व आश्रय देणारें या नात्यानें राहाणार यांत शंका नाहीं. एवंच कार्यपरंपरा अखंड चालूं राहिली कीं मनुष्य जिवंत आहे असें समजावें.

बद्धिमान् मनुष्य हा बद्धिरूपानें सदैव जिवंत असतो. समजा, एकादा उत्तम शिक्षक आहे. त्यानें एक दोन विषय विद्यार्थ्यांना उत्तम शिकविले म्हणजे ते विद्यार्थी तो विषय दुसऱ्यांना शिकवितात, दुसरे तिसऱ्यांना सांगतात व तिसरे चौथ्यांना शिकवितात अशी विचारपरंपरा चालते. ही जोंवर चालू आहे तोंवर तो शिक्षक विचाररूपानें जिवंत असतो असें नव्हे काय? ज्ञानाच्या योगानें ब्राह्मणाचा, पराक्रमानें क्षत्रियाचा, द्रव्यानें वैश्याचा व सेवेनें शद्राचा पुनर्जन्म ह्याच जन्मांत होत असतो. त्यांनीं केलेल्या कार्याचें परिणाम जोंवर जगामध्यें परंपरेनें चालत आहेत तोंवर ते जिवंतच असतात. संस्कृत भाषा ही भाषाच अमर आहे. तिचें नांव उच्चारतांच पाणिनीचें नांवहि अजरामर होतें. कारण पाणिनीनें संस्कृत भाषेच्या क्षेत्रांत व्याकरण-रूपानें एवढा मोठा पराक्रम करून ठेविला आहे कीं जोंपर्यंत संस्कृतभाषा-व्यासंगाची जगांत अभिरुचि राहील तोंवर पाणिनी जिवंतच राहणार.

भगवान् व्यास, बादरायण, वाल्मिकी, पाणिनी, ज्ञानेश्वर, रामदास

इत्यादि ह्या जगांत पुनर्जन्म घेऊन वावरत आहेत. ह्यांचे जन्म वेळोवेळीं होत आहेत. संस्कृत भाषेबद्दल एकाद्या पाश्चात्य पंडितानें कांहीं बरें अगर वाईट लिहिलें तर त्याच्या मंडनार्थ अगर खंडनार्थ आपलेकडेहि विचार-जागृति सुरू होते. अर्थात् ज्या पाणिनीचें विस्मरण कांहीं लोकांना झालेलें असतें तें नष्ट होतें. समर्थ रामदास स्वामींच्यावर एकाद्यानें कांहीं आक्षेपार्ह लिहिलें कीं लगेच विचारवंतांमध्यें खळबळ होऊन त्यावर चर्चा सुरू होते. अशा वेळीं समर्थ रामदासांचा पुनर्जन्मच तेथें होत नाहीं काय? सॉक्रेटिस, ग्यालिलिओ, सर ऐझाक न्यूटन इत्यादि तत्त्वज्ञ ह्या जगांत जिवंत आहेत. कदाचित् त्यांना आपल्या ह्या जिवंतपणाची कल्पनाहि नसेल. शास्त्रज्ञांचें नेहमी असेंच होतें. त्यांच्या शोधांची किंमत त्यांच्या पश्चात् पुष्कळ वर्षांनीं अतिशय वाटते. असो.

पराक्रमाच्या रूपानें क्षत्रियाचा पुनर्जन्म होतो. भारतीय योद्धयांचीं वीररसप्रधान युद्धवर्णनें षंढामध्येंसुद्धां स्फूर्ति उत्पन्न करतात. अर्वाचीन कालांतील तानाजी मालुसऱ्याचा पराक्रम किती तरी तरुणांचीं अंतःकरणें उद्दीपित करतो. एखाद्या चिकित्सक संशोधकानें त्याच्यावर भारदस्त लेख लिहिला, कादंबरीकारानें त्याचें चटकदार वर्णन केलें, शाहीरानें त्या प्रसंगाचा वीररसयुक्त पोवाडा म्हटला तर त्या त्या परिस्थतींत तानाजीचा पुनर्जन्म होऊन तो लेखक, वाचक, श्रोते आणि वक्ते ह्यांना कार्य करण्यास उत्तेजन देत नाहीं काय? कार्यप्रवण करण्याची ही परंपरा जोंवर अखंड आहे तोंवर तानाजी मालुसरा मेला असें म्हणतां येईल काय? तो जिवंत आहे व वेळो-वेळीं त्याचा पुनर्जन्म होत आहे हें प्रत्यक्षच आहे.

कोणी म्हणतील कीं ह्या मोठ्यांच्या गोष्टी झाल्या, पण सामान्य लोकांचा पुनर्जन्म ह्या जगांत कार्यरूपानें कसचा होणार? ते एकदां मेले म्हणजे मेले. पण तसें नाहीं. हें जग अनंत आहे. ह्यांत सामान्य माणसें फार असून जगांत नित्याच्या सामान्य कार्याचा प्रवाहच अव्याहत चालू आहे. सामान्य कर्मांपासून सामान्य परिणाम होतात. एकाद्या हमालाचें चरित्र इतर हमालांना स्फूर्ति देतें तर एकाद्या भिक्षुकाची गोष्ट दुसऱ्या भिक्षुकांना उत्तेजन देते. एवंच, प्रत्येक मनुष्याचें क्षेत्र भिन्न असतें. महात्मा गांधीजींचें व्याख्यान ऐकूनच सर्वांना कांहीं स्फूर्ति होत नाहीं. गांधी जेथें न जाऊं शक-

तील अशा खेड्यापाड्यांत तें कार्य तेथील स्वयंसेवकच करूं शकत नाहीं काय? महात्मा गांधी तुरुंगांत गेल्यावर कायदेभंगाचें स्फुरण तज्ज्ञांना व मोठमोठ्या लोकांना होतें, पण गांवढळ लोकांना तें स्फुरण आपल्या गांवांतील प्रभात फेरीनें व झेंडावंदनानेंच मिळतें.

जग हें त्रिगुणयुक्त आहे. जगामध्यें होणारीं कर्में सत्त्व रज, तम अशीं त्रिगुणयुक्तच असतात. सत्कर्मानें सत्कीर्ति होते, दुष्कर्मानें दुष्कीर्ति होते. मनुष्याच्या हातून सात्त्विक, राजस, तामस कर्में होतात व त्यांचे परिणाम त्या त्या गणांच्या मानानें जगावर होत असतात. किंबहुना कोणताहि मनुष्य आपापल्या स्वभावाप्रमाणें इष्ट ते संस्कार ग्रहण करीत असतो. उदा० एक कीर्तनप्रसंग घेऊं. एकादशीच्या दिवशीं परमेश्वराचें नामसंकीर्तन करण्या-करितां कीर्तन होत असतें. भाविक लोक त्या कीर्तनांतील भक्तिरस ग्रहण करितात. तात्त्विकांना वेदांत आवडतो, रसिक लोक गायन व काव्य ह्यांवर लुब्ध होतात. विषयी श्रोते श्रृंगाररसानें उद्दीपित होऊन स्त्रियांकडे पाहूं लागतात, तर दूर उभे राहिलेले भामटे लोक पादत्राणें खाकोटींत मारून कीर्तनाचा 'अलभ्य लाभ झाला' असें म्हणून निघून जातात. ह्यावरून एका सात्विक कर्मांत इतर गुणांचें मिश्रण कसें असतें व त्याचे परिणाम कसे दूरवर होतात याची कल्पना येते. आपल्या कीर्तनापासून इतके बरे वाईट परिणाम होत असतात ह्याचें ज्ञान श्रोत्याला व वक्त्याला मुळींच असत नाहीं. मग जीं प्रबल कर्में बहुत दिवसांपूर्वी किंवा केव्हां तरी घडलेलीं असतील त्यांच्या विपाकांचें ज्ञान मनुष्याला कसें बरें होणार!

भला बरा, लहान मोठा, सुजाण अजाण, कसलाहि मनुष्य असो तो जन्मभर बरीं वाईट कर्में करीत असतो. अर्थात् देहत्यागानंतर तो त्या कर्मांच्या रूपानें जिवंत राहतो. तात्पर्य, कर्मरूपानें जगांत प्रत्येक मनुष्य जिवंत असतो म्हणून शोक करण्याचें कांहींच प्रयोजन नाहीं.

अगदीं एका खेड्यांत एक स्वाभिमानी, व कर्तव्यदक्ष शिक्षक आहे. त्यानें पोटाकरितां दहावीस वर्षें नोकरी केली, हें खरें असलें तरी त्याच्या अंगीं असलेल्या गणांचा प्रभाव विद्यार्थ्यांवर होतोच. त्याच खेड्यांतील चारदोन विद्यार्थी स्वाभिमानी व कर्तव्यदक्ष निपजले म्हणजे तो शिक्षक गुणरूपानें पुनः जन्मला नाहीं काय? जोंवर ही गणपरंपरा त्या गांवांत जिवंत आहे

तोंवर तो शिक्षक जिवंत आहे असें म्हणण्यास काय अडचण आहे ? सब्-रजिष्टरची जागा द्रव्यमोह उत्पन्न करणारी आहे हें प्रसिद्धच आहे. पण त्या जागेवर असतांना जो पद्मपत्राप्रमाणें एका पैपासूनहि अलिप्त राहिला त्याचें वैराग्य भरताच्या तोडीचें नव्हे काय ? भरताचें क्षेत्र मोठें व ह्याचें अगदीं लहान आणि त्या मानानें एकाची प्रसिद्धि मोठी व दुसऱ्याची वेताची येवढेंच. तथापि दोहोंमध्यें त्यागाच्या उत्कट वृत्तीचा जो अंश असतो तो कुठेंही परिणाम केल्याशिवाय राहात नाहीं. त्यागवृत्तीनें तो जिवंतच समजला पाहिजे.

श्रीमंत औंधकरांसारखा संस्थानिक नियमानें सूर्यनमस्कार घालतो. त्याचा परिणाम सर्व औंध संस्थानावर होतो. तर एखाद्या सामान्य मनुष्यानें आपल्या घरीं तोच उपक्रम सतत चालूं ठेविला तर त्याचा परिणाम घरच्या माणसां-वर, शेजाऱ्यापाजाऱ्यांवर व इतरांवरहि होतो. घरच्या माणसांना शिस्त लागते, शेजारच्या माणसांना त्याचें अनुकरण करावेंसें वाटतें व निकटवर्ती जनांवर एक प्रकारचें नैतिक वजनहि पडतें. हा त्या नमस्काररूपी कर्माचा दृश्य विपाक झाला. इतरहि विपाक त्यापासून उत्पन्न होत असतात व त्यांची सूक्ष्म परंपरा अव्याहत चालूं असते. कर्मविपाक हें शास्त्र फार गहन असलें तरी कर्मरूपानें मनुष्य दीर्घ कालपर्यंत कसा जिवंत राहूं शकतो हें बुद्धिवानाला सहज आकलन होण्याजोगें आहे. दररोज फिरावयास जाण्याची साधी गोष्ट घेतली तरी तिचे परिणाम बहुविध होत असतात. फिरावयास जाणारीं दोन माणसें व्यायामाकरितांच एकाद्या डोंगरावर फिरावयास जातात. तेथें देवालय असल्यास भाविकांस देवदर्शनार्थ तिकडे जावेंसें वाटतें. व वृद्धांचें अनुकरण तरुणांना करावेंसें वाटतें. क्वचित् तरुणाबरोबर तरुणी जाऊं लागल्या तर केव्हां तरी कांहीं फाजीलपणाचा प्रकार होण्याचा संभव असतो. तशा प्रसंगीं इतर गृहस्थ सहज फिरावयास जात असले तरी त्यांचे-कडून त्या बद कर्माचें अबुद्धिपुरःसर नियमन व निवारण होतें. स्त्रीला रक्षण व वाली मिळाला असें वाटतें व उल्लू मनुष्याला शास्ता मिळाला असें वाटून तो पळून जातो.

एवढा वेळपर्यंत मृत्युकल्पनांचें स्वरूप, मृत्युलोकाची राहाटी, मृत्यु राजाची उदारता, अर्जुनाला पडलेला मोह इत्यादि विषय मांडून मृत्यु ज्या

देहाला येतो तो देहहि मरत नाहीं व त्या देहाकडून जीं कर्मे होतात तींहि नाश पावत नाहींत इत्यादि विषयांचें विवेचन केलें. देह नष्ट होत नाहीं, कर्म नष्ट होत नाहीं, मग शोकाचें कारण काय? ख़रोखर कांहीं नाहीं. आतां आत्मतत्त्व कसें अविनाशी आहे व जीवात्म्याचा नाश कधींहि होत नसल्यामुळें तो अशोच्य कसा आहे ह्याचें विवेचन करून हा विषय पुरा करितों.

प्रत्येक देहांत आत्मा आहे. फार काय पण पदार्थमात्रांत आत्मतत्त्व आहे. वनस्पतींनासुद्धां संवेदना आहे हा सिद्धांत आतां त्रिखंडी मान्य झाला आहे. वेदांतशास्त्र असें सांगतें कीं ह्या जगांत सर्वत्र अनुस्यूत, एकजिनसी घनदाट असें एकच तत्त्व आहे. त्या तत्त्वानें हें सर्व जग व्यापिलेलें आहे. त्या तत्त्वालाच उपासकांनीं व शास्त्रकारांनीं उपाधि–भेदामुळें विविध नांवें ठेविली आहेत. त्याच तत्त्वाला वेदांती ब्रह्म म्हणतात, त्यालाच ईश्वर म्हणतात. श्रीकृष्ण सांगतात कीं मी प्रत्येकाच्या हृदयामध्यें सन्निविष्ट आहें म्हणजे राहिलेला आहे. ह्या जीवलोकांत जो सनातन जीव आहे तो माझाच अंश आहे म्हणून ब्रह्मांड अथवा ईश्वराचा अंश जो जीव तो सत् व नित्य असल्यामुळें त्याचा नाश कसा बरें होईल? आत्मतत्त्व अविनाशी आहे म्हणून तें कधींहि मरत नाहीं. आत्मा मरत नाहीं, तुटत नाहीं, फुटत नाहीं, जळत नाहीं. तात्पर्य, तो अव्यक्त, अचिंत्य, अविकार्य, अच्छेद्य इत्यादि आहे.

आत्म्याचें स्वरूप असें अविनाशी असल्यामुळें एका देहांतून तो दुसऱ्या देहांत जात असतांना शोक करणें मूर्खपणाचें नव्हे काय? मनुष्य एका गांवांहून दुसऱ्या गांवीं जातो, एका घरांतून दुसऱ्या घरीं जातो, ह्या नित्य व्यवहारां-मध्यें शोक व मोह नसतात. तीच स्थिति आत्म्याच्या देहांतराची आहे. म्हणून तो अशोच्य होय.

आतां यदाकदाचित् असें कोणी म्हणतील कीं आत्मा हा देहाबरोबर नित्य उत्पन्न होणारा व मरणारा आहे म्हणजे अविनाशी नाहीं. तसेंच असेल तर शोक करण्याचें मुळींच कारण नाहीं. कारण जो जन्मतो तोच मरतो. जो जन्मला नाहीं तो मरणार कसा? आत्मा वरचेवर जन्मणारा व मरणारा असेल तर मनुष्यमात्राचेसुद्धां दररोज जन्म-मृत्यूचे व्यवहार घडतच असतात. त्याबद्दल कोणी शोक करितात का?

एकादा देशभक्त तुरुंगांत गेला कीं तुरुंगांत त्याचा जन्म झाला व तेथून सुटला कीं तुरुंगांत त्याचें एक प्रकारचें मरणच घडलें नाहीं काय? दवाखान्यांत राहण्यास गेलेला रोगी, आगगाडीचें साहाय्यानें प्रवासास निघालेला उतारू कोर्टांत गेलेला साक्षीदार ह्यांचे जन्ममृत्यु दवाखान्यांत, आगगाडींत, व कोर्टांत नित्य होत असतात. म्हणून कोणी शोक करितो काय? अस्तित्व भासलें कीं जन्म व तें न भासलें कीं मृत्यु अशी जर विचारपरंपरा चालूं ठेविली तर नित्याच्या मृत्यूबद्दल शोक करणें किती असमंजसपणाचें आहे, हें सांगावयास नकोच.

तात्पर्य, देह, कर्म व आत्मा ह्या तिन्ही दृष्टीनी विचार केला तरी मेलेल्यांचा शोक करणें वेडेपणा होय असें ठरतें. हा जरी वेडेपणा असला तरी प्रस्तुत देहाचा नाश होतांना जे क्लेश होत असतात त्यासाठीं कां शोक करूं नये, असेंहि कोणी विचारील. त्याला उत्तर अध्याय २ श्लोक १४ मध्यें दिलें आहे. तें असें कीं इंद्रियाचे स्पर्श म्हणजे विषय हे शीतउष्ण, सुखदु:ख देणारे आहेत, ते अनित्य आहेत, येतात व जातात म्हणून ते मनुष्यानें धैर्यानें सहन केले पाहिजेत.

पंचविषय हे इंद्रियांना प्रिय असले तथापि ते केव्हां अनुकूल केव्हां प्रतिकूल होऊनच भोग देतात. शब्द हा कानाचा विषय आहे. तो केव्हां मधुर ऐकावयास येईल किंवा कर्कशहि येईल. नाकाला केव्हां सुगंध येईल किंवा दुर्गंध येईल. नेत्राला केव्हां सुरूप दिसेल किंवा कुरूप दिसेल. परंतु कर्कश शब्द, दुर्गंध व कुरूप हीं अनुक्रमें कान, नाक व डोळे यांनींच सहन केली पाहिजेत. कर्कश शब्द हा कांहीं नाकाचा विषय नाहीं. किंवा दुर्गंध कानाचा विषय नाहीं. ज्याचा जो विषय असेल तो अनुकूल अथवा प्रतिकूल असला तरी तो सहन करण्यांतच पुरुषार्थ आहे. समर्थ रामदासस्वामी "देहेदु:ख हें सूख मानीत जावें" असें म्हणतात व भगवान् श्रीकृष्ण पुढच्याच श्लोकांत "ज्याला विषय व्याकूल करीत नाहींत तोच धीर पुरुष अमृतत्वाला जाण्यास योग्य ठरतो" असें म्हणतात. त्यावरून मृत्युविषयीं केव्हांहि कोणत्याहि प्रसंगीं शोक न करितां विवेक लक्षांत ठेवनच वागलें पाहिजे.

मात्रास्पर्शास्तु कौंतेय शीतोष्णसुखदु:खदा:।
आगमापायिनोऽनित्यास्तांस्तितिक्षस्व भारत ॥ गी. अ. २ श्लो. १४

या श्लोकांत विषयाचें अशाश्वत स्वरूप सांगून पुढें हे विपय ज्याला व्यथा करीत नाहींत तोच पुरुष मुक्त होण्याला पात्र बनतो असें म्हटलें आहे.

यं हि न व्यथयंत्येते पुरुषं पुरुषर्षभ।

समदुःखसुखं धीरं सोऽमृतत्वाय कल्पते ॥ गी. अ. २ श्लो. १५

ज्याला हे येणारे जाणारे विषय व मागील श्लोकोक्त येणाऱ्या जाणाऱ्या कौमारादि अवस्था व्याकूल करीत नाहींत, जो सुखदुःखांत समवृत्तीनें राहतो तोच मोक्षाला जातो; असा या श्लोकाचा भावार्थ आहे.

---

## प्रकरण चौथें

## स्वकर्तव्य हाच यज्ञ व हाच धर्म

गेल्या तीन प्रकरणांमध्यें गीताप्रदीपांतर्गत अमर-प्रदीप हा विषय मांडला. प्रत्येक प्रापंचिक व पुरुषार्थी मनुष्यानें आपल्या अमरत्वाचा विचार त्यांत सांगितलेल्या धोरणानुसार केला पाहिजे. अमर-प्रदीपांतील हे विचार गीतेवरील कोणत्याहि प्राचीन किंवा अर्वाचीन टीकेमध्यें आढळणार नाहींत. आणि यांतच या विषयाची अभिनवता आहे. मृत्यूची भीति व तज्जन्य शोक घालवून आणि आत्म्याचें अमरत्व पटवून देऊन भगवंतांनीं अर्जुनाला नंतर कर्मयोग सांगितला आहे.

मृत्यूचा प्रभावच असा विलक्षण आहे कीं तो नास्तिकाला आस्तिक बनवितो, रंगेलाला विवेक शिकवितो, दुराचाऱ्याला नीतिप्रवण करितो, आणि मुमुक्षूला तत्त्वज्ञान शिकवितो. मृत्युकल्पना कुणाला हंसवील, कुणाला रडवील, कुणाला दिपवील, तर ती कुणाला रमवीलहि ! श्रीकृष्ण व अर्जुन यांची दोस्ती फार, स्नेह अतिशय, व सख्यभक्तींत तर अर्जुनानेंच सर्वांवर ताण केली होती ! अर्जुन व श्रीकृष्ण यांमध्यें अंतर अवघें सहा महिन्यांचें होतें. परंतु असें सर्व असून सुद्धां श्रीकृष्णानें इतर वेळीं अर्जुनाला हें तत्त्वज्ञान कधींहि सांगितलें नाहीं. कारण तत्त्वज्ञान सांगण्याला व ऐकण्याला योग्य प्रसंगच लागतो. त्या दारुण युद्धप्रसंगीं मरणमारणाची दीक्षा घेऊन बद्धपरिकर झालेल्या वीरांना पाहिल्यावरच अर्जुन शोकविव्हल झाला. अर्थात् मृत्यूच्या दाढेंत अठरा अक्षौहिणी सैन्याचा चुराडा होणार हें भीषण

चित्र दाखवूनच श्रीकृष्णांनीं तत्त्वज्ञानोपदेशास प्रारंभ केला. तात्पर्य, गीतेंतील तत्त्वज्ञानाचा उदय मृत्युकल्पनेंतून झालेला आहे. कठोपनिषदांतील ब्रह्म-विद्या तर मृत्यूपासूनच जन्मलेली आहे. फार काय पण गौतमबुद्धाला या मृत्युकल्पनेनेंच राज्यत्याग करावयास लाविलें! रोग व जरादि मृत्यूचीं भावंडें पाहून व स्मशानयात्रा अवलोकन करूनच गौतमबुद्ध तत्त्वविचारांत निमग्न झाला!! असो.

मृत्यूचा विचार करून आपण असें ठरविलें कीं मनुष्य कधींहि मरत नाहीं. मनुष्याच्या स्थूल शरीराचें रूपांतर होतें. सूक्ष्म शरीर देहांतर करितें, आत्मतत्त्व अखंड असतें आणि मनुष्यानें केलेल्या कर्माची परंपरा अखंड चालू असते. जगांत कुणीहि मरत नाहीं, मरण्याचा यत्नहि करीत नाहीं तर प्रत्येक जण आपलें अस्तित्व सारखें टिकविण्याकरितांच धडपडत असतो. अस्तित्वाकरितां ( Existence ) सर्व खटपट आहे, यांत संशय नाहीं. आहे, असणें, असतो यांतच विशेष आहे. म्हणूनच कठोपनिषदा-मध्यें 'अस्तित्येवोपलब्धव्य:' असें सांगितलें आहे. व्यक्ति, जाति, कुटुंब, समाज आणि राष्ट्र या सर्वांचें अस्तित्व कर्तृत्वावर अवलंबून असतें. मानव-समूह हा विद्या, कला, पौरुष, उद्योग, शोध, शास्त्र इत्यादिकांनीं आपलें अस्तित्व जाणवीत असतो. अस्तित्व दाखविणें, तें भासविणें हें क्रियेशिवाय व उद्योगाशिवाय शक्य नाहीं. अस्तित्वाची ओळख पटवून दिल्यावर भगवान् अर्जुनाला कर्तृत्वाचा म्हणजे कर्मयोगशास्त्राचा उपदेश करीत आहेत यांतच औचित्य आहे व सुसंबद्धता आहे.

भगवंतांनीं हा कर्मयोग गीता अ. २ श्लोक ३९ पासून सांगण्यास प्रारंभ केला आहे. श्लोक ४५ ते ५२ मध्यें कर्मयोगशास्त्राचे महत्त्वाचे सिद्धांत सांगितले असून तिसऱ्या अध्यायांत त्याचें व्यावहारिक स्वरूप कथन केलें आहे. चौथ्या अध्यायाच्या प्रारंभीं त्या योगाची परंपरा सांगून पुढें तो विषय अन्य दृष्टीनें अधिक स्पष्ट केला आहे. पांचव्या अध्यायाच्या प्रारंभींच संन्यास मार्गापेक्षां कर्मयोगाचें वैशिष्ट्य सांगितलें आहे. सहाव्या अध्यायांत या शास्त्रास पोषक असा अभ्यासयोग सांगितला असून अठरा अध्यायापर्यंत मुख्य विषयाला पोषक असे ज्ञानविज्ञान, क्षराक्षर, प्रकृतिपुरुष, भक्ति, ज्ञान हे विषय सुबोध पद्धतीनें सांगितले आहेत. शेवटीं

अठराव्या अध्यायांत या कर्मयोगाचा फार उत्कृष्ट असा उपसंहार केला आहे.

गीतेंतील कर्मयोगशास्त्रामध्यें जे विषय आले आहेत त्यांचे मुख्यतः चार भाग पडतात. (१) कर्म म्हणजे काय? (२) तें कां केलें पाहिजे? (३) कोणतें कर्म करावें व कोणतें न करावें? आणि (४) कर्म कसें करावें? या चार प्रश्नांचा विचार या कर्म–प्रदीपामध्यें कर्तव्य आहे.

कर्म म्हटलें कीं धर्मकर्म, स्नानसंध्या, उपास तापास, व्रतवैकल्यें अशी समजूत होते. कारण धर्मशास्त्रामध्यें याच प्रकारचीं आचार कर्में सांगितलीं आहेत. श्राद्धपक्ष, पंचमहायज्ञ, हव्यकव्य हीं नित्यनैमित्तिक कर्में, कामनापूर्वक केलेले नवससायास, यज्ञयाग हीं काम्य कर्में, सुरापानादि निषिद्ध कर्में आणि कृच्छ्रचांद्रायणादि प्रायश्चित्त कर्में मीमांसकांनीं ठरविलेलीं आहेत. परंतु गीतेची दृष्टि इतकी संकुचित नाहीं. गीताग्रंथ हा पंथविशिष्ट, जातिविशिष्ट, व धर्मविशिष्ट नाहीं. अखिल मानव्याच्या कल्याणेच्छेनें उच्च व उदार भूमिकेवरून गीता सांगितली आहे. म्हणून कर्म म्हणजे यच्चयावत् होणारी प्राणिमात्राची हालचाल अशी कर्माची व्याख्या ठरविलेली आहे. खाणें, पिणें, निजणें, बसणें, उठणें, हंसणें, रडणें, श्वासोच्छ्वास करणें, बोलणें, ऐकणें, चालणें, मारणें, लढाई करणें, लिहिणें, विणणें तासणें, मनन करणें, दान करणें, शेती, व्यापार, उद्योग करणें, गप्प बसणें फार काय पण जिवंत राहाणें व मरणें हीं सुद्धां कर्मेंच होत. शरीरानें, मनानें, वाणीनें केलेली कोणतीहि हालचाल म्हणजे कर्म होय. चराचर सृष्टीचा (सचेतन व अचेतन) व्यापार म्हणजे कर्म होय.

गीतेंतील कर्म शब्दाची व्याख्या जशी व्यापक आहे, तशीच यज्ञ व धर्म या शब्दांची व्याख्याहि व्यापक आहे. तीहि याच वेळीं सांगणें उचित आहे. यज्ञ म्हणजे होमहवन, पशुहिंसा, अन्नसंतर्पण, अवभृतस्नान असा लौकिक अर्थ आहे. परंतु गीतेंतील अर्थ तसा नाहीं. गीतेनें जपयज्ञ, द्रव्ययज्ञ, तपोयज्ञ योगयज्ञ, ज्ञानयज्ञ, स्वधाययज्ञ असे प्रकृतिस्वभावानुसार विविध यज्ञ सांगितले आहेत. तसेंच अखिल जग हें यज्ञचक्रानें चाललें आहे असें गीतेच्या तिसऱ्या अध्यायांत म्हटलेलें आहे. सर्वांत व्यापक सिद्धांत

सहयज्ञाः प्रजाः सृष्ट्वा पुरोवाच प्रजापतिः।
अनेन प्रसविष्यध्वमेष वोऽस्त्विष्ट कामधुक्॥ गी. अ. ३. श्लो. १०

या श्लोकांत सांगितला आहे. ब्रह्मदेवानें जेव्हां प्रजा उत्पन्न केली तेव्हां तिजबरोबरच यज्ञ उत्पन्न केला ; आणि प्रजाजनांना सांगितलें कीं तुम्ही दुसरें तिसरें कांहीं करूं नका. तुसच्याबरोबर जो नित्ययज्ञ उत्पन्न केला आहे, त्याची उपासना करा म्हणजे झालें. वाचकहो, हा नित्ययज्ञ म्हणजे मनुष्य--मात्राचें कर्तव्य होय. जन्माला आल्यापासून मरेपर्यंत मनुष्याच्याबरोबर जर कोणता यज्ञ नित्य राहात असेल तर तो कर्तव्ययज्ञच होय.

मनुष्य जन्माला आला कीं त्याला आपल्या कुलासंबंधीं कांहीं कर्तव्यें करावीं लागतात. कुलाप्रमाणें जाति, समाज, धर्म व राष्ट्र–संबद्ध जीं जीं कर्तव्यें असतात, तीं सर्व यज्ञामध्येंच अंतर्भूत होतात. तात्पर्य, मानवदेहाशीं संबद्ध अशीं विविध कर्तव्यें म्हणजेच नित्ययज्ञ होय.

कर्म व यज्ञ यांच्या व्याख्या ठरल्यावर आतां धर्म म्हणजे काय हें पाहूं. गीतेंतील हा शब्द सनातनधर्म, वैदिकधर्म, हिंदुधर्म, ब्राह्मणधर्म अशा अर्थांचा वाचक नाहीं. त्याप्रमाणेंच तो बौद्धधर्म, महंमदीधर्म, ख्रिस्तीधर्म यांचा निषेधक नाहीं. गीतेंतील धर्म म्हणजे **स्वभावनियतकर्म होय!**

श्रेयान्स्वधर्मो विगुण: परधर्मात्स्वनुष्ठितात् ।
स्वधर्मे निधनं श्रेय: परधर्मो भयावह: ।। गी. अ. ३ श्लो. ३५

या श्लोकाच्या मागच्या पुढच्या संदर्भावरून धर्म शब्दाचा अर्थ ठरविला पाहिजे. 'नियत कुरु कर्म त्वं', 'तदर्थं कर्म कौंतेय मुक्तसंग: समाचर', 'तस्मादसक्त: सततं कार्यं कर्म समाचर' इत्यादि पूर्वींच्या श्लोकांत ठरलेलें कर्म कार्य म्हणजे करणीय आवश्यक असें कर्म तूं कर असें म्हटलें आहे. परंतु यापेक्षां या श्लोकाचा अर्थ पुढें अठराव्या अध्यायांत भगवंतांनींच स्पष्ट केलेला आहे.

श्रेयान् स्वधर्मो विगुण: परधर्मात् स्वनुष्ठितात् ।
स्वभावनियतं कर्म कुर्वन्नाप्नोति किल्बिषम् ।। गी. अ. १८ श्लो. ४७

स्वभावानें नियत केलेलें, ठरविलेलें, पत्करलेलें कर्म केल्यानें पाप लागत नाहीं, असा यथें स्पष्ट अर्थ आहे. पुढील श्लोकामध्यें "सहजं कर्म कौंतेय सदोषमपि न त्यजेत्" सहज कर्म म्हणजे जन्माबरोबर उत्पन्न झालेल्या स्वभावानुसार ठरलेलें कर्म सदोष वाटलें तरी त्याचा त्याग करूं नये, असें म्हटलें आहे. मागील दोन श्लोकांमध्यें तर याहिपेक्षां स्पष्ट खलासा आहे.

स्वे स्वे कर्मण्यभिरतः संसिद्धिं लभते नरः ।
स्वकर्मनिरतः सिद्धिं यथा विंदति तच्छृणु ।। गी. अ. १८ श्लो. ४५
यतः प्रवृत्तिर्भूतानां येन सर्वमिदं ततम् ।
स्वकर्मणा तमभ्यर्च्य सिद्धिं विंदति मानवः ।। गी. अ. १८ श्लो. ४६

आपआपल्या कर्मांत रत राहून मनुष्य मोक्ष प्राप्त करून घेतो. आपल्या कर्तव्यांत मग्न राहिलेला मनुष्य कोणत्या मार्गानें मोक्ष प्राप्त करून घेतो तें ऐक. ज्याच्यापासून प्राण्याची प्रवृत्ति (उत्पत्ति) झाली व ज्यानें हें सर्व विश्व व्यापिलें आहे; त्याची पूजा स्वकर्तव्यानें केली म्हणजे मनुष्याला सिद्धि प्राप्त होत असते.

वरील स्पष्टीकरणावरून गीतेंतील धर्म शब्दाचा अर्थ किती व्यापक व खोल आहे हें ध्यानांत येईल. कर्म म्हणजे काय ? कर्म व धर्म हे सर्व शब्द गीतेंत कोणत्या अर्थानें आलेले आहेत, हें पाहिल्यानंतर कर्मयोगांतील कर्म कां केलें पाहिजे ? या प्रश्नाच्या विचाराकडे वळलें पाहिजे.

हें त्रिविध जग म्हणजे एका मोठ्या कर्माचा विपाक आहे. स्वर्ग, मृत्यु व पाताळ असे हे तीन लोक मिळून जगत् आहे अशी कल्पना आहे. या त्रिविध जगाची उत्पत्ति कर्मापासूनच झालेली आहे.

त्रिविध जग आघवें । कर्मफळ हें ।। ज्ञा. अ. १८ श्लो. २३८
देव मनुष्य स्थावर । या नांव जगडंबर ।।
हे तीन्ही तव प्रकार । कर्मफळाचे ।। ज्ञा. अ. १८ श्लो. २३९

या जगाचा अत केव्हां तरी होतोच. ब्रह्मदेवाचा काल संपून सष्टीचा प्रलय झाला तरी कर्म बीजरूपानें शिल्लक असतें व पुनः सष्टि उत्पन्न करितें. ब्रह्मदेव पुनः "धाता यथापूर्वमकल्पयत्" ही सृष्टि यथापूर्व म्हणजे पूर्वीं जशी होती तशी निर्माण करीत असतो. कर्माचा येवढा प्रताप आहे कीं, तें ब्रह्म देवालाहि सुटत नाहीं. ब्रह्मा, विष्णु, महेश हे सर्व कर्मांतच गुंतलेले आहेत. कर्माची गति गहन आहे व चिकाटी विलक्षण आहे. कर्मानेंच वारा वाहतो, पृथ्वी भार सहन करिते, चंद्र सूर्य हे कर्मामुळेंच फेऱ्या घालीत आहेत. हें जगच जर कर्मफळ आहे तर या जगांत जें जें जन्मलें आहे तें तें भूतमात्र कर्म-फळच आहे व कर्माकरितांच जन्मलें आहे. जन्म म्हटला कीं कर्म आलें व कर्म म्हटलें कीं जन्म आला. जन्म व कर्म यांची मोठी गट्टी आहे. आणि हे

दोन शब्द व्याकरणांत सुद्धां सारखेंच चालतात. यास्तव जन्मलेल्या मनुष्याचें शरीरकर्तव्य ओघानेंच आलें आहे.

जग हें कर्ममय आहे तसेंच शरीरहि कर्ममय आहे. पंचज्ञानेंद्रियें, पंच-कर्मेंद्रियें, मन, बुद्धि, प्राण इत्यादि मिळून हें शरीर आहे. या सर्वांची हालचाल म्हणजेच कर्म होय. ही हालचाल आहे तोंवरच शरीर जिवंत असतें. तें थांबलें कीं, ग्रंथ आटपला असें आपण म्हणतों.

या कर्ममूलक जगांत उत्पन्न झालेल्या देहधारी मनुष्यानें जगाचा हेतु लक्षांत घेऊन सारखें कर्म केलें पाहिजे. मानवी शरीर जेथें जन्माला येतें तेथील कुल, जाति, समाज, धर्म व राष्ट्रविषयक कर्तव्यें त्याच्या मागें लागलेलींच आहेत व त्याचकरितां त्याचा जन्म आहे. इतर देहापेक्षां नरदेहाचें महत्त्व जें अधिक वर्णन केलें आहे, त्याचें कारण हा देह कर्तव्याकरितां आहे हें होय. इतर योनी ह्या भोगयोनी आहेत; परतु या कर्मभमींतील मनुष्ययोनी ही केवळ कर्तव्याकरितां आहे.

शरीर हें कर्मफल आहे, ही भूमी कर्मभूमीच आहे म्हणून त्यानें कर्तव्यें करावींत हें खरें; परतु एकादा ऐंदी फुकटखाऊ म्हणेल कीं अहो, “ कशाला ही कर्माची कटकट, व्याप तितका संताप, उगाच स्वस्थ बसा हरी हरी म्हणत” तर याला गीतेचें उत्तर अगदीं सडेतोड आहे. (१) कोणीहि मनष्य क्षणभरसुद्धां कर्माशिवाय राहूं शकत नाहीं. (२) तुझ्या शरीराचा व्यापारहि कर्माशिवाय चालणार नाहीं. (३) कर्माचा सर्वथा त्याग देहधारी माणसाला शक्य नाहीं.

मनुष्य जर अगदीं स्वस्थ बसेल तर त्याची शरीरयात्रा चालणार नाहीं. आणि स्वस्थ बसला असतांसुद्धां कर्म घडत असतेंच. एकादा मनष्य ‘ मी कांहीं करीत नाहीं ’ असें म्हणाला तर त्यामुळें त्याच्या डोळ्यांतील दृष्टि गेली असें होत नाहीं, कानांतील ऐकण्याची व नाकांतील गंध घेण्याची शक्ति मुळींच जात नाहीं. श्वासोच्छ्वास चालू असतो. मनाच्या सर्व वृत्ति धांवपळ करीतच असतात. पाय चालण्याचें विसरत नाहींत, झोंप येते, भूक लागते व मलमूत्रविधि होतात. इतके सर्व व्यवहार म्हणजे कर्मच होय. हीं सर्व जोंवर सुटलीं नाहींत तोंवर ‘ मी स्वस्थ बसतों, कांहीं करीत नाहीं ’ असें म्हणणें हा शुद्ध दंभ होय.

मनुष्य जोंवर जिवंत आहे तोंवर कर्मत्यागाचें वेड व्यर्थ आहे. अग्नि

आपल्या उष्णत्वाला कंटाळेल, पाणी आपला ओलसरपणा सोडील, पृथ्वी गंधरहित होईल, दिवा प्रकाशाचा द्वेष करील, घट मृत्तिकेवाचून व पट तंतू-शिवाय राहूं शकेल तरच मनुष्य कर्माशिवाय राहील. म्हणूनच ज्ञानेश्वरांनी असल्या ऐदी व फुकटखाऊ लोकांना गांवढळ असें म्हटलें आहे.

आणि हां गा सव्यसाची। मूर्ति लाहोनि या देहाची।
जे खंती करिती कर्माची। ते गांवढे गा॥ ज्ञा. अ. १८.

मनुष्यरूपानें जन्म घेऊन कर्तव्याचा कंटाळा करणें हें ताकाला जाऊन मोघा दडविण्याइतकें हास्यास्पद होय. कर्म कां केलें पाहिजे याचें हें एक कारण भगवंतांनीं सांगितलें. आतां दुसरें कारण सांगतात त्याचा विचार करूं.

मानवी शरीर हें त्रिगुणात्मक प्रकृतीचें आहे. मनुष्यप्राणी त्या प्रकृतीच्या म्हणजे सत्वरजतम या गुणांच्या आधीन आहे. मनष्याचे गुण, कर्म, व प्रकृति हीं त्याला मुळींच स्वस्थ बसूं देत नाहींत म्हणन कर्म हें आपल्या इच्छेप्रमाणें सोडतां येत नाहीं व धरितां येत नाहीं. कर्म पराधीनपणानें म्हणजे प्रकृतिगुणानें सारखें उत्पन्न होत असतें. यास्तव ‘ कर्म सोडतों’ म्हणणें हा शुद्ध आग्रह आहे.

कार्यते ह्यवशः कर्म सर्वः प्रकृतिजै र्गुणैः। गी. अ. ३ श्लो. ५

प्रकृतीपासून उत्पन्न झालेले गुण परतंत्र झालेल्या प्रत्येक जणाकडून कर्म करवून घेत असतात. आगगाडीमध्यें बसलेला मनुष्य अगदीं निश्चल असला किंवा निजला तथापि गाडीच्या गतीबरोबर तोहि गतिमान् होतो. गाडी थांबेपर्यंत तो परतंत्र आहे. झाडाचें सुटलेलें पान वाऱ्याच्या झुळके-बरोबर पारतंत्र्यामुळेंच पाहिजे तिकडे जातें. त्याप्रमाणें प्रकृतीचा वेग जिकडे खेचील तिकडे मनुष्यानें गेलेंच पाहिजे. मनुष्य ज्ञानवान् झाला तरी त्याची प्रकृति त्याला कर्म करावयाला लावतेच. सुंभ जळालें तरी पीळ जळत नाहीं. हेंच तत्त्व ज्ञान्याच्या प्रकृतिधर्माला लागूं पडतें. तात्पर्य, प्रकृतीच्या आधीन होऊन कर्म करण्यापेक्षां तिला आपल्या ताब्यांत ठेवून योग्य कर्म करणें हेंच श्रेयस्कर होय.

श्रीकृष्णांनीं अर्जुनाला युद्ध (कर्म) करणें कसें न्याय्य आहे, अवश्य आहे व अपरिहार्य आहे हें निरनिराळ्या तऱ्हेनें सांगितलें. शेवटीं तूं जर हट्टानें व घमेंडीनें यद्ध करणारच नाहीं असें म्हणशील तर तो तुझा निश्चय फुकट आहे असें त्याला बजावलें आहे.

यदहंकारमाश्रित्य न योत्स्य इति मन्यसे ।
मिथ्यैष व्यवसायस्ते प्रकृतिस्त्वां नियोक्ष्यति ।। गी. अ. १८ श्लो. ५९ ।।
स्वभावजेन कौंतेय निबद्धः स्वेन कर्मणा ।
कर्तुं नेच्छसि यन्मोहात् करिष्यस्यवशोऽपि तत् ।। गी.अ.१८ श्लो.६०।।

केवळ हट्टानें 'मी लढणार नाहीं' असें जर तूं मानशील तर तो तुझा निश्चय व्यर्थ आहे. तुझी प्रकृतीच तुला युद्धकर्माकडे खेचून नेईल. अर्जुना (तूं क्षत्रिय आहेस, तुझा स्वभाव यद्ध करण्याचा आहे) स्वभावकर्मानें तूं बांधला गेला आहेस. मोहाला वश होऊन जें कर्म तूं करूं इच्छित नाहींस तें प्रकृतीच्या बलात्कारानें करावें लागेल. तात्पर्य, प्रकृतीच्या रेटयामुळें कर्म न करितां तें दडपण लक्षांत घेऊन स्वयंस्फूर्तीनें कर्म करणें यांतच मनुष्य-पण व शहाणपण आहे.

'मनुष्य आपल्या वळणावर जातो,' 'स्वभावाला औषध नाहीं,' 'मूळ स्वभाव जाईना। त्याचें येळकोट राहीना,'!।। 'कथा मूळपदावर आली,' 'पुन्हां पालूपद सुरूं झालें'. इत्यादि वाक्य प्रयोग प्रकृतीच्या प्रभा-वाचें सामर्थ्यंच दाखवितात. मनुष्य अगर कोणताहि प्राणी मूळ स्वभावावर कसा जातो, हें कांहीं उदाहरणें देऊन अधिक विशद करितों.

एकदां खोकड व बोका यांची गांठ पडली. स्नेह जमला, आत्मो-न्नतीच्या गोष्टी निघाल्या. उभयतांचें विचारें हिंसा करूं नये असें ठरलें. दोघे बोलत निघाले तों एक डौलानें धांवणारा कोंबडा खोकडानें पाहिला व एक लठ्ठ उंदीर बोकोबांच्या दृष्टीस पडला. झालें, बोलणें थांबलें, निश्चय बाजूला राहिला व दोघांनीं स्वभावानसार आपलीं भक्ष्यें गट्ट केलीं.

वाई येथें दरसाल त्रिपुरी पूर्णिमेस बाणांची लढाई होते. दोन पक्ष परस्परांवर पेटते बाण सोडून एकमेकाला घाबरे करितात. त्यामुळें पुष्कळ वीर भाजतातहि. समरवीरांशिवाय प्रेक्षकहि बरेच असतात. त्यांत म्हातारे-कोतारेहि बसलेले असतात. परंतु आपल्या आळीकरांचा पराभव होतो असें कळतांच वृद्धांनाहि स्फुरण चढतें, जुन्या गोष्टी सांगून तरुणांना ते उत्तेजित करतात व स्वतः घोंगडयाचें मुस्कट मारून आपल्या आळीकरांना बाणांचीं जुडगीं लपवून पोंचवितात. तात्पर्य, जरठांचा युद्धोत्सुक स्वभाव त्या वेळीं त्यांना स्वस्थ बसूं देत नाहीं.

प्रसिद्ध गवई रहिमतखान हे मोठे लहरी, त्यांना गाण्याबद्दल आग्रह केला तर ते कधींहि गात नसत. त्यांचें गायन ऐकण्याकरितां युक्ति योजावी लागे. एकाद्या साधारण गवयाला त्यांचेपुढें गावयास लावावें, व त्यानें मुद्दाम बेसुर गावें. म्हणजे त्यांचें पित्त खवळें! "गवई आहेस कां हजाम आहेस, गातोस कां रडतोस?" असें म्हणून ते रागानें स्वतः गाऊं लागत व श्रोत्यांची इच्छा पूर्ण होई. सारांश रागामुळें त्यांचा प्रकृतिस्वभाव प्रगट होई व लोकांना गायनाचा आनंद मिळे.

एका राजाला सारख्या मुलीच होत होत्या. शेवटीं त्यानें राणीला ताकीद दिली कीं यापुढें मुलगा झाला तर ठीक नाहीं तर तोफेच्या तोंडी देईन. राणी धोरणी होती. कांहीं दिवस गेले असें कळतांच तिनें इतर गरोदर स्त्रियांची चौकशी केली. राजधानींतील एक तेलीण बरोबर आपल्या इतक्याच दिवसांची आहे व तिला सारखे मुलगेच होत आहेत, असा तिला शोध लागला. स्वतःला मलगा होणारच नाहीं अशी तिची खात्री होती. म्हणून तिनें प्रसूत होतांच तेलणीच्या मुलाशीं अदलाबदल करण्याची योजना केली. कर्मधर्मसंयोगानें राणी व तेलीण या दोघी एकाच वेळीं व एकाच दिवशीं बाळंत झाल्या. काय झालें आहे हें न पाहतां फडक्यांत गुंडाळून त्यांनीं मुलांची अदलाबदल केली. राणीनें मुलगा झाला असें राजाला कळविलें. चमत्कार असा कीं त्या खेपेस राणीलाहि मुलगाच झाला होता. परंतु राजपुत्र तेल्याचे घरीं व तेल्याचा मुलगा राजवाड्यांत अशी स्थिति झाली. मुलगा रांगू लागला, चालूं लागला, खेळूं लागला; पण तो राजपुत्राला शोभेसे खेळ खेळेना व हट्ट करीना. तो बैल होऊन घाण्याचा खेळ खेळे व भाकरी व तेल खाण्यास मागें. तो प्रकार पाहून राजा कंटाळला व इकडे तेली हा त्या राजपुत्राची वृत्ति पाहून "कसली अवलाद आहे" म्हणून वैतागला!! राजा एके दिवशीं राणीच्या महालांत आला व हें कारटें असा घाणा कां घालतें म्हणून विचारूं लागला. राणीनें मरणाच्या भीतीमुळें आपणास काय करावें लागलें हें सांगितलें. राजानें शांतपणानें त्या तेल्याचा शोध केला व त्याचा मुलगा त्याला दिला. तेली म्हणाला, माझ्या घरचें हें पोर तुमचें असेल तर पाहा. तें शिकार करतें, घोडा मागतें, लढाई करितों असें म्हणतें." राजानें राजपुत्र घरीं आणला व त्याचें कोडकौतुक पुरविलें. सर्व प्रकारच्या ऐषआरामांत

असतां तेल्याचें पोर आपल्याच वळणावर गेलें ! ! एवंच स्वभाव जात नाहीं हें खरें.

कर्म कां केलें पाहिजे, याचीं दोन कारणें. कर्माशिवाय जिवंत राहणें अशक्य व मनुष्य प्रकृतिपराधीन आहे येथवर सांगितलीं. या दोन कारणांशिवाय श्रीकृष्णांनीं गीतेच्या तिसऱ्या अध्यायांत आणखी कांहीं कारणें सांगितलीं आहेत. त्यांपैकीं कांहीं देऊन हें प्रकरण संपवितों.

१. हें सृष्टिचक्र यज्ञमूलक आहे, तें चालण्यास प्रत्येकानें आपापलें कर्म केलें पाहिजे. स्वत: कांहीं न करतां जो दुसऱ्याच्या कर्माचा उपभोग घेतो, तो चोर होय.

२. ज्ञानीसुद्धां लोकसंग्रहार्थ सामान्य जनांचा बुद्धिभेद होऊं नये म्हणून अनासक्त बुद्धीनें कर्मच करितो. मग इतरांनीं तर तें अवश्य केलें पाहिजे.

३. एकाद्यानें कर्म न केलें तर ती उणीव भरून काढण्याकरितां कुणाला-तरी तें करावें लागतेंच. त्यामुळें वर्णसंकर होतो. आणि लोकांना त्रास होतो.

४. ईश्वर स्वत: आळस देण्यापुरताहि न थांबतां कर्मामध्येंच निमग्न असतो. ईश्वर जर तसें न करील तर जग बुडेल, मनुष्यावरहि त्याच्या शक्तीच्या मानानें हें जगत्चक्र चालविण्याची जबाबदारी आहे, म्हणून त्यानेंहि कर्म केलेंच पाहिजे.

कर्म कां केलें पाहिजे याचीं कारणें हीं आहेत. कोणतें कर्म करावें व कोणतें न करावें याचा विचार पुढील प्रकरणांत करूं.

## प्रकरण पांचवें

# स्वकर्तव्य–कुसुमानेंच ईश्वराचें पूजन करा

चवथ्या प्रकरणांत मनष्यमात्रानें कर्म कां केलें पाहिजे याचा विचार झाला. प्रस्तुत प्रकरणांत कोणतें कर्म करावें व कोणतें करूं नये याचा विचार करूं.

एकादा आक्षेपक असें म्हणेल कीं "अहो चोरी करूं नये, खरें बोलावें, खाटें बोलूं नये, हिंसा करूं नये, प्रत्येकाशीं प्रेमानें वागावें हें ठरलेलेंच आहे, यांत सांगावयाचें तें काय ? किंवा ब्राह्मणानें अध्ययन–अध्यापन, क्षत्रियानें संरक्षण, वैश्यानें व्यापार व शूद्रानें कलाकौशल्य इत्यादि कर्मे करावीं, त्याविरुद्ध वागूं नये असाच शास्त्राचा दंडक आहे. अर्थात् त्यापेक्षां गीता अधिक काय सांगणार ? " परंतु वाचकहो, खरोखरच गीता फार उच्च व निराळें तत्त्व सांगत आहे. अखिल जगांतील मानवांच्या कर्माचा विचार गीतेनें केला आहे. त्यावरून गीताकारांची प्रतिभा व व्यापक दृष्टि केवढी होती याची कल्पना येते.

जगामध्यें त्रिविध प्रकृतीचीं माणसें असतात. जगाच्या धारणपोषणाला सात्त्विक, राजस व तामस अशा सर्व प्रकारच्या कर्मांची आवश्यकता आहे. प्रत्येक मनुष्याचा पिंड वेगळा, स्वभाव निराळा व अभिरुचि भिन्न अशी असते. म्हणून प्रत्येकानें जें त्याला सहज, व स्वभावधर्मानुरूप उत्तम करितां येईल तें करावें असें गीता म्हणते. 'नियतं कुरु कर्म त्वं' (३।८) तूं आपलें ठरलेलें कर्म कर, 'स्वभाव नियतं कर्म कुर्वन्नाप्नोति किल्बिषं' (१८।४७) "सहजं कर्म कौंतेय सदोषमपि न त्यजेत्" (१८।४८) स्वभावाला अनुरूप असें कर्म करणाऱ्याला पाप लागत नाहीं. सहज प्राप्त झालेलें कर्म सदोष असलें तरी सोडूं नये. प्रकृतिज गुणांनीं कर्म होत असतें. स्वभावज कर्म करण्यास आळस करूं नये, असें गीतेंत वरचेवर म्हटलेलें आहे. सहज, स्वभावज, प्रकृतिज व नियत, इत्यादि शब्दांतील सखोलता स्पष्ट करण्याकरितां त्यांची थोडी फोड करितों.

चांभाराच्या मुलानें जोडे शिवावेत, कुंभाराच्या मुलानें गाडगीं घडावींत, सोनाराच्या मुलानें दागिने करावेत, ब्राह्मणाच्या मुलानें पोथी वाचावी अगर कारकुनी करावी. कारण जो ज्या जातींत जन्मला तेथील जें कर्म

तेंच सहजकर्म होय व तेंच त्यानें केलें पाहिजे अशी कल्पना आहे. परंतु जातिधर्मानुरूप कर्म व जन्मसंस्कारानुरूप कर्म यांमध्यें फरक पडूं शकतो. गवयाच्या मुलाला गवयीच व्हावें असें वाटत नाहीं. वकीलाचा मुलगा वकीलीच करूं शकेल असें नाहीं. चांभाराचा मुलगा उत्तम चित्रकार होईल, व न्हाव्याचा मुलगा कदाचित् उत्तम शस्त्रवैद्य होईल. तेव्हां जातिधर्मानुकूल कर्मापेक्षां स्वभावसंस्कारानुरूप कर्म करणें अधिक श्रेयस्कर असें गीता सांगते.

## ब्राह्मणाच्या मुलानेंहि तलवार गाजवावी

ब्राह्मणाच्या मुलाचें जातिस्वभावकर्म पुरोहिताचें आहे. परंतु त्याला सैन्यांत जाऊन पराक्रम गाजवावा असें वाटत असेल, तर तें त्यानें खुशाल करावें. मग घरच्या पोथ्यांची वाट काय करूं ही काळजी नको. पौरोहित्याची आवड असणाऱ्या दुसऱ्या मनुष्याला घरांतील पोथ्या, पुस्तकें दिलीं तरी चालेल. एकाद्या बनियाच्या मुलाला तागडी तुकाप्पाचें कर्म करण्यापेक्षां विद्वान् होऊन संशोधन करावें असें वाटलें तर तें त्यानें करावें. कारण जें कर्म त्याला उत्तम करतां येईल त्यामुळेंच त्याचें व समाजाचें अधिक कल्याण होईल. माळ्याच्या मुलाला वनस्पतिशास्त्रज्ञ व्हावें असें वाटणें वावगें नाहीं व त्याचे तसे प्रबल संस्कार असले तर त्यानें माळ्याचा व्यवसाय खुशाल सोडावा, त्यांत राष्ट्राचें अनहित नाहीं. तात्पर्य, जातिप्रधान धर्मापेक्षां अगर आचारप्रधान धर्मापेक्षां स्वभावप्रधान धर्माला गीता फार महत्त्व देत आहे.

गीतेमध्यें वर्णाश्रम, चातुर्वर्ण्य हे शब्द आले आहेत. व प्रत्येकानें आपापलें कर्म करावें असें म्हटलें आहे; परंतु त्याचा अर्थ केवळ चारच वर्ण अगर जाति असा नाहीं. तत्कालीन समाजस्थितीचा तो उल्लेख आहे इतकेंच. गीता ही सूक्ष्मपणें मनुष्यमात्राच्या स्वभावाचें व अनेक व्यवहारांचें निरीक्षण करून ज्याला **जें उत्तम व सहज संस्कारानुरूप करितां येईल तेंच त्यानें करावें** असें सांगते.

प्रत्येक मनुष्याला आपल्या स्वभावाचें आणि अंगीं सुप्त असलेल्या शक्तींचें योग्य ज्ञान असतें असें नाहीं. निदान पहिल्या पंचविशींत हें ज्ञान होत नाहीं. अशा वेळीं, शास्त्र, आप्तवाक्य, वाडवडिलांचा अनुभव, आपली परिस्थिति यांच्या साहाय्यानें त्यानें आपलें कर्म ठरवावें. आपल्या मनाचा कल, आनुवंशिक संस्कार व परंपरा यांचा शक्य तों मेळ घालून कार्याला प्रारंभ केला

म्हणजे मनुष्य त्या क्षेत्रांत नांव काढतो व त्या द्वारें समाजाची आणि राष्ट्राची सेवा उत्तम करितो.

## स्वभाव नियतकर्म हीच कामधेनु

स्वभावनियतकर्म म्हणजेच विहित कर्म होय व तें विहित कर्म करणें हाच स्वधर्म होय. प्रत्येकानें या विहित कर्मांत अगदीं दंग असलें पाहिजे आणि धैर्यानें व उत्साहानें कार्यें करीत शंभर वर्षें जगण्याची महत्त्वाकांक्षा बाळगिली पाहिजे. बालक जसें मातेशीं अनन्य असतें, मासा जसा पाण्याशीं अनन्य असतो, तसें प्रत्येकानें स्वकर्माशीं अनन्य असावें, असाच गीतेचा आदेश व उपदेश आहे. स्वकर्मांत दोष आहेत व इतर कर्मे निर्दोष आहेत असें मनुष्याला केव्हां केव्हां वाटतें, याचें कारण तो स्वकर्माशीं अनन्य नसतो, हेंच होय. **स्वकर्मामध्यें दोष असले तर तें निर्दोष करण्याचा यत्न धिमेपणानें करावा.** परंतु स्वकर्म सदोष समजून वैतागानें कर्मत्याग करणें हा शुद्ध वेडेपणा होय. मोहानें, अथवा शरीरक्लेशभयानें शरीरत्याग करून परकर्म स्वीकारल्यास पायाचें काम डोळ्यांना करावें लागेल व नाकाचें काम कानाकडे येईल ! शिवाय कोणतेंहि काम चांगलें न होतां दुःख तेवढें अधिक होईल व पश्चात्ताप करण्याचा प्रसंग येईल. यास्तव स्वभावनियतकर्म हीच कामधेनु व तीच आपली कल्पलता असें समजून प्रत्येकानें वागलें पाहिजे.

मनुष्यसमाजांत हजारों प्रकारचीं कार्यें आहेत. सर्व कामें लोकव्यवहाराला पाहिजेत. शेती, व्यापार, कारागीर, कारखाने, शाळा, कचेऱ्या, दुकानें, सुतारी, सोनारी, लोहारी, इ. सर्व समाजाला पाहिजेत. शिपाई, चांभार, न्हावी, भंगी, कोळी, कोष्टी, कारकून यापैकीं अमुक एक नको असें म्हणतां येणार नाहीं. सर्वांची जरूरी सारखी आहे. व सर्वांची योग्यता सारखी आहे. शिपाई म्हणेल कीं, 'माझ्या कर्मांमुळें लोकांना त्रास होतो म्हणून मी तें सोडतों व दुसरें पत्करतों' तर ती चुकी आहे. हिशेब करणाऱ्याचाच धंदा चांगला असें समजून जर झाडलोट करणारा आपलें कर्म सोडील तर त्यांत त्याचा नैतिक अधःपात आहे व समाजाचेंहि फार नुकसान आहे. रणांगणावर गेलेला क्षत्रिय कत्तलीला भिऊन जर पळून येईल व भीक मागेल तर त्याची किंमत काडीयेवढीहि नाहीं. अर्जुनाला हाच मोह झाला होता. मोहानें व क्लेशभयानें तो युद्धकर्माचा त्याग करून ब्राह्मणकर्माचा

अंगीकार करतों असें म्हणत होता. श्रीकृष्णांनीं त्याला सांगितलें कीं "सर्वारंभा हि दोषेण धूमेनाग्निरिवावृताः ॥ ( १८।४८ ) " ज्याप्रमाणें अग्नीबरोबर धूर असावयाचाच त्याप्रमाणें सर्व कर्माच्या बरोबर दोषहि राहिलेले आहेतच.

प्रत्येक कर्मांत दोष आहेत, एकहि कर्म निर्दोष नाहीं; अशी वस्तुस्थिति असतां मनुष्याचा स्वभाव असा विचित्र आहे कीं, त्याला स्वकर्म सोडून परकर्म स्वीकारण्याचा मोह अनेक वेळां होत असतो. स्वकर्मांत त्याला दोष दिसतात व परकर्मांत म्हणजे परधर्मांत त्याला गुण दिसतात. मनुष्य जर वेळोवेळीं असें कर्मांतर अथवा धर्मांतर करूं लागेल तर त्याच्याकडून ह्या जगांत कांहींहि होणार नाहीं. क्षुद्र आशा व अल्प स्वार्थाकरितां मनुष्य जर स्वकर्म सोडूं लागला तर त्यांत मनुष्याचें मनुष्यत्व तें काय राहिलें ? दूरवर विचार केल्यास जगांतील सर्व कर्में दोषांनींच व्याप्त आहेत. शेतकऱ्याला वाटतें कीं आपलें जिणें फार त्रासदायक आहे, तेव्हां हमालीच बरी. हमालाला वाटतें, शेटचाच्या दुकानांत हमाली करण्यापेक्षां शेटच झालेलें बरें. शेटजी हा दुकानांत लोडा-तक्याला टेकून बसतो खरा; पण त्याला असें वाटतें कीं हा सारखा ९८-९९ चा व्यवहार करण्यापेक्षां ब्राह्मणाचेंच कर्म बरें. ब्राह्मणाला सत्तायुक्त असलेली क्षात्रवृत्ति बरी असें वाटतें. तर क्षत्रियाला नेहमी हातांत शिरकमल घेऊन वागण्याचा कंटाळा येतो. एवंच, प्रत्येकाला स्वकर्मांतील दोष दिसतात व परकर्मांतील गुण दिसत असतात. जगांतील प्रत्येक व्यवहाराकडे दोषिक दृष्टीनें पाहिल्यास जगांत कांहींच करूं नये, असें म्हणण्याची आपत्ति येईल. ग्रंथकाराला वाटतें कीं विक्रेत्याचा धंदा बरा, विक्रेत्याला वाटतें कीं प्रकाशकाचा धंदा बरा; पोष्ट खात्यांतील लोकांना रेल्वे खात्यांतील गुण दिसतात व रेल्वेच्या नोकरांना पोष्टांतील व्यवस्थितपणा व पेन्शन हीं दिसतात. सरकारच्या निरनिराळ्या खात्यांतील नोकर, गिरणीकामगार आणि इतर अन्य व्यवहारांतील लोक ह्या सर्वांना स्वकर्माकडे दोषिक दृष्टीनें पाहण्याची संवयच लागल्यामळें त्यांना स्वकर्मापेक्षां परकर्म उत्तम असें वाटत असतें. गीतेनें ह्या दुर्बल वृत्तीचा स्पष्ट निषेध केला आहे. आपला स्वभाव, परंपरा, कुल, जाति व परिस्थिति ह्या दृष्टीनें जें वांटचाला आलें असेल तेंच कर्म सर्वशक्ति एकवटून करावें असें गीतेचें सांगणें आहे.

## स्वभावानुरूप कर्म म्हणजे स्वेच्छाचार नव्हे

प्रत्येक मनुष्यानें आपल्या स्वभावसंस्कारानुरूप कर्म करावें म्हणजें पाहिजे तसें वागावें, मन:पूत आचरण करावें ज्यावेळीं जी लहर येईल तसें करावें; असा मात्र याचा अर्थ नव्हे. प्रकृतिधर्माप्रमाणें वागावें म्हणजे स्वेच्छाचारी व्हावें असें जर कुणी म्हणेल तर तो भ्रम आहे. शास्त्र हें नियमनाकरितां आहे; मानवी स्वभाव स्वेच्छाचारी असला तर त्याला आळा घालण्याकरितांच शास्त्राची प्रवृत्ति होते. प्रकृतिधर्माप्रमाणें पाय जर चालणार आहेत तर आडरानांतून न जातां सरळ मार्गानें जावें असें शास्त्र म्हणतें. डोळे कांहीं तरी पाहाणार, कान कांहींतरी ऐकणार तेव्हां शास्त्र असें सांगतें कीं, तुझ्या डोळ्यांना ईश्वराचें वैभव दाखीव, निसर्ग दाखीव, कर्त्या पुरुषांचें व सत्ग्रंथांचें दर्शन घडीव. आणि कानांनाहि वाईटसाईट शब्द, शृंगार, बीभत्सरसप्रधान काव्यें न ऐकवितां त्यांचेकडून सुविद्या व सत्-शास्त्रश्रवण घडीव. सर्व कर्मेंद्रियांना अनियंत्रित सोडण्यापेक्षां सुयंत्रित करणें योग्य असें शास्त्र सांगतें.

निसर्गधर्मानुरूप कामविकारशमनार्थ परस्त्रीशीं संभोग करण्यापेक्षां धर्मपत्नीभोग इष्ट नव्हे काय ? शरीर चालण्याकरितां कांहींतरी व कुठेंतरी खाण्यापेक्षां व्यवस्थितपणें मिळवून भोजन करणें योग्य नव्हे काय? मनुष्याला पशुसारखें वागावयाला पाहिजेच आहे, पण आजपर्यंत मानवजातीनें अनेक प्रयोग करून अनुभव घेऊन मनुष्याला कांहीं नियम व बंधनें घालून दिलीं आहेत. हीं बधनें म्हणजेच हें यज्ञचक्र आहे. ह्या चक्राच्या गतीमध्यें प्रत्येकानें आपआपल्या स्वभावाप्रमाणें समाविष्ट झालें पाहिजे व असें समाविष्ट होणें म्हणजे विहित कर्म उत्साहानें करणें होय.

स्वभावनियतकर्म बंधनपूर्वक अगदीं यंत्रासारखें केलें पाहिजे, असें श्रीकृष्ण आपल्या उदाहरणानेंच सांगत आहेत. परमेश्वर जांभई देण्यापुरतासुद्धां थांबत नाहीं. त्यानें हें जगत् यंत्रासारखें सदैव चालविलें आहे. मनुष्यानें त्याचें अनुकरण केलें पाहिजे. चंद्र, सूर्य, पृथ्वी इत्यादिकांची निरंतर व बिनचुक गति ईश्वराचीं कर्में व्यक्त करिते. ईश्वराची प्रत्येक सृष्टि यंत्राप्रमाणें जशी काम करिते त्याप्रमाणें मनुष्यानें बुद्धिपूर्वक पण यंत्राप्रमाणें नियमित काम केलें पाहिजे. मनुष्याची विशिष्टता यंत्रगतीचा अनादर

करून स्वच्छंदी बनण्यांत नाहीं. परंतु ज्ञानपूर्वक त्या गतीचें अनुकरण करण्यांतच आहे. मनुष्य जर या ईशसृष्टीचें अनुकरण करण्याचें कौशल्य दाखवील तरच तो पुरुषार्थी समजावा.

प्रत्येकानें आपल्या लहरीप्रमाणें व मनाला वाटेल तसें न वागतां स्वभाव-धर्माप्रमाणें विहित कर्म बंधनपूर्वक यंत्राप्रमाणें करावें असें वर सांगितलें, पण त्या विहितकर्मामध्यें जेव्हां हें करूं कीं तें करूं असा लढा उत्पन्न होतो तेव्हां मनुष्यानें कसें वागावें हा मोठा प्रश्न आहे. प्रत्येक मनुष्याला कुल, जाति, समाज, राष्ट्र व धर्मसंबद्ध विविध कर्तव्यें करावीं लागतात. प्रत्येक कर्म करितांना तें जेवढ्या उदात्त, उच्च व व्यापक हेतूनें करतां येईल तसें केलें पाहिजे.

## कुटुंब व समाज यांपेक्षां राष्ट्राच्या हिताला विशेष तत्पर राहा

ब्राह्मणामध्यें आपल्याच पोटजातीची मुलगी करण्याची परंपरा आहे. कुलदृष्ट्या हें इष्ट असलें तरी पाहिजे त्या ब्राह्मण पोटजातींतील मुलगी पसंत करणें हें जाति व समाजदृष्ट्या आज अधिक इष्ट आहे असें समजावें. घरांतील वडील मंडळींचे संस्कार सोवळ्या ओवळ्याचे असले तथापि ब्राह्मण तरुणानें अस्पृश्यांचा विटाळ न मानणें हेंच समाज व राष्ट्रदृष्ट्या अधिक इष्ट आहे, म्हणून अस्पृश्यतानिवारण केलें पाहिजे. त्या कामांत जरी घरांतील सोवळ्या वडील मंडळींना थोडें वाईट वाटलें तरी चालेल. जावई-बुवाला सफेत पांढरा हलवा पाठविण्याचा पत्नीचा हव्यास असला तरी त्या-करितां परदेशी साखर न आणतां राष्ट्रहितदृष्टीनें देशी साखरच घेऊन जसा होईल तसा हलवा पाठविणें हेंच उचित होय. विवाहामध्यें कांहीं व्यक्तींच्या समाधानार्थ अहिंदूचा बँड लावण्यापेक्षां हिंदूंचीच मधुर व मंगल वाद्यें वाज-विणें अधिक प्रशस्त होय. एक मनुष्य उत्तम चित्रकार आहे. त्याचे घरीं बायको अत्यंत आजारी आहे. त्याच वेळीं त्याच्या गांवीं एक चित्रकारांची परिषद भरणार आहे व अमेरिकेंत जगांतील उत्तम चित्रकारांच्या चित्रांचें एक मोठें प्रदर्शन उघडणार आहे. त्या प्रसगीं त्यानें आसन्नमरण पत्नीची शुश्रूषा करावी कां परिषदेस उपस्थित राहावें कां अमेरिकेंत उघडणाऱ्या प्रदर्शनाकरितां चित्र तयार करावें? या सूक्ष्म प्रसंगीं राष्ट्रहिताच्या दृष्टीनें त्यानें वागलें पाहिजे. परिषदेस तो न गेला तर थोडें वैगुण्य भासेल. पत्नीची

सेवा नीट न झाली तर ती कदाचित् प्राणासहि मुकेल हें खरें आहे. परंतु जगांतील उत्तम चित्रांत जर याचें चित्र उत्तम ठरण्याचा प्रसंग आहे व त्या द्वारें त्याच्या राष्ट्राच्या चित्रकलेचा उद्धार होणार आहे तर त्यानें कुटुंब व समाज यांच्या अडचणीकडे दुर्लक्ष करून ज्या कार्यामुळें राष्ट्राचा लौकिक वाढेल तेंच केलें पाहिजे. **व्यष्टिहितापेक्षां समष्टिहिताकडे अधिक लक्ष** दिलें पाहिजे व **समाजहितापेक्षां राष्ट्राच्या कल्याणाला अधिक मान** दिला पाहिजे.

हें कर्माकर्मविवेचन फार गहन, सूक्ष्म व कठीण आहे. त्याचा साकल्यानें येथें विचार करणें अशक्य आहे. मानवी आयुष्यांत पुष्कळ कठीण प्रसंग येतात त्या वेळीं त्यानें विचारपूर्वक उदात्त हेतूनें समष्टिहिताचें कर्म करावें हेंच सामान्य धोरण वर दिग्दर्शित केलें आहे.

मनुष्यानें कुल, जाति, समाज, व राष्ट्रसंबद्ध विविध कर्तव्यें प्रकृतिस्वभावानुसार केलीं पाहिजेत हें सर्वस्वी खरें. परंतु हीं सर्व कर्तव्यें पार पाडण्याची बुद्धि व शक्ति फार थोड्यांना असते. जे ज्ञानी व मोठे आहेत, त्यांचीं हीं कामें आहेत. सामान्य मनुष्य अल्पबुद्धि व अल्पशक्ति असतो. तेव्हां त्यानें आपल्या हातून काय होणार आहे ? चांगल्याऐवजीं कदाचित् वाईटच होण्याचा संभव आहे, तेव्हां कांहींच न करतां स्वस्थ बसलेलें काय वाईट? असा युक्तिवाद एकाद्या मार्मिक वाचकांच्या डोक्यांत येईल. परतु गीतेनें असल्या युक्तिवादाला ऊर्फ नैराश्यवादाला मुळींच जागा ठेविलेली नाहीं.

सामान्यांत सामान्य व उच्चांत उच्च जरी मनुष्य असला तरी प्रत्येकाचें कार्यक्षेत्र कांहीं एकच नसतें. भिन्न भिन्न कार्य-क्षेत्रें असतात. अर्थात् त्या त्या क्षेत्रांत त्यानें आपल्या शक्तीप्रमाणें स्वभावनियत कर्म केलेंच पाहिजे.

'स्वल्पमप्यस्य धर्मस्य त्रायते महतो भयात्' ।। गी. अ.२ श्लो. ४० ।।

या धर्माचें यत्किंचित पालनसुद्धां महासकटांतून निभावून नेतें. तात्पर्य, सामान्य व उच्च हा भेद येथें येतच नाहीं.

जगांतील प्रत्येक सामान्य मनुष्य जर म्हणेल कीं मी कर्तव्य न केलें तर जगाचें काय अडणार आहे? त्याचें उत्तर असें कीं समजा, एकाद्यानें कुचराई केली, दुसऱ्यानें अंगचोरपणा केला म्हणून जगाचें कांहीं अडतें अशांतला भाग नसला तरी कर्तव्यविन्मुख होण्याची साथ अधिकाधिक पसरत

जाते व तिचा परिणाम जगाच्या अत्यंत क्षुद्र अंशावर कां होईना पण झाल्या--शिवाय राहात नाहीं. स्टेशनावर स्टेशन मास्तर, तिकीट मास्तर, पार्सल मास्तर, पोर्टर, हमाल इ. नोकर असतात. प्रत्येकानें आपापलें कर्तव्य योग्य रीतीनें बजावलें कीं स्टेशनचा लौकिक वाढतो व उतारूंनाहि सुख होतें. परतु तिकिटें वेळेवर न मिळालीं, पार्सलें चोरीस जाऊं लागलीं, हमाल गठ्ठे अगर इतर सामान नेण्याचें नाकारू लागले तर प्रत्येकाचें वैगुण्य वेगवेगळ्या प्रकारानें जाणवतें व उतारूना त्रास होतो.

गाडीचे वेळीं बिल्लेवाले हमाल नसले म्हणजे कुणी त्याकरितां तेथें अडून बसत नाहीं. परंतु १०।१५ मिनिटें गरजू उतारूंची त्रेधा उडते हेंहि खरेंच आहे. पोस्टमननें जरूरीचें पत्र निष्काळजीपणानें एक दिवस उशीरा दिलें, तर कुचराईचे परिणामहि कांहीं क्षुद्र होत नाहींत. सांधेवाल्यानें सांधा चुकविला तर केवढा तरी अनर्थ होतो !

## अंगचोरपणाचा अनिष्ट परिणाम

कल्पना करा कीं एक दहा माणसांचें कर्जबाजारी कुटुंब आहे. कुटुंबांतील प्रत्येक व्यक्तीनें स्वावलंबन, काटकसर, व दीर्घोद्योग यांचा अवलंब केला तरच वर्षाचे कांठीं कांहीं कर्जफेड होईल. परंतु प्रत्येक व्यक्ति दुसऱ्यावर टोलवून जर स्वतः अंगचोरपणा करून उधळपट्टी करूं लागेल तर त्या व्यक्तीच्या आळसामुळें २५।३० रुपये तरी कर्जफेडीस कमीच पडतील. म्हणजे एकट्या क्षुद्र माणसाच्याहि अंगचोरपणाचा अनिष्ट परिणाम कुटुंबावर झाल्याविना राहात नाहीं. कर्जफेडीचा दृष्टांत रुपयामध्यें मोजतां येणार आहे म्हणून दिला आहे. प्रत्येक कर्माचें वैगुण्य सूक्ष्मदृष्टचा मोजतां येण्याजोगेंच आहे. म्हणून मी थोडा आळस केला तर काय हरकत आहे, हें म्हणणें गैर आहे.

जगांत कुणाचें कुणावाचून अडत नाहीं असें जरी असलें तरी प्रत्येकाचें प्रत्येकांवाचून अडतें हेंहि खरेंच आहे. जगाचें रहाटगाडगें चाललेलेंच आहे. तें चालविण्याला दररोज अनेक निमित्तकर्में होतच आहेत. मी अंगचोर-पणा केला. कुचराई केली किंवा मी अल्पशक्ति, अल्पमति, म्हणून दुर्लक्ष केलें तर सृष्टींतील तेवढी उणीव भरून काढण्याकरितां दुसऱ्याला तें कर्म करावें लागतेंच व तेवढ्यानें समाजाचें बरेंच अनहित होतें. म्हणन वरील वृत्तीचा अवलंब करूं नये. प्रत्येक मनष्य मोठा बद्धिमान्, शक्तिमान्, सुदृढ, शरीर--

वान् असतो, असें मुळींच नाहीं. मंदबुद्धि, अल्पशक्ति, व्यंग अगर रोगी शरीर जरी असलें, तरी जी सामग्री ईश्वरानें दिली आहे, तिचा उत्तम उपयोग प्रत्येकानें केलाच पाहिजे. माझ्या हातून काय होणार, ही वृत्ति नैराश्यवादाची आहे. जितकें होईल तेवढें करावें. तें उत्तम करण्याचा यत्न करावा. सामान्य मनुष्यें जेव्हां अनेक यत्न करितात तेव्हां एकादाच यत्नशील मोठा मनुष्य पुढें येतो. पन्नास संस्था निघून जेव्हां त्या बुडतात तेव्हां एकादी संस्था उत्कर्ष पावते. शेंपन्नास रोगी जेव्हां वैद्य मारतो तेव्हांच तो खरा तज्ज्ञ व अनुभवी होतो. वर्गांतील मंदबुद्धि मुलांमुळेंच कुशाग्रबुद्धि मुलाला महत्त्व येतें. म्हणजे परंपरेनें प्रत्येक कर्म महत्त्वाचेंच आहे. तें तें त्या त्या क्षेत्रांत महत्त्व उत्पन्न करितें व भासवितें. मनुष्य कसलाहि असो, तो मनुष्य आहे म्हणूनच स्वभावनियतकर्माला योग्य आहे. त्यानें आपलें कर्तव्य केलेंच पाहिजे. तें कर्तव्य त्याच्या दृष्टीनें जरी क्षुद्र असलें तथापि जगाच्या धारणपोषणाच्या दृष्टीनें तें महत्त्वाचें आहे.

विद्यादानाचें जेवढें महत्त्व आहे, तेवढेंच महत्त्व आरोग्याच्या क्षेत्रांत शौचकूप साफ करण्याचें आहे. चांभार, सुतार, लोहार, मजुरापासून तों जगाचीं सूत्रें हलविणाऱ्या प्रधानापर्यंत सर्वांचीं कर्में आपापल्यापरीं महत्त्वाचींच आहेत. प्रत्येकानें आपल्या वाटयास आलेलें स्वकर्म ईश्वरपूजनाच्या भावनेनें केलें पाहिजे, हाच या विवेचनाचा मथितार्थ आहे.

## कर्तव्यपालन हीच ईश्वराची आवडती पूजा

स्वभावविहित कर्म हाच स्वधर्म होय. या स्वधर्माचें म्हणजे नित्य यज्ञाचें परिपालन मनुष्यानें अत्यंत श्रद्धेनें केलें पाहिजे. कारण हा नित्य यज्ञ म्हणजेच ईश्वरपूजा होय. ह्या नित्य कर्मरूपी गंगेंत स्नान केल्यानें तीर्थ क्षेत्रापेक्षां अधिक अंतःशुद्धि होते. स्वकर्तव्यरूपी कामधेनूची किंवा कल्पलतेची उपासना केल्यानें इष्टसिद्धि मिळतेच, पण प्रत्यक्ष परमेश्वरहि प्रसन्न होतो. 'मातृदेवो भव' ह्या शास्त्रवचनाप्रमाणें जो एकनिष्ठेनें आईची सेवा करितो त्याला सौख्य मिळतें. पतिव्रता पतिसेवा, आणि शिष्य गुरुसेवा करून सुविख्यात झाल्याचीं उदाहरणें कांहीं थोडीं नाहींत. मनुष्यानें आपलें कर्तव्य अनन्य निष्ठेनें केल्यास ईश्वरप्राप्तिसुद्धां त्वरित होते, असा गीतेचाच सिद्धान्त आहे.

प्रत्येकानें आपलें नियतकर्म अनन्य निष्ठेनें केलें पाहिजे व तसें करणें हीच ईश्वराची पूजा आहे. ज्याचें जें विहित कर्म असेल तें त्यानें उत्तम करावें, हेंच ईश्वराचें मनोगत आहे. ज्यापासून सर्व जग उत्पन्न झालें व ज्यानें हें सर्व जग व्यापिलें आहे अशी त्या ईशतत्त्वाची प्रसन्नता विहितकर्म केल्यानेंच होते. विहित कर्मरूपी सुगंधी पुष्प ईश्वराला अर्पण करणें हीच त्याची सेवा व हीच त्याच्या नियमांची मर्यादा होय. गीतेमध्यें ईश्वरपूजेला गंध, पुष्प, धप, दीपादि सामग्री सांगितली नाहीं. अध्याय नऊमध्यें पुष्प, पत्र, तोय, फल, जो मला भक्तीनें देतो तें मी प्रेमानें ग्रहण करितों असें भगवंतांनीं अर्थवाददृष्ट्या म्हटलें आहे खरें.परंतु त्याहीपेक्षां स्वकर्मकुसुम ईश्वराला अधिक आवडतें.षोडशोपचार पूजा हा एक चित्ताच्या एकाग्रतेचा मार्ग आहे. पण तोच कांहीं मुख्य मार्ग नव्हे. **सर्वात्मक ईश्वराची पूजा ईश्वर ज्या पद्धतीनें कर्म करितो त्या पद्धतीनें कर्म करण्यानेंच होते.** ईश्वर जसा निरहंकार वृत्तीनें अनासक्तीनें तो पूर्णकाम व आप्तकाम असतां जसें हें जगाचें चक्र चालवितो तसेंच मनुष्याचें वर्तन असलें पाहिजे. निरहंकारवृत्ति म्हणजे काय ? अनासक्ति म्हणजे काय? तें अनासक्तीनें होतें किंवा नाहीं हा विषय कर्म कसें करावें या प्रश्नामध्यें येतो, सबब त्याचा विचार पुढील प्रकरणांवर टाकणें भाग आहे.

---

## प्रकरण सहावें

# अनासक्तीनें कर्में करा व ईश्वराचें अनुकरण करा

कर्मप्रदीपाच्या पहिल्या प्रकरणांत कर्म म्हणजे काय हें सांगितलें व दुसऱ्या प्रकरणांत कोणतें कर्म करावें याचा विचार केला. प्रस्तुत प्रकरणांत स्वभावनियत कर्मे कशीं करावींत हें सांगून हा कर्मप्रदीप पुरा करितों.

ज्या एका शक्तीमुळें हें चराचर व दृष्टादृष्ट जगत् चालत आहे, त्या सर्वशक्तिमान् परमेश्वराचें अनुकरण प्रत्येक मनुष्यप्राण्यानें केलें पाहिजे. प्रत्येक मनुष्य ईश्वरी अंश नव्हे–ईश्वरच आहे. पण ही सुप्त शक्ति जागृत करण्याकरितां मनुष्यानें ईश्वराप्रमाणें अविरत उद्योग केला पाहिजे. परंतु चमत्कार काय होतो पाहा !

लहान मुलें उनाड, खट्याळ व दुर्गुणी मुलांचेंच प्रायः अनुकरण करितात. प्रौढ विद्यार्थी जो शिक्षक नयनिष्ठुर, काटेकोर, बिनचुक, उच्चध्येयी

असा असतो त्याचें अनुकरण न करितां सर्व दृष्टीनें काटाभर जो शिथिल असतो त्याचेंच अनुकरण करितात. समंजस मनुष्येंसुद्धां चांगलीं तत्त्वें पटत असलीं तरी मोहानें व लोभानें दैवी गुणांचें अनुकरण करीत नाहींत. ईश्वराशीं सख्य जोडावयाचें असेल तर आसुरी गुणांचा त्याग करून दैवी गुणांचा स्वीकार केला पाहिजे व त्या गुणांचा उपयोग ईश्वराप्रमाणें सारखा समाज व राष्ट्रहितार्थ केला पाहिजे.

गीतेमध्यें ईश्वराचें चारित्र्य सांगितलें आहे; त्यामुळें अभ्यासी मनुष्याची उत्तमच सोय झाली आहे. अघटितघटनापटु व सर्वशक्तिमान् ईश्वराचें चरित्र कळणें ही कांहीं लहानसहान गोष्ट नव्हे. गी. अ. ३ श्लो. २२।२३ मध्यें तें चरित्र आलें आहे. त्याचें तात्पर्य असें "हे पार्था, मला तिन्ही लोकांशीं कांहीं कर्तव्य नाहीं. मला मिळविण्याजोगें कांहीं नाहीं व कांहीं मिळालें नाहीं असाहि भाग नाहीं. तरीसुद्धां मी कर्मांत निमग्न राहातों. जर मी कधीं आळस देण्यापुरताहि थांबल्याशिवाय कर्मामध्यें निमग्न राहाणार नाहीं तर हे पार्था, लोक सर्वस्वीं माझें अनुकरण करतील."

ईश्वर हा पूर्णकाम, आप्तकाम व कृतकृत्य असला तरी जग चालावें म्हणून आळस देण्यापुरताहि थांबत नाहीं. जांभई देण्यापुरतीसुद्धां विश्रांति न घेतां तो सारखें जग चालवीत आहे. रोज सूर्य उगवत आहे, उजाडत आहे, वारा वाहात आहे, पृथ्वी आपला उत्पन्न करण्याचा धर्म सारखा दाखवीत आहे. तात्पर्य, ईशसृष्टींतील हे सर्व व्यापार सारखे चालले आहेत; हें जर आपण प्रत्यहीं पाहात आहोंत तर ईश्वरप्राप्तीकरितां आपणहि तसेंच करावयास नको काय?

मनुष्याला जर या ईशसृष्टींत राहावयाचें असेल तर त्यानें ईश्वराप्रमाणें कर्म केलें पाहिजे आणि तें मोठ्या कौशल्यानें केलें पाहिजे. कर्म करण्याकरितां शुद्ध बुद्धि, निरहंकार व अनासक्ति, या सर्व वृत्तींची अत्यंत आवश्यकता आहे. त्याशिवाय ईश्वराला अर्पण करण्याजोगें कर्म संभवतच नाहीं. देवाची पूजा शुद्ध भावानें करावी, पवित्र देहानें देवालयांत जावें, त्याप्रमाणें कर्महि शुद्ध व स्वच्छ भावनेनें करावें.

ईश्वराला कसलीहि अशुद्धता खपत नाहीं. आसक्ति, ममता, लोभ, अहंकार इत्यादि रजोगुणांच्या वृत्तींनीं विटाळलेलें कर्म विषयुक्त पक्वान्ना-

प्रमाणें त्याज्य होय. जेवतांना अगदीं क्षुद्र जरी माशी लागली तर ती पोटांत जातांच मळमळ सुरू होते व वांतीशिवाय बरें वाटत नाहीं. कर्माची स्थितिहि तशीच आहे. ईश्वराला असलीं मळमळीचीं कर्में नको आहेत. त्या कर्मांनीं त्याची प्राप्ति दुरावते. कर्तव्याकरितां कर्तव्य व भक्तीकरितां भक्ति अशी निष्काम व अहेतुक वृत्ति ईश्वराला आवडते. म्हणून गीतेमध्यें भगवंतांनीं आपल्या उपदेशाचें सार पुढील श्लोकार्धांत मोठें सुंदर सांगितलें आहे.

तस्मादसक्तः सततं कार्यं कर्म समाचर। गी. अ. ३ श्लो. १९॥

म्हणून सक्त न होतां सतत कर्तव्यकर्म कर, हाच श्रीकृष्णाचा मुख्य आदेश व उपदेश आहे. ज्याला जें प्रिय असतें व जो स्वतः जें आरचणांत आणतो तेंच तो दुसऱ्याला सांगतो. यास्तव ईश्वराप्रमाणें शुद्ध व निर्मल बुद्धीनें आणि अनासक्तीनें कर्म केलें पाहिजे.

सदाचरण अगर दुराचरण हे शब्द मनुष्याच्या कर्मालाच लागतात. कारण त्याला ईश्वरानें बद्धि दिली आहे. बैलानें मारलें, अगर आणखी कांहीं केलें तर त्यावर गर्दी मारामारीचा अगर खुनाचा दावा कुणी करीत नाहीं. पावसाच्या अनावृष्टीमुळें व अतिवृष्टीमुळें जरी लाखो लोक उपाशीं मरूं लागले तर त्याबद्दलहि कायदेशीर उपाय करितां येत नाहींत. परंतु मनुष्याचें तसें नाहीं. त्यानें तें कर्म कां केलें, कोणत्या वृत्तीनें व हेतूनें केलें हें सर्व पाहाण्यांत येतें व त्यावरून त्याला बरें किंवा वाईट असेंहि म्हणण्याचा प्रघात आहे.

मनुष्य ह्या जगांत पुष्कळ चांगलीं कर्में करीत असतो. बाह्यतः जरी कर्में चांगलीं दिसलीं तरी तीं ज्या हेतूनें केली जातात ते हेतु सात्त्विक, राजस व तामस असूं शकतात. केवळ कर्तव्यबुद्धीनें एकाद्या कार्यास मदत करणें, प्रसिद्धीकरितां द्रव्य देणें व वैयक्तिक चुरशीनें तें देणें ह्या तीनहि तऱ्हा संभवतात व त्यावरूनच कर्त्याची योग्यता ठरत असते. गीतेचें असें स्पष्ट सांगणें आहे कीं मनुष्यानें सात्त्विक बुद्धीचा अभ्यास करावा व प्रत्येक कर्म सम, स्वच्छ व निर्विकार बुद्धीनें करीत असावें. बाह्यतः एकादें कर्म बरें वाईट दिसेल किंवा उच्चनीचही असेल, परंतु कर्माची योग्यता त्यावरून न ठरवितां कर्त्याच्या बुद्धीवरूनच ठरवावयाची असते. वेदमूर्ति ब्राह्मण, धर्ममार्तंड शास्त्री, फार काय पण आचार्यपीठाधिष्ठित एकादे शंकराचार्य

जरी असले व बाह्यतः त्यांना प्रतिष्ठा मिळत असली तरी हे त्रिवर्ग आप-आपलीं कर्तव्यें कोणत्या बुद्धीनें करितात यावरच त्यांची योग्यता अवलंबून राहाते. एकादा लाकूडफोड्या, मोळीविक्या किंवा एकादा मजूरहि आपलें कर्तव्य शुद्ध व निरहंकार बुद्धीनें करूं शकेल व त्याचें मनःसमाधान वरील त्रिवर्गांत आढळणार नाहीं. बुद्धीची समता व स्वच्छता ही प्रत्येक मनुष्याला अभ्यासानें साध्य होईल. तिचा व उच्च धंद्याचा अगर जातीचा कांहींहि संबंध नाहीं.

एका गरीब मनुष्यानें केवळ कार्यप्रेमानें आपलें सर्वस्व कार्यास अर्पण केलें आणि दुसऱ्या धनशेटानें लौकिकाकरितां एक लक्ष रुपयांची देणगी दिली; वृत्तपत्रांत नांव फडकावें, फोटो यावा, धंद्याला उत्तेजन मिळून चार पैसे मिळावेत या भावनेनें एकाद्यानें शांतिसंग्रामांत भाग घेतला आणि दुसऱ्या एकानें केवळ राष्ट्राची आज्ञा म्हणन स्वतःच्या लाभहानीचा यत्किंचितहि विचार न करतां एकदम कायदेभंग करून एक वर्षाचा कारागृहवास पत्करला. एका स्त्रीनें मोठ्या धडाडीनें पुरुष व स्त्रिया यांना लाजविण्याकरितां कायदे-भंग केला पण दुसऱ्या एका साध्वीनें गोळीबाराच्या प्रसंगीं मरणाचीही पर्वा न करतां रुग्ण लोकांची शुश्रूषा कर्तव्यबुद्धीनें केली तर यामध्यें आपण कोणाची योग्यता अधिक ठरविणार? लौकिक, प्रसिद्धि, धनाशा व चुरस या वृत्तीनें केलेल्या कार्यापेक्षां सात्त्विक व शुद्ध बुद्धीनें केलेल्या कार्याची किंमत सर्वांत अधिक आहे. म्हणूनच कर्मापेक्षां त्याच्या बुडाशीं असलेल्या बुद्धीची योग्यता विशेष आहे.

समजुतीकरितां शुद्ध बुद्धीच्या वरील उदाहरणांप्रमाणें निरहंकार व अनासक्ति यांचीं कांहीं उदाहरणें देतों.

पृथ्वी कोणताहि अहंकार धारण न करतां वृक्षांना जन्म देते. यंत्र अहंकाराविना सारखें चालत असतें. मनुष्य सदैव निरहंकार वृत्तीनें श्वासोच्छ्वास करितो. पोष्टमननें ५०० रुपयांच्या मनीऑर्डरी वाटल्या तरी त्याला ५०० रुपये दान केले असा अहंकार वाटत नाहीं. किंवा मोठ्या खानावळवाल्याला दररोज सहस्र भोजनाची ऐट मिरवावी असें वाटत नाहीं. त्याप्रमाणें ईश्वरी सत्तेनें व प्रेरणेनें चाललेल्या जगांत कर्तव्य केल्याचा अहंकार शुद्ध बुद्धीच्या मनुष्यास मुळींच वाटत नाहीं.

नद्यांजवळ येवढी जलसमृद्धि असते, पण त्या कधीं पाणी पीत नाहींत. वृक्ष सर्व जगाला फळें देतात, परंतु ते आपलीं फळें कधीं चाखत नाहींत. वसंत ऋतूच्या आगमनानें जरी सर्व वृक्ष फळांनीं लादले गेले तरी तो एकाहि उत्तम आंब्याला स्पर्श करीत नाहीं. कन्यादानाचें उदक जावयाच्या हातावर सोडल्यावर बाप जसा तिजविषयीं निरभिलाष असतो, तशी प्रत्येक कर्मांत अनासक्ति पाहिजे. ज्ञानेश्वरांनीं कर्तव्यकर्माला मातेची उपमा दिली आहे. ते म्हणतात कीं मातेची अवज्ञा केली किंवा कामना केली तर जसें पापच लागतें त्याप्रमाणें कर्तव्याची अवज्ञा केली किंवा त्याच्या फळाची कामना केली तर त्यापासून इष्ट लाभ होत नाहीं. म्हणून अवज्ञा व कामनाविरहित कर्तव्य केलें पाहिजे. (ज्ञा. अ. १८–२०२।२०५)

प्रत्येक मनष्य स्वार्थी आहे. तो फलाभिलाषानें आसक्तियुक्त कर्म करीत असतो. सामान्य मनुष्याला असें वाटतें कीं आसक्तिशिवाय कर्म होणार नाहीं व झालें तरी कसें तरी व कांहीं तरी होईल. अनासक्तीनें कर्म होणें असंभवनीय असलें तर गीतार्थ सांगण्याचा खटाटोप व्यर्थ नव्हे काय? यास्तव अनासक्ति म्हणजे काय, ती केव्हां व कशी उत्पन्न होते याचा विचार अवश्य केला पाहिजे.

मनुष्य एकादें कर्म करण्यास प्रवृत्त झाला म्हणजे त्याचें फळ आपणांस अमुक मिळेल किंवा मिळावें अशी तो इच्छा करितो व त्याकरितां अमुक अमुक साधनें योजलीं पाहिजेत असें तो आपल्या मनाशीं ठरवितो. साध्य व साधन आणि कार्य व कारण याविषयीं मनुष्यानें निश्चित असलेंच पाहिजे. तशा निश्चितीनंतर परिणामाचें म्हणजे फलाचें ज्ञान त्याला होतें व आपल्या कर्माचें फल आपणांस खास मिळणार असें वाटूं लागल्यावर आसक्ति, अहंकार व लोभ हीं उत्पन्न होतात. कर्म, कर्ता व फळ हीं सर्व आपल्या स्वाधीन आहेत, यांत कांहीं पराधीन नाहीं ही कल्पना आसक्ति उत्पन्न करिते. परंतु मनुष्याला जसजसा जगाचा अधिक अनुभव येईल, आपल्या शक्तीचें ज्ञान जसजसें अधिक होईल तसतसें त्याला मनुष्यप्राणी हा प्रकृतिपराधीन ,परिस्थितिपराधीन व इतर अदृश्य शक्तिपराधीन आहे असें समजतें व कोणत्याहि कर्माचें फल इच्छेप्रमाणें मिळणें असंभवनीय आहे असें वाटल्यावर अनासक्तीचा उद्भव होऊं लागतो.

तारुण्याच्या पहिल्या जोरांत अनासक्ति व अनहंकार ह्या वृत्ति संभवनीय नाहींत. कारण त्या वयांत आसक्ति, अहंकार म्हणजे काय हेंच समजून घ्यावयाचें असतें. नवीन रक्त सळसळत आहे, तारुण्य मुसमुसत आहे, सर्व उद्दाम वृत्ति फोंफावत आहेत अशा त्या दुर्दमनीय अवस्थेंत 'मी जें करीन तें होईल' 'लाथ मारीन तेथें पाणी काढीन' असें वाटत असतें. पुष्कळ वेळां तारुण्याच्या उमद्या उसळी सरशींच एकादें महत्कृत्यहि होऊन जातें व तसें झालें म्हणजे अशक्य असें कांहीं वाटत नाहीं. एकाद्याच्या आयुष्याचीं जास्तींत जास्ती १०।१२ वर्षे उत्तम पार पडतात, परंतु पुढें कांहीं अडचणी येतात, ठेचा लागतात, चार दोन मोठ्या दुखण्यांनींहि तो मऊ होतो. आप्त, इष्ट, स्नेही व पुत्र यांच्या मृत्यूंचे धक्के व शोकाचे तडाखे त्याला बसतात आणि आपल्या सामर्थ्याची खरी जाणीव उत्पन्न होते. तात्पर्य, अनासक्ति बाणण्याची वेळ हीच असते.

वयाच्या पसतीस चाळीस वर्षांपासून कर्त्या माणसालासुद्धां मानवी शक्ति अल्प आहे, मनुष्याच्या हातीं फार थोडें आहे, हें व इतर तत्त्वज्ञान पटूं लागतें. अहंकार, लौकिक व द्रव्यादि एषणा या अनुभवानें मृदु होतात व आत्मस्वातंत्र्याच्या सिद्धान्ताकडे तो आपोआप वळतो.

वेदान्तशास्त्रदृष्टया आत्म्याला म्हणजे जीवाला स्वातंत्र्य फार अल्प आहे. तो मनबुद्ध्यादि इंद्रियांच्या कोंडींत सांपडला असल्यामुळें त्याला त्यांच्या तंत्रानें वागावें लागतें. जीवात्मा प्रकृति परतंत्र आहे, त्याला तें दडपण एकदम झुगारून देतां येत नाहीं. सुतार व कुंभार हे कितीहि कुशल असले तथापि ते आपल्या हत्यारांच्या आधीन असतातच. सुताराचीं हत्यारें चांगलीं नसलीं, कुंभाराचें चाक व भिजलेली माती यांत वैगुण्य असलें तर त्याच्या कौशल्यांत दोष राहील. उत्तम आचाऱ्याला जर गचाळ शिधा सामग्री दिली तर तो उत्तम स्वयंपाक करूं शकेल काय? त्यानें कितीहि दक्षता घेतली तरी कुजक्या गव्हाच्या पोळीला वास आल्याशिवाय राहणार नाहीं आणि वाईट डाळीचें वरण नीट जमून येणार नाहीं. यास्तव त्यानें शुद्ध भावानें शक्य तितकी दक्षता घेतली पाहिजे व तेवढीच त्याच्या हातीं आहे.

अत्यंत आसक्त व फलकामी मनुष्यानें असा विचार केला पाहिजे कीं, जगाचें जें राहाटगाडगें अनादि कालापासून चालत आहे, त्यावर आपली

सत्ता थोडी तरी आहे काय? आपण न इच्छितां किंबहुना आपणास नको असतां शेकडों गोष्टी जगांत चालू असून त्यांचे बरेवाईट परिणाम आपणावर घडतच असतात. केव्हां केव्हां अनिष्ट व्यवहारांतहि परेच्छेनें समाविष्ट व्हावें लागतें. अशा वेळीं बुद्धि निर्मळ ठेवून अनासक्तीनें प्राप्त कर्म करीत राहाण्यांतच पुरुषार्थ आहे, पण आसक्तीनें दुःखाच्या व उद्वेगाच्या तावडींत जाण्यांत मुळींच अर्थ नाहीं. नदीचा प्रवाह जसा वेगानें वाहातो तसा जगाचा प्रवाह वेगानें चालू आहे. प्रवाहाची गति उलट फिरविणें अगर त्या गति-विरुद्ध जाणें हें मनुष्याला शक्य नाहीं. प्रवाहाच्या वेगांत वाहात जाऊन बुडणें हें मूर्खपणाचें आहे. म्हणून प्रवाहाबरोबर सरळ वाहात न जातां व त्याविरुद्ध जाण्याचा यत्न न करितां पोहत तिरकस गतीनें परतीराला लागणें येवढेंच मनुष्याच्या आधीन आहे. वरील आत्मस्वातंत्र्याचा सिद्धान्त ज्याच्या चित्तांत स्थिर होईल तो हळुहळू अनासक्तीनें कर्में करण्याचा अभ्यास करील.

ज्यांना स्वार्थाशिवाय दुसरें कांहीं दिसत नाहीं अशीं माणसें फळाच्या आशेनेंच सारखें कर्म करीत असतात. त्यांची समजूतच अशी असते कीं आपल्या प्रत्येक कर्माचें फळ आपणाला प्रत्यहीं मिळतें. एकाद्या कृत्याचें जें फल मिळतें तें केवळ आपल्या आजच्या कर्मामुळें मिळतें ही कल्पनाच चुकीची आहे. उदाहरणार्थ, मी बाजारांत गेलों व चार पैसे देऊन भाजी आणली म्हणजे जेवतांना मला वाटतें कीं मी पैसे मिळवले, भाजी आणली व त्याच प्रत्यक्ष कर्माचें फल मी भोगीत आहें. परंतु बाजारांत जी कोबी, वांगीं, गाजरें आलीं होतीं, तीं शेतांतून मी आणलीं होतीं काय ? तीं मी पिकविलीं होतीं काय ? जमिनीची मशागत व मेहनत मी केली होती काय ? जर यांपैकीं मी कांहीं केलें नाहीं तर बाजारांत जाणें व चार पैसे देणें येवढ्या कर्मामुळें मी जेवतांना भाजी खातों हें खरें काय ? व हें माझ्या कर्माचेंच फळ आहे काय?

बाजारांतून भाजी आणली व तिची उत्तम पाकसिद्धी करण्यास आपल्या गृहिणीस सांगितलें, परंतु या कार्यास जलाची आर्द्रता व अग्नीची उष्णता यांचें साह्य नको काय ? सर्पण ओलें, कच्चें असलें, पाणी अगदीं खारें असलें तर ती भाजी चांगली होईल काय? पाण्याच्या ठिकाणीं आर्द्रता व अग्नीच्या ठिकाणीं उष्णता हे गुणधर्म मी निर्माण केले काय? ही गोष्ट माझ्या स्वाधीनची नाहीं व प्रयत्नाधीनहि ती नाहीं. पाऊस पडणें, जमीनींत

पीक उगवणें, तें पीक बाजारांत आणणें, पाणी व अग्नि यांची अनुकूलता असणें यांपैकीं एकहि गोष्ट मी करीत नाहीं. परंतु या सर्वांची अनुकूलता असेल तरच बाजारांत जाणें व भाजी आणून ती खाणें हें कर्म घडतें. ईश्वराच्या सृष्टीचे वरील स्वतःसिद्ध धर्म व मनष्यकर्म यांचा संयोग आनुकल्यानें झाला म्हणजे कर्माचें फल मिळत असतें. ईशसृष्टीमध्यें ज्ञात व अज्ञात अशा गूढ शक्ति आहेत. त्या शक्तींचा व मनुष्यकर्माचा संयोग झाला म्हणजे जें फल मिळावयाचें तें बरोबर मिळतें. फलेच्छा नसली तरी तें मिळाल्यावाचून राहात नाहीं व ती असली तरी फलप्राप्तींत कांहीं अधिक होतें असेंहि नाहीं. कर्मफल ही ज्ञात व अज्ञात अशा ईशसृष्टीच्या स्वाधीनची बाब आहे. यास्तव फलाची हाव धरून कर्म केल्यास दुःख होण्याचा प्रसंगच अधिक असतो. त्यापेक्षां फल जें (कांहीं ईशसंकल्पानुरूप ) मिळावयाचें असेल तें मिळेल. कर्म करणें, तें उत्तम करणें एवढें माझ्या स्वाधीनचें आहे, म्हणून मी तें करीत राहणार हीच वृत्ति उत्तम आहे. ईशसृष्टीचे व्यापार आपल्या प्रयत्नास अनुकूल करून घेणें येवढेंच मनुष्याधीन आहे. म्हणून भगवान् सांगतात कीं, "तुझा कर्म करण्यापुरता अधिकार आहे म्हणजे तेवढें तुझ्या आधीन आहे, फल येणें ही तुझ्या स्वाधीनची गोष्ट नव्हे." (गी. अ. २–४७)

अत्यंत आसक्तीनें व अहंकारानें युक्त होऊन एकाद्यानें आपल्या स्नेही पाहुण्याला उत्कृष्ट मेजवानी देण्याचें ठरविलें, तर तें कार्य सर्वस्वी त्याचे हातीं आहे असें नाहीं. या एका कार्याला अनेकांचें साहय पाहिजे व तें प्रसन्न मनानें मिळालें पाहिजे. उत्तम शिधासामग्री आणणें व ती नीट तयार करणें, स्वयंपाक उत्तम होणें, भोजनाची मंडळी अवेळ न करितां वेळेवर येणें, जेवणाऱ्यांच्या अंतःकरणांत प्रसन्नता असणें आणि त्यांना चांगली रखरखीत भूक लागणें इतक्या गोष्टींची एकत्र अवस्थिति म्हणजे योग यावा लागतो. यांपैकीं एकाहि गोष्टींत किंचित् न्यून झालें तर इच्छित हेतु पूर्णांशानें सफल होत नाहीं.

गांवांत दुकान चांगलें असेल व स्वतः उभें राहून शिधा आणला तर तो उत्तम मिळेल. गडी माणसाकडून आणविला तर तितकासा चांगला येणार नाहीं. स्वयंपाक करतांना गृहिणीचें चित्त मुलांबाळांनीं फार व्यग्र न केलें तर तिखट, मीठ इत्यादि पदार्थ प्रमाणांत पडतील, नाहीं तर तो चांगला होणार नाहीं. पाहुण्याबरोबर भोजनास येणारी मंडळी वेळेवर येतीलच

असें नाहीं. त्यांतील एकादा डॉक्टर असल्यास तो महत्त्वाची केस पाहाण्यास अकस्मात् जाईल! विसराळु वकील पक्षकाराशीं बोलण्याच्या नादांत वेळेवर येणारहि नाहीं. आणि एकादोघांचें असें झालें कीं अन्न निवून जाईल. कदाचित् सर्व वेळेवर आले तरी ते प्रसन्न मनानें येतील असें नाहीं. मुख्य पाहुण्याला रात्रीचें अजीर्ण झालेलें असलें व इतरांनींहि सकाळपासून चार दोन वेळां विविध पदार्थांवर ताव मारला असला तर त्यांचीं भोजनें प्रसन्न मनानें केव्हांहि होणार नाहींत. तात्पर्य, एका मेजवानीसंबंधानें इतक्या विविध अडचणी असतात. त्या सर्वांचा परिहार एकटा मनुष्य कधींच करीत नाहीं. म्हणून त्यानें चांगला विचार करून, साधनें चांगलीं जुळवून शुद्ध बुद्धीनें आपल्या हातीं असेल तेवढेंच उत्तम करण्याचा अचुक यत्न करावा. म्हणजे कर्म करण्याचा अधिकार फक्त आपला आहे, फळ हें आपल्या हातीं नाहीं, हीच वृत्ति ठेविली पाहिजे. आपला मुलगा आपल्या मनाप्रमाणें विद्वान् व्हावा, कर्ता व्हावा असें प्रत्येक बापास वाटतें. परंतु मुलास तसें वाटलें पाहिजे, त्यानें यत्न केला पाहिजे, त्याला चांगले शिक्षक मिळाले पाहिजेत, मुलानें प्रकृति उत्तम ठेविली पाहिजे आणि बापानें योग्य तो पैसा खर्चून अवश्य ती दक्षता घेतली पाहिजे. इतकें सर्व जमलें तरच मुलगा चांगला तयार होऊन बापाची इच्छा पूर्ण करील. बापाच्या हातीं यापैकीं जेवढें असेल तेवढें त्यानें उत्तम करावें. गांवांतील शिक्षक उत्तम नसले, मुलाची प्रवृत्ति उनाडपणाची असली आणि प्रकृतीनें त्याला दगा दिला तर या सर्वांचा परिहार कांहीं बाप करूं शकत नाहीं. यास्तव "कर्मण्येवाधिकारस्ते" हा सिद्धांत खरा आहे. फल अमुकच मिळेल हें आपल्या हातीं नाहीं आणि तें जर हातीं नाहीं तर कर्म करूं कशाला हें मतहि योग्य नाहीं.

जीव परतंत्र आहे, मनुष्याच्या हातीं फार थोडें आहे, अशा वैतागानें जर एकादा कर्तव्याचा त्याग करील तर तो मूर्खपणा आहे. करण गीतेनें त्यागाचें महत्त्व फार वर्णिलें असलें तरी त्याग म्हणजे कर्म–त्याग नसून कर्म-फल–त्यागच गीतेला मान्य आहे. एकादें कर्म अनासक्तीनें व फलाची अपेक्षा न करितां करावयाचें म्हणजे कर्माच्या परिणामाविषयीं अज्ञ व बेपर्वा असावयाचें असें मात्र नव्हे. साध्य आणि साधन, कार्य आणि कारण, यांचें बिनचुक ज्ञान कर्त्याला पाहिजे, **कुठें तरी, कांहीं तरी व कसें तरी कर्म करणें**

म्हणजे निष्काम कर्म नव्हे; तसें झाल्यास प्रत्येक गांजेकस निष्काम कर्मयोगी ठरेल! निष्काम कर्मयोगी हा धांद्रट, अडाणी व गबाळ मनुष्य नसतो, तो बुद्धिमान्, विचारी व व्यवस्थित असतो. त्यामुळें त्याचेकडून साध्यानुकूल असें विचारपूर्वक कर्म घडत असतें. गांवांत कॉलरा झाला तर धुपारे व अंगारे यांच्या नादीं न लागतां पाणी उकळून पिणें, कच्चीं फळें, भाज्या व कच्चे पदार्थ शिजवून खाणें इत्यादि उपाय तो करील. व ते तन्मयतेनें करणें हें श्रेयस्कर मानील. हे उपाय करीत असतां त्याच्या घरांत कुणाला कॉलरा होणार नाहीं असेंहि नाहीं व कदाचित् झाला तर त्याबद्दल त्याला कांहीं वाईट वाटणार नाहीं. कारण त्यानें अनासक्तीनें कॉलरा प्रतिबंधक योग्य ते उपाय केलेले आहेत.

कर्म करून त्याचें फल मिळालें तर ठीक व न मिळालें तर त्याविषयीं अपेक्षा नाहीं व हांवही नाहीं, अशी वृत्ति पाहिजे. कर्मफलाची एकसारखी अपेक्षा ठेवल्यास त्यापासून मनुष्याला सुख होत नाहीं. व एकहि कर्म निष्ठेनें व चिकाटीनें घडत नाहीं. समजा, एक रोगी आहे, त्याचा रोग कष्टसाध्य किंवा असाध्य आहे; तर त्यानें कसें वागावें ? त्यानें प्रथम हें लक्षांत ठेविलें पाहिजे कीं असाध्य रोगावर त्वरित परिणाम दाखविणारें औषध बहुतेक नसतें. आणि प्रत्येक मनुष्याला मृत्यु हा आहे व तो एकाद्या रोगामुळेंच येतो, हें तत्त्व लक्षांत ठेवून कडक पथ्य पाळून शांत व धिमेपणानें त्यानें औषधोपचार करीत राहिलें पाहिजे. आज हा डॉक्टर, उद्यां तो वैद्य, परवां एकादा हकीम अशी तऱ्हा तो करूं लागला तर त्याच्या चंचल व अस्थिरपणामुळें केव्हांहि गुण येणार नाहीं. परिणाम जो काय व्हावयाचा असेल तो होईल, मला औषध व पथ्य यांची तपश्चर्या, वैद्य व डॉक्टर यांच्या सांगण्याप्रमाणें कांहीं दवस केली पाहिजे; अशा समजुतीनें जो रोगी प्रयोगादाखल एकाच डॉक्टराचें औषध चार सहा महिने सतत घेत राहील त्यालाच कांहीं काळानें गुण वाटेल. उपचार करतांना गुण येईलच अशी आशा करणें चुकी आहे. कराण गुणाची खात्री वैद्य अगर डॉक्टर देऊं शकत नाहीं. म्हणून औषधाच्या गुणाची हांव न बाळगतां उपचारांत श्रद्धेनें तन्मय राहणें हेंच मनुष्यकर्तव्य होय.

पण तोच रोगी अधीरपणानें औषधाच्या परिणामाचें फळ वरचेवर शोधूं लागला तर घरच्या माणसांना शिव्या देईल, वैद्य डॉक्टरांच्या नांवानें

खडे फोडील, सदा दु:खीकष्टी व उद्विग्न स्थितींत राहील आणि शांत चित्तानें मरणारहि नाहीं. हावऱ्या व अतियोगी मनुष्याची स्थिति या अस्थिर रोग्याप्रमाणें होते. त्याला तल्लीन करून सोडणारें असें त्याचें स्वकर्म ठरलेलें नसतें व तो तें ठरवीत नाहीं. आज हें करावें, उद्यां तें करावें, परवां बागवान व्हावें तर केव्हां कल्हईवाला व्हावें, असे तो अनेक धंदे करितो. प्रत्येक नवा नवा धंदा शोधतांना त्याची द्रव्याची हांव वाढत असते व अपेक्षेप्रमाणें द्रव्य न मिळालें म्हणजे तो लोकांना शिव्या देतो व स्वत:हि आत्मप्रत्ययशून्य होतो. यास्तव, स्वभाव, प्रकृति, परिस्थिति यांचा विचार करून एकादें काम ठरवावें व तें कर्तव्यबुद्धीनें, चिकाटीनें पण आसक्तिविरहित सतत करीत राहावें. ईश्वर त्यांतच यश देतो. मात्र तसें यश येण्यास प्रयत्नाची पद्धतशीर तपश्चर्याहि व्हावी लागते हें ध्यानांत ठेविलें पाहिजे. आणि यश व फल यांच्या हिशेबानें वरचेवर प्रयत्नाच्या पद्धतींत अवश्य तो फेरफारहि केला पाहिजे.

अनासक्तीनें कर्म होतच नाहीं असें सामान्य प्राकृत माणसांना वाटतें. परंतु तो त्यांचा भ्रम आहे. मनुष्याचे श्वासोच्छ्वासादि धर्म अप्रतिहतपणें जसे अनासक्तीनें होत असतात तशींच कर्मेंद्रियांकडून कर्मेंहि होणें असंभवनीय नाहीं. एकाद्या उत्तम गवयानें यश व द्रव्य जेवढें शक्य तेवढें मिळविलें, त्या क्षेत्रांत त्याला कांहीं कर्तव्य उरलें नाहीं; तथापि त्याचा गाण्याचा स्वभाव त्याला स्वस्थ बसूं देणार नाहीं, आणि त्याला रोज थोडें तरी गात बसावें असें वाटेल. त्याचा उपयोग जिज्ञासु शिष्य उत्तम प्रकारें करून घेतील. समजा, एकादा पैलवान ज्ञानी झाला तथापि आंगांतील कपडे बदलल्यावर स्वभावधर्माप्रमाणें त्याला दंड ठोकण्याची लहर येईल व तो केव्हां तरी कुस्तीसुद्धां करील. कुस्तीच्या विद्येंत नांव व पैसा संपादन केला, आतां कांहीं कर्तव्य उरलें नसलें तरी स्वभावाप्रमाणें मेहनत व कुस्ती यांची वृत्ति मधून मधून उठल्याशिवाय राहाणार नाहीं, आणि हीं जीं कर्में होतील तीं स्वभावधर्म म्हणून अनासक्तीनेंच होतील.

प्रत्येकाला पटण्यासारखें एक घरगुती उदाहरण देतों:—एका मोठ्या एकत्र कुटुंबांत एकादा वृद्ध गृहस्थ आहे असें आपण समजूं. वृद्ध आजोबाला कांहीं मिळवावयाचें नसतें. त्याला कसलीहि काळजी नसते. मुलगे, नातू,

पणतू इ. सर्वांचें सर्व व्यवस्थित चाललेलें असतें. परंतु हा म्हातारा प्रकृति धर्मानुसार चैन पडत नाहीं म्हणून पहांटे तीन वाजल्यापासून रात्री दहा वाजेपर्यंत सारखा कर्मांतच तल्लीन होऊन राहात असतो. म्हातारा पहांटे उठेल, पाणी तापवून स्नान करील व इतरांकरितां तापवून ठेवील, देवा-जवळचीं उपकरणीं घाशील, जरूर तर दहा–पांच घागरी पाणीहि ओढून ठेवील. नित्यान्हिक आटोपतांच गायी म्हशींच्या धारा काढील, नातवंडांना घेईल व खेळवील, सुनेला मदत करील, कर्त्या मुलाला सल्ला देईल, घरांतील प्रत्येक व्यवहाराकडे तो लक्ष देईल. पण जेवावयास बसला कीं तूप, दूध अधिक घेणार नाहीं. मुलाला म्हणेल कीं "जुनीं धोतरें मला दे, नवीं नकोत" अडचणीचे वेळीं अत्यंत खस्ता खाईल, म्हाताऱ्याचा अति कष्टी स्वभाव म्हणून मुलगे व सुना त्याला नांवेंहि ठेवतील. परंतु तो मात्र अविरत व अना-सक्त असा उद्योगच करीत राहील ! !

वृद्ध आजोबाप्रमाणेंच दैवानें ज्याला लाभली असेल त्या वृद्ध आजीची स्थिति असते. ती मरेमरेतों काम करीत असते, तिच्या गोंवऱ्या गंगेवर गेलेल्या असतात. तिला कुणी बरें म्हणो वा वाईट म्हणो, ती केरवाऱ्या-पासून तों सुनालेकींच्या बाळंतपणापर्यंत जें जें करितां येईल तें तें हौसेनें करिते. अंगावर नीट धडूतहि घेत नाहीं. पानावर बसली तर तूप, दूध, गोड धोड कधींहि खात नाहीं. सर्व कांहीं मुलाबाळांना राहूं दे हीच तिची वृत्ति असते. या वृत्तीला निरहंकार व अनासक्त असेंच म्हटलें पाहिजे. म्हणून अनासक्तीनें कर्मे होत नाहींत असें म्हणणाऱ्यांनीं ह्या दृष्टांतावरून योग्य तो बोध घ्यावा.

वस्तुतः पाहिलें तर अनासक्तीनें जितकें चांगलें कर्म होतें, तितकें आसक्तीनें होत नाहीं. कोणत्याहि कर्माला आसक्ति, ममता व अहंकारवृत्ति चिकटली कीं त्याची किंमत तर कमी होतेच. परंतु तें कर्महि योग्य तऱ्हेनें होत नाहीं. न्यायाधिशाचें काम पुढें आलेला पुरावा व कायद्याचें मूलभूत तत्त्व लक्षांत घेऊन निःपक्षपातपणें न्याय द्यावयाचें असतें. न्यायाधिशापुढें दोन्ही पक्ष जेव्हां तिऱ्हाईत असतात तेव्हां हें काम उत्तम होतें. परंतु वादी व प्रतिवादीपैकीं एकादा जेव्हां त्याचा नातलग असतो, व त्याच्या लाभहानीचा जेव्हां संबंध येतो, तेव्हां त्याची बुद्धि मोह पावते - आसक्तीमुळें ती योग्य

कर्तव्य करूं देत नाहीं. डॉक्टराची गोष्टहि अशीच आहे. वैद्य, धन्वंतरी, डॉक्टर यांच्यापुढें केवढ्याहि दुर्धर रोगाचा रोगी आला तथापि अत्यंत शांतपणें ते चिकित्सा करूं शकतात व प्राणांत काळींहि समवृत्ति ठेवून काम करितात. परंतु जेव्हां वैद्य डॉक्टरांचा मुलगा अगर आप्त किंवा जांवई आसन्नमरण असतो त्या वेळीं ममता, आसक्ति इत्यादि वृत्तीमुळें तें काम त्यांचेकडून चांगलें होत नाहीं. बुद्धि मोह पावते व "मला कांहीं सुचत नाहीं" असें तो म्हणतो. परीक्षकसुद्धां अत्यंत कठीण प्रश्नपत्रिका मुलांकडून शांतपणें सोडवून घेईल. परंतु परीक्ष्य मुलांत जर त्याचा मुलगा असेल आणि प्रश्नपत्रिका जर त्यानें पूर्वी पाहिली असेल, तर कांहीं तरी निमित्तानें एकादा प्रश्न मुलाला सांगण्याचा मोह त्याला अनावर होईल आणि त्या आसक्तीमुळें तो स्वकर्तव्यच्युत होईल. पुढें ही गोष्ट वरिष्ठांस कळल्यावर त्याची फजीती होईल. तात्पर्य, दूरवर विचार केल्यास अनासक्तीनेंच कर्म चांगलें व न्याय्य होतें. आसक्तीनें तें सदोष होतें, हें वरील विवेचनावरून वाचकांचे ध्यानी येईल.

गीताग्रंथ हा प्राणिमात्राला कर्तव्यतत्पर करणारा आहे. निरहंकार वृत्तीनें आणि अनासक्तीनें सदैव कर्म करीत राहा हेंच गीताशास्त्राचें सांगणें आहे. गीतेच्या मतें ज्ञानीसुद्धां ज्ञानोत्तर निष्काम कर्म करीत असतो कर्म हें बंधन आहे खरें, परंतु आसक्तीशिवाय तें बांधीत नाहीं. रवा आणि साखर यांचे लाडू बनत नाहींत. लाडू बनण्याला एका स्नेहाची म्हणजे तुपाची आवश्यकता असते. आसक्ति म्हणजे स्नेह व आसक्ति म्हणजे प्रेम व ममता. निर्मम वृत्तीनें कर्म केल्यास तें बंधनकारक होत नाहीं. म्हणून ज्ञात्याचा कित्ता इतरांनीं गिरविला पाहिजे. ज्ञानोत्तर कर्म शक्य कां अशक्य हा वाद प्रापंचिक व व्यवहारी मनुष्यानें करूं नये. हा वाद न संपणारा आहे. ज्ञानापूर्वी अनासक्तीनें कर्म करावें याविषयीं दुमत नाहीं. म्हणून प्रापंचिक, व्यवहारी, मुमुक्षु, साधक, जाणते व नेणते इ. सर्वांनीं स्वभावनियत कर्म अनासक्तीनें अखंड करावें हाच या कर्मप्रदीपाचा सारांश आहे.

## प्रकरण सातवें

# निमित्तमात्रं भव सव्यसाचिन्

गेल्या सहा प्रकरणांमध्यें अमरप्रदीप व कर्मप्रदीप असे दोन प्रदीप वाचकांपुढें ठेविले. आतां गीतेच्या अध्यायक्रमानें व विषयक्रमानें निमित्त-प्रदीपाचा विचार करावयास लागतों.

गीतेच्या दुसऱ्या अध्यायांत कर्मयोगाचा उपक्रम केला. तिसऱ्या अध्यायांत या कर्मयोगाचें व्यावहारिक व तात्त्विक स्वरूप कथन केलें. चौथ्या अध्यायांत त्या योगाची परंपरा सांगून पांचव्या अध्यायांत त्याचें वैशिष्टय सांगितलें; आणि सहाव्या अध्यायांत हा कर्मयोग साध्य होण्यास जो अभ्यास करावा लागतो त्याचें स्वरूप दाखविलें असून समत्वरूपाचें म्हणजे साम्ययोगाचें दिग्दर्शनहि केलेलें आहे.

गीतेच्या सातव्या अध्यायापासून पंधराव्या अध्यायाच्या समाप्ती* पर्यंत मोठे मार्मिक व गहन विषय आलेले आहेत. ज्ञान–विज्ञान, राजयोग, विभूतिविस्तार, भक्तियोग, क्षेत्र–क्षेत्रज्ञ–विचार, गुणातीतता, असे विविध विषय या अध्यायांमध्यें आहेत, तथापि त्या सर्व अध्यायांमध्यें अगदीं स्पष्ट व गंगेच्या प्रवाहाप्रमाणें धों धों करीत जाणारा विषय म्हणजे परमेश्वराच्या अस्तित्वाचाच होय.

गीतेमध्यें परमेश्वराच्या अस्तित्वाची व सामर्थ्याची साक्ष संवाद-रूपानें अनेक उदाहरणें देऊन पदोपदीं पटवून दिलेली आहे, त्यामुळें आस्तिक बुद्धीचा मनुष्यच गीतेचा अधिकारी आहे असें ठरतें. नास्तिकाला गीते-मध्यें समाधान मिळणार नाहीं. नास्तिक मनुष्य अत्यंत नीतिमान् असेल, पापभीरु असेल, त्यागी असेल व निष्कामकर्मीहि असूं शकेल. परंतु आस्तिक मनुष्याची श्रद्धा, भावना, ईश्वरनिष्ठा हीं त्याच्या ठिकाणीं नसल्यामुळें त्याला या जगांतील सात्त्विक आनंद कधींहि लुटतां येणार नाहीं. आस्तिक व श्रद्धाळु मनुष्य हें सर्व जगत् ईश्वरी प्रेरणेनें चाललेलें आहे, मी त्यांत एक निमित्तमात्र आहें, अशी भावना ठेवून वागत असल्यामुळें त्याला हा संसार सुखाचा करितां येतो व त्याला जगत्त्रय आनंदानें भरून टाकितां येतें.

अगदीं स्थूल दृष्टीनें जरी आपण या जगाकडे पाहिलें तरी आपल्या मनांत पुढील विचार येत नाहींत काय ? "हें येवढें जग म्हणजे काय आहे? तें कुणाचें आहे, हें कुणी निर्माण केलें असावें ? निर्माण करणारा कुठें बसला असावा ? त्याचें शरीरसामर्थ्य व इच्छासामर्थ्य केवढें मोठें असावें ? चंद्र, सूर्य, पृथ्वी, तारे, नद्या, पर्वत, पशु पक्षी, वृक्षलता, इत्यादि सर्व कुणी व केव्हां केलें? या सर्वांचा चालक कुणी आहे का नाहीं ? हें सर्व निसर्गनियमानुसार स्वभावानें चाललें आहे कीं याचें नियमन व निवारण कोणी करीत आहे? पृथ्वी, आप, तेजादि पंचमहाभूतांचें परस्पर वैर असतां हीं सर्व महाभूतें परस्पर अनुकूल होतात तरी कशीं ? जन्मसिद्ध वैर असलेल्या हिंस्र श्वापदांचा खेळ जसा एकादा दंडधारी कोरड्याच्या दराऱ्यानें करीत असतो, तसाच प्रकार जगाचा आहे कीं काय ? खरोखरच या जगाची नियामक शक्ति फार मोठी असली पाहिजे व तिच्याच भीतीनें वायूचें वाहाणें, सूर्याचें प्रकाशणें, अग्नीचें दहन करणें, पृथ्वीनें जगाचा भार सोसणें, तारकांनीं प्रकाशणें, वनस्पतींनीं पुष्पें व फलें देणें, मेघांनीं वर्षाव करणें इत्यादि क्रिया चाललेल्या आहेत कीं काय ?

या व अशा तऱ्हेच्या अनेक प्रश्नांचीं उत्तरें गीतेमध्यें दिलेलीं आहेत व तीं अत्यंत गोडपणानें व प्रेमळपणानें दिलेलीं आहेत. म्हणूनच गीतेंतील भक्तिमार्गाचें महत्त्व अधिक वाटतें. परमेश्वराचा प्रत्यक्ष अवतार गीता सांगणारा व अर्जुन हा परम भक्त ऐकणारा असा योग जमला असल्यामुळें भक्तवत्सल, दयासागर, परम पवित्र, परमोदार, परम कारुणिक, परम पूज्य सकलगुणनिधान, सत्यसंकल्प, सकलैश्वर्यसंपन्न, प्रत्यक्ष रूपधारी परमेश्वरच जगाच्या रूपानें नटलेला आहे, असा सिद्धान्त वाचकाच्या मनावर कसा ठसतो, हें आतां पाहूं या.

अध्याय सात, श्लोक सहा ते बारापर्यंत सर्वत्र परमेश्वरच कसा भरलेला आहे हें भगवंतांनीं स्वमुखानें वर्णन केलें आहे. संपूर्ण जगताची उत्पत्ति व विनाश मीच आहें, माझ्याहून अन्य असें कोणतेंहि या जगताचें कारण नाहीं. सर्व जगत् सुतामध्यें ओंवलेल्या मण्याप्रमाणें माझ्या ठिकाणीं आहे, उदकांतील रस, चंद्रसूर्याच्या ठिकाणीं असलेली प्रभा, वेदांतील प्रणव, आकाशांतील शब्द, पुरुषांतील पौरुष, भूमींतील सुगंध, अग्नींतील तेज, सर्व प्राण्यां-

तील जीवन, तपस्व्यांतील तप, बीजांतील बीज, बुद्धिमंताची बुद्धि, तेजस्व्यांमधील तेज, बलवंतांमधील बल आणि धर्माला अविरुद्ध असा काम मीच आहें, असें सांगून शेवटीं जगांतील सर्व सात्त्विक, राजस हे सर्व भावसुद्धां माझ्यापासूनच आहेत असा उपसंहार केलेला आहे.

परमेश्वर आपल्या विश्वरूपानें सर्वत्र नटलेला आहे हें गीतेमध्यें एकाच ठिकाणीं सांगितलेलें नसून मीमांसाशास्त्रांत ज्याला अभ्यास म्हणतात तसा पुन्हां पुन्हां हाच विषय प्रतिपादन केलेला आहे. गीतेच्या नवव्या अध्यायामध्यें श्लोक सोळा ते एकोणीसपर्यंत याच विषयाचें विवेचन निराळ्या शब्दांनीं केलें आहे. क्रतु, यज्ञ, स्वधा, औषध, मंत्र, आज्य, जगताचा पिता, माता, कर्मफल-दाता, पितामह, ज्ञेय वस्तु, पावन वस्तु, चारी वेद इत्यादि सर्व कांहीं मीच आहें; कर्माकर्माचें फल, भर्ता, प्रभु, साक्षी, सुहृत, उत्पत्ति, निधि, सर्व कांहीं मीच आहें; उष्णता मीच उत्पन्न करतों, पर्जन्य मीच आवरून धरतों व पाडतों, अमरत्व मीच आहें आणि मृत्युहि पण मीच आहें. दोन्ही स्वरूपें माझींच आहेत, असा निर्णय शेवटीं दिला आहे. म्हणजे जगांत जें जें स्थिरचर, बरेंवाईट, सगुणनिर्गुण आहे तें सर्व ईश्वरस्वरूपच आहे असा सिद्धांत येथें सांगितला आहे. गुळाचा खडा जेवढ्या आकाराचा असतो, तेवढ्या सर्व आकारांत जशी गोडी भरलेली असते, कापराच्या वडींतील प्रत्येक कणांत जसा आमोद दरवळलेला असतो, त्या प्रमाणें द्रुम, नग, नगर, आराम इत्यादि निर्जीव व सजीव सृष्टीमध्यें एक चैतन्यच ओतप्रोत विकसत आहे, असें अर्जुनाला निमित्त करून सर्व जगांतील मनुष्य देहधाऱ्यांना परमेश्वरानें सांगितलें आहे.

ज्ञानेश्वरी अ. ९ ओं. २८० ते ८५ मध्यें परमेश्वराचें जगावर प्रभुत्व कसें आहे याचें वर्णन 'प्रभु' या शब्दावर टीका करतांना मोठें मार्मिक असें केलेलें आहे. तेंच आतां येथें देतों.

तो विश्वश्रियेचा भर्ता। मीच गा एथ पांडुसुता।
मी गोसावी समस्ता। त्रैलोक्याचा॥
आकाशें सर्वत्र वसावें। वायूनें नावभरी उगें नसावें।
पावकें दाहावें। वर्षावें जळें॥
पर्वतीं बैसिका न सांडावी। समुद्रीं रेखा नोलांडावी।

पृथ्वी भूतें वाहावीं । हे आज्ञा माझी ।।
म्यां बोलाविल्या वेद बोले । म्यां चालविल्या सूर्य चाले ।
म्यां हालविल्या प्राण हाले । जो जगातें चाळिता ।।
जो ऐसा समर्थ । तो मी जगाचा नाथ ।

अध्याय नऊमध्यें ईश्वराच्या सर्वव्यापित्वाचा जो विषय दोन चार श्लोकांत सांगितला आहे तोच पुन्हां पंधराव्या अध्यायांत श्लोक बारा ते पंधरापर्यंत प्रतिपादिलेला आहे. चंद्र, सूर्य, अग्नि, यांतील तेज मीच असून पृथ्वीमध्यें प्रविष्ट होऊन मीच चराचर भूतें धारण करतों आणि रसरूप सोम होऊन सर्व औषधींचें पोषण करतों. जाठराग्नि होऊन प्राण्यांच्या देहाचा आश्रय करून प्राणापानांनीं युक्त होऊन चार प्रकारचें अन्न मीच पचवीत असतों. फार काय, पण सर्व प्राण्यांच्या हृदयामध्यें मीच प्रविष्ट झालों असून त्यांना स्मरण व ज्ञान, तसेंच विस्मरण व अज्ञान हीं सुद्धां माझ्यामुळेंच होतात असा उपसंहार तेथें केला आहे. प्रत्येक मानव प्राण्याच्या हृदयांत मी आहें आणि जीवलोकांमध्यें असलेला जीव (मनुष्यजीव) हा माझाच सनातन अंश आहें असा महत् सिद्धांत तेथें मांडलेला आहे. जो परमेश्वर जगांत आहे तोच मनुष्याच्या हृदयांत असून त्याच्याच प्रेरणेनें मनुष्य हालचाल करीत असतो. मनुष्यच काय पण जगांतील प्रत्येक सजीव प्राणी ईश्वराच्या प्रेरणेनेंच हालचाल करीत असतो. जणु यंत्रारूढ असलेल्या सर्व प्राण्यांना फिरवीत फिरवीत ईश्वर सर्व प्राण्यांच्या हृदयप्रदेशामध्यें वास्तव्य करीत असतो, हें तत्त्व अठराव्या अध्यायांतील श्लोक ६१ मध्यें सांगून शेवटी–

तमेव शरणं गच्छ सर्वभावेन भारत
तत्प्रसादात्परां शान्तिं स्थानं प्राप्स्यसि शाश्वतम् ।।६२।।

"त्या हृदयस्थ ईश्वरालाच तूं सर्व भावानें शरण जा म्हणजे त्याच्याच प्रसादानें तुला उत्कृष्ट शांति व शाश्वत स्थान प्राप्त होईल" असेंम्हटलें आहे.

गीतेचा दहावा अध्याय हा विभूतिविस्तार–योगाबद्दल प्रसिद्धच आहे. दहाव्या अध्यायाच्या प्रारंभीं अर्जुनानें असा एक प्रश्न केला आहे कीं, देवा तुमचें कोणकोणत्या वस्तूच्या ठिकाणीं चिंतन करूं ? सर्वत्र तुमचें अस्तित्व आहे, असें म्हणावें तर चिंतनच घडत नाहीं. (जरि तूंचि म्हणो आवघे । तरि चिंतनचि न घडे ।।) म्हणून भगवंतांनीं आपलें अस्तित्व ठसठशीतपणें कुठें

कुठें आहे हें सांगण्याकरितां आपल्या विभूतीचा विस्तार कथन केलेला आहे. तो सर्व विस्तार इथें विस्तारभयास्तव न देतां फक्त त्या अध्यायाचा उपसंहारच तेवढा देतों—

अथवा बहुनैतेन किं ज्ञातेन तवार्जुन।
विष्टभ्याहमिदं कृत्स्नमेकांशेन स्थितो जगत् ॥ ४२ ॥ गी. अ. १०

अनेक विभूतींचीं नांवें सांगून देव कंटाळले व अर्जुनालाहि हीं सर्व नांवें लक्षांत ठेवणें जड जाईल असें त्यांना वाटलें, म्हणून ते म्हणतात, " हा सगळा विस्तार समजवून घेऊन तुला काय उपयोग होणार आहे? मुख्य मुद्याची गोष्ट एवढीच लक्षांत ठेव कीं सर्व जगत् एका अंशानें मीच आंवरून धरून राहिलों आहें."

गीतेच्या निरनिराळचा अध्यायांमध्यें ईश्वराच्या सर्वव्यापित्वाचें असेंच विवेचन केलें आहे.

जेथें जेथें विवेचन आलें आहे तें येथवर सांगितलें. सामान्य मनुष्याला सुद्धां ही गोष्ट पटेल कीं, जगत् शक्ति विशेष कांहीं आहे. जी शक्ति या ब्रह्मांडांत भरली आहे तीच मनुष्यप्राण्यांतसुद्धां आहे, किंबहुना ती शक्ति हेंच त्याचें स्वरूप आहे व त्या शक्तीमुळेंच मनुष्याचें शरीरहि चालत आहे.

मानवी शरीर हें जड आणि नाशिवंत आहे. त्या जड शरीराला वागविणारा चैतन्यांश म्हणजे देव आहे हें विसरतां कामा नये. नाथभागवत अ. ११ श्लोक ३३ वरील टीका पाहा.

या लागीं देहाचें जें चळण। हृदयस्थ करवी नारायण ॥
दृष्टीचें जें देखणेंपचें। हें त्याचेनि जाण होतसे ॥
काढूनि आपला डोळा। दूरि ठेविला वेगळा ॥
तो हृदयस्थेंविण आंधळा। देखणी कळा देवाची ॥
रसना केवळ चामडी। ते काय जाणे रस गोडी ॥
कापूनि टाकिल्या बापुडी। गोडी अगोडी ते नेणे ॥
एवं देवो तो मजमाजी आहे। त्याचेनि टवटवती इंद्रियें ॥
क्रियाकर्म जें जें होये। तें त्याचेनि पाहे तत्त्वतां ॥
इंद्रियातें चेतविता। कर्मक्रिया कर्तव्यता ॥
देहाचेनि नोहे तत्त्वता। मुख्यत्वें कर्ता हृदयस्थु ॥

वरील ओव्यांचा अर्थ स्पष्टतर आहे म्हणून त्याचें स्पष्टीकरण अधिक करीत नाहीं. बाह्य जग, बाह्य सृष्टि, त्या सृष्टींतील सामर्थ्य हीं सर्व मनुष्याला गूढ आहेतच; परंतु जें शरीर मनुष्य वागवितो, जें आपलें असें म्हणतो, ज्याच्या अहंकारामुळें अनेक खटाटोप करितो त्या शरीराचें शारीर-शास्त्रसुद्धां मनुष्याला अद्याप अगम्यच आहे. मनुष्य आपल्या शक्तीनें शरीर चालवितो काय? मुळींच नाहीं. स्थिरचर चालविणाऱ्याच्या सत्तेनेंच हें शरीर चालत असतें.

चाले हें शरीर कोणाचिये सत्ते । कोण बोलवितें हरीविण ।।
ऐकवी देखवी एक नारायण । तयाचें भजन चुकों नये ।।
मानवाची देव चालवी अहंता । मीचि एक कर्ता म्हणोनिया ।।
वृक्षाचें पान हाले त्याची सत्ता । राहिली अहंता मग कोठें ?
देह हें देवाचें धन कुबेराचें । तेथें मानवाचें काय आहे ।।
निमित्ताचा धनी केला असे प्राणी । माझें माझें म्हणूनि व्यर्थ शिणे ।।

वर प्रतिपादन केलेला सिद्धान्त जरी खरा असला तरी वाचकहो, मनुष्यप्राणी विस्मरणशील असल्यामुळें त्याला पुष्कळ वेळां कळतें पण वळत नाहीं, पटतें पण वठत नाहीं, असें होत असतें. सामान्य रजोगुणी किंवा तमोगुणी मनुष्य तर राहोच; परंतु सत्त्वगुणाधिष्ठित मनुष्यसुद्धां मोहानें व्याकुळ होतो हें अर्जुनाच्याच उदाहरणावरून स्पष्ट होत आहे.

अर्जुन श्रद्धाळु, आस्तिक व बुद्धिमान् होता. त्याला ईश्वराच्या सामर्थ्याची जाणीव नव्हती असें नाहीं. ईश्वराच्या विराट स्वरूपाची कल्पना असतांनासुद्धां त्यानें प्रार्थना केली कीं देवा ! तुमचें तें अक्षय्य स्वरूप मला एकदां दाखवा पाहूं ? परमेश्वरानें दिव्य चक्षु देऊन त्याला विश्वरूपदर्शन घडविलें! तें विश्वरूप पाहून अर्जुन भ्याला. परमेश्वराच्या मुखामध्यें सर्व जगत् विलीन होत असलेलें पाहून त्याला वाटलें कीं आतां जगाचा संहार होणार. परमेश्वराचा हा रुद्रावतार जगद्भक्षक कालच आहे. या कालाला आमंत्रण देण्याची कुठून दुर्बुद्धि झाली. "देवा ! कृपा करा व माझ्याकरितां सौम्य व्हा" असें म्हणून तो त्या विराट पुरुषाची स्तुति करूं लागला, त्याला लोटांगणें घालूं लागला व सर्व बाजूंनीं नमस्कारहि घालूं लागला. विश्वरूपाचा चमत्कार पाहिल्यावर नमस्कार करण्याची बुद्धि त्याला झाली आणि भग-

वान्हि त्याला म्हणाले "अरे! तूं मारणारा आणि हे मरणारे हें सर्व झूट आहे. भीष्म द्रोणादिकांचा वध मी पूर्वींच केला आहे; तू फक्त निमित्तमात्र हो."

मयैवै ते निहता: पूर्वमेव निमित्तमात्रं भव सव्यसाचिन् । गी. अ. ११- ३३

हा सिद्धांत शेवटीं अर्जुनाला पटला. युद्ध करणें, न करणें; मारणें न मारणें; हें कांहीं आपल्या हातीं नसून ईश्वरानें आपल्याला एक निमित्त केलें आहे व त्याकरवीं तो स्वत:ला इष्ट कार्यच करवून घेत आहे, हें ज्ञान अर्जुनाला विश्वरूपदर्शनानंतर झालें.

प्रत्येकाच्या आयुष्यांत अशा अनेक घडामोडी होतात कीं त्या वेळीं आपण केवळ निमित्तमात्र आहोंत असें ज्ञान प्रत्येकाला होतें. तें ज्ञान टिकत नाहीं, पण विवेकानें टिकविलें पाहिजे. निरंतर विचार केला पाहिजे. आणि कोणतेंहि कर्म करण्यास प्रवृत्त होत असतांना आपण निमित्त–मात्र आहोंत, ईश्वर करविता आहे ही जाणीव जागृत ठेविली पाहिजे.

---

## प्रकरण आठवें

# निमित्ताची यथार्थ योग्यता

गेल्या प्रकरणांत परमेश्वर कसा सर्वव्यापी आहे व त्याच्याच प्रेरणेनें जग कसें चाललें आहे हें दाखविलें. वृक्षाचें पानसुद्धां त्याच्या प्रेरणेशिवाय जर हालत नाहीं, तर कौरवपक्षीय वीर त्याच्या संकल्पाशिवाय कसे ठार होणार? अर्जुनाला भगवंतांनीं अगदीं स्वच्छ व खडखडीत शब्दांत सांगितलें कीं "भीष्म द्रोणादिकांना तूं मारणारा व ते मरणारे हा संबंध खोटा आहे. अरे हे मेले आहेत, त्यांना मीच मारलें आहे. फक्त तुला निमित्त करून तूंच यांना या युद्धांत मारलें आहेस असें मला दाखवावयाचें आहे आणि तुला थोडा मोठे-पणा द्यावयाचा आहे. तूं माझा उपदेश न ऐकशील, युद्धाला प्रवृत्त न होशील व यांच्यावर जर बाण न सोडशील तर लक्षांत ठेव कीं तूं नाहीं तर तुझा काका दुसराच एक अर्जुन मी उभा करीन व यांचा संहार करीन. यांचा संहार करण्याचें मी ठरविलेलें आहे व त्यांचीं आयुष्येंहि क्षीण झालीं आहेत. फक्त आणा दोन आण्याचा मोठेपणा तुला निमित्त करून द्यावयाचा आहे. वाटेल तर तो घे, नाहीं तर सोडून दे."

जगाच्या या प्रचंड उलाढालींत मनुष्य हा निमित्तमात्र आहे. म्हणजे अगदीं कस्पटासमान आहे असा मात्र याचा अर्थ नाहीं. निमित्त झालें म्हणून काय झालें? त्यालाहि बरीच किंमत आहे. प्रसंगीं अल्प निमित्तानेंच मोठमोठ्या गोष्टी घडून येतात हें जर आपण पाहातों तर निमित्ताला कांहींच किंमत नाहीं असें कसें म्हणतां येईल? बोलतां बोलतां एकादा अधिक उणा शब्द तोंडांतून बाहेर पडतो व त्यामुळें जन्माचें वैर संपादिलें जातें. कांहीं कुपथ्याचें निमित्त होऊन दुखणें इतकें विकोपाला जातें कीं त्यांत प्राणनाशच होतो! खिशांत ठेवलेल्या नोटांच्या पुडक्याकडे जरा दुर्लक्ष्य होतांच शेकडों रुपयांची हानी होते, त्यामुळें पुष्कळ दिवस दैन्य भोगावें लागतें. हें जर सर्व खरें आहे, तर निमित्ताचीहि योग्यता बरीच मोठी असली पाहिजे हें सहज सिद्ध होतें. प्रस्तुत प्रकरणांत निमित्ताची यथार्थ योग्यता सांगावयाची आहे. ती यथार्थ कळली तरच मानवी प्रयत्नाला अवसर आहे.

हें प्रथम लक्षांत ठेवावें कीं गीतेमध्यें "मनुष्य निमित्तमात्र आहे" हा जो सिद्धान्त सांगितला आहे, हा इतर सर्व शास्त्रांना सुसंबद्ध असाच आहे. व्याकरणशास्त्रांत पाणिनी म्हणतो, "स्वतंत्रः कर्ता" म्हणजे कर्ता स्वतंत्र असतो. पण हें स्वातंत्र्य मर्यादितच असतें. ब्रह्मसूत्र भाष्यांतील अध्याय दोन पाद ३ पैकीं चौदा ते सोळा अधिकरणामध्यें जें जीव–स्वातंत्र्य सांगितलें आहे तेंच गीतेला मान्य आहे.

जीव कर्ता आहे म्हणूनच शास्त्राला कांही तरी अर्थ आहे. मनुष्य अगदीं लाकडाच्या ओंडयाप्रमाणें असता तर या शास्त्राज्ञा कुणाकरितां आहेत? जीव स्वतंत्र असला तरी सुतार, कुंभार हे जसे आपल्या साधनांच्या स्वाधीन असतात तसाच जीवहि परतंत्र आहे. श्रीशंकराचार्य ब्र. सू. भाष्यांत "पर्जन्यवदीश्वरो निमित्तत्वमात्रेण" असें एक मार्मिक वाक्य लिहितात. त्याचें स्पष्टीकरण असें कीं माळ जमीन असेल तर ती उकरून तींत नवी माती घालणें, तींत नांगर वगैरे घालून मेहनत करणें, पेरणी करणें इत्यादि सर्व मनुष्ययत्नांत येतें. मनुष्याच्या या सर्व यत्नांना पाऊस पडला म्हणजे यश येतें. अर्थात् ईश्वर हा पर्जन्याप्रमाणें मानवी यत्नांना सुफलता आणण्यास एक मोठें कारण आहे.

भगवद्गीतेंतील अध्याय १८ श्लो. १४ मध्येंहि वरील सिद्धांताचा

अनुवाद केल्याचा भास होतो. कोणत्याहि कार्याला अधिष्ठान म्हणजे स्थल अगर क्षेत्र, कार्य करणारा कर्ता, कार्य करण्याचीं निरनिराळीं साधनें आणि त्या साधनांच्या कर्त्याला कराव्या लागणाऱ्या निरनिराळ्या क्रिया या यत्न-चतुष्टयाची आवश्यकता आधीं असते. हे सर्व यत्न मानवाधीनच आहेत. या सर्वांची बिनचुक योजना झाली असली म्हणजे मग पांचवें कारण दैव, देवता किंवा ईश्वर हें एक लागतें. या पांचव्या कारणांमुळें वरील मानवी यत्न सफल होतात; असा गीतेचा सिद्धांत आहे.

न्यायशास्त्र आणि इतर शास्त्रें यांमध्यें कार्य व कारण यांचा उत्तम विचार केलेला आहे. शास्त्रकार, उपादान कारण व निमित्त कारण अशीं दोन मुख्य कारणें मानतात; उदाहरणार्थ, एक वस्त्र घेतलें तर विणकरी, सूत कांतणारा, पांजण देणारा व त्यांचीं साधनें हीं सर्व निमित्त कारणें होत. आणि तंतू म्हणजे सूत हें पटाचें उपादान कारण होय. तसेंच मृत्तिका हें घटाचें उपादान कारण होय. गाढवावरून माती वाहणें, कुंभारानें गाडगीं घडणें, आणि इतर क्रिया करणें हीं निमित्त कारणें होत. मनुष्याच्या कर्तृत्वाला वरील कारणानुसार दुसरा क्रमांक दिला आहे म्हणून त्याचा अधिक विचार करूं.

वस्त्र तयार करण्याकरितां कापूस पिकविला पाहिजे. सूत कांतलें पाहिजे, वस्त्र विणलें पाहिजे, हें सर्व माणसानेंच केलें पाहिजे किंवा मनुष्यानें आपली बुद्धि चालवून यंत्राकडून तरी करून घेतलें पाहिजे. लांब धाग्याचा चिवट कापूस पिकविणें, कापसाच्या सरकीवर रासायनिक प्रयोग करून वारा, पाऊस अगर वाईट हवा यांना प्रतिकारक अशी शक्ति तिजमध्यें उत्पन्न करणें हें सर्व मनुष्ययत्नाधीनच आहे. अर्थात् या पलीकडील जो भाग आहे, तो ईश्वरी लीलेंत जाईल. माती आणणें, ती तुडविणें, तींत चिकणाई आणणें, चाकावर घडे बनविणें व आव्यांत भाजणें हें सर्व मनुष्ययत्नामध्यें येतें. परंतु माती, पाणी, वारा इत्यादि उत्पन्न करणें हें मानवयत्नापलीकडील आहे. घटाचें उपादान कारण जें मृत्तिका ती असल्यावर मग कुणीहि घट बनवील. गाढवांनीं माती न वाहिली तर बैलावरून, रेड्यावरून, निदान माणसें तीं आपल्या डोक्यावरून वाहून आणतात. कुणी तरी ती भिजवील, तुडवील, एकादा कुंभार मी गाडगीं घडविणार नाहीं असें जर म्हणाला तर त्याचा दुसरा कुंभार येईल, किंवा जो गाडगीं घडील त्यालाच आपण कुंभार

म्हणूं. तात्पर्य मृत्तिका असल्यावर अनेक निमित्तकारणामुळें घट तयार होईल; पण एकादें निमित्त अडून बसलें तर त्यामुळें कार्य न अडतां दुसरें निमित्त पुढें येईल व कार्य होऊन जाईल.

असाध्य रोग जडलेल्या मनुष्याला उत्तम औषध दिलें पाहिजे, त्यानें कडक पथ्य पाळलें पाहिजे व त्याजवर उत्तम धन्वंतरीची देखरेख पाहिजे, हें खरें. परंतु हीं सर्व असून जर रोग्याच्या आयुष्याची दोरी म्हणजे जीवनशक्ति बळकट नसेल तर या निमित्त कारणांचा कांहीं तरी उपयोग आहे काय? रोग्यामध्यें जीवनशक्ति असेल, त्याचें आयुष्यहि अधिक असेल तर एक धन्वंतरी प्रसंगीं अडून बसला तर दुसरा आपोआप येईल व तोहि न मिळाला तर एकाद्या आजीबाईच्या साध्या औषधाचेंहि निमित्त होऊन त्याला विलक्षण गुण वाटेल.

घरांत एकादें सुंदर फुलझाड लावण्याचा यत्न आपण करितों, स्वत: खत पाणी घालतों, शक्य ती काळजी घेतों, परंतु त्या झाडाच्या जीवनशक्तीला तेथील वातावरण प्रतिकूल असल्यामुळें तें झाड कांहीं केल्या घरांत वाढत नाहीं. उलटपक्षीं त्याच जातीचीं फुलझाडें रानावनांत, अरण्यांत जेथें कसल्याहि तऱ्हेची निगा ठेवणें शक्य नाहीं, अशा ठिकाणीं अत्यंत जोमानें वाढलेलीं दिसतात. याचें कारण हेंच कीं निमित्त कारणापेक्षां जीवनशक्ति हें जें उपादान कारण तें बळकट असतें. आईबाप असलेलीं, भाग्यवान्, सर्वानुकुल्य असलेलीं मुलें पुढें मूर्ख निपजतात व अगदीं पोरकीं, दरिद्री आणि अत्यंत बिकट परिस्थितींत वाढलेलीं मुलें नांवारूपाला येतात हें आपण पाहात नाहीं काय?

प्रत्येक गांवांत एकादा सार्वजनिक उत्सव होत असतो. गांवांतील लोकांना तो पाहिजे असतो म्हणून कुणीही कार्यकर्ता पुढें होऊन 'उत्सव करितो म्हणाला, म्हणजे ते त्याला मदत करितात. कित्येक वेळां कार्यकर्त्यांमध्यें तंटे उत्पन्न होतात, ते एकमेकांवर रुसतात व अडून बसतात. परंतु कांहीं लोक जरी उत्सवाविरुद्ध असले तरी गांवांतील लोकांना तो पाहिजे असतो म्हणून लहान कार्यकर्त्याला सुद्धां लोक मोठा करितात व उत्सवाचा थाट उडवून देतात. लोकांचें मनोगत हें उपादान कारण दृढ असलें म्हणजे निमित्त कारण म्हणून कुणीहि पुढें झाला तरी उत्सव होऊन जातो.

हिंदुस्थानांतील बुद्धिमानांच्या महत्त्वाकांक्षेला वाव नाहीं, तरुणांच्या कर्तृत्वाला कार्यक्षेत्र नाहीं, सुशिक्षितांच्या भावनांना अनुकूल वातावरण नाहीं, शेतकऱ्यांना वर डोकें काढावयाला वाव नाहीं व मजुरांना तर पोटभर भाकरीहि मिळत नाहीं. या व अशा तऱ्हेच्या असंख्य कारणांमुळें इंग्रजी राज्याविरुद्ध हिंदी जनतेचा असंतोषाग्नि भडकलेला असतांना कायदेभंगाच्या आंदोलनाला यश कां बरें येणार नाहीं? ज्या राज्यपद्धतीमुळें अन्न मिळत नाहीं, अब्रू राहात नाहीं. स्त्री व जीवित यांची सुरक्षितता नाहीं, ती राज्यपद्धति बदलून घेण्याची इच्छा कां बरें न व्हावी ? ही भावना हिंदी राष्ट्रांत वावरत असतांना महात्मा गांधीनीं कायदेभंगाकरितां १९३० च्या मार्च महिन्यांत महाप्रस्थान ठेविलें !

महात्मा गांधींची प्रथम अटकळ अशीच होती कीं हजार दोन हजार माणसें फार तर या कार्याला मिळतील व आपण हा लढा चालवूं. परंतु निर्बंधभंगाच्या आंदोलनाला पुढें धिम्मेपणानें विराट स्वरूप आलें. सधननिर्धन, श्रीमंतगरीब, बालवृद्ध, स्त्रिया व पुरुष अशा सर्वांनीं त्या युद्धांत भाग घेतला. राजबंद्यांची व्यवस्था ठेवतां ठेवतां सरकारला पुरे पुरे केलें. मोठमोठ्या प्रासादांत राहणारे, ऐषआराम भोगणारे, सुग्रास अन्न खाणारे, गाद्या गिरद्यांवर लोळणारे, जे हजारों देशभक्त कारागृहांत गेले त्याचें कारण काय ? हिंदुस्थानांत जी राज्यपद्धति आहे ती आपल्या फायद्याची नाहीं, हें पटवून जनतेंत असंतोष उत्पन्न करण्याचें जें काम आजवर मोठमोठ्या पुढाऱ्यांनीं केलें, त्याचें कायदेभंगामध्यें रूपांतर करण्याचें श्रेय महात्मा गांधींना लाभलें येवढेंच!

राष्ट्रांत नवचैतन्य संचारत आहे स्वातंत्र्याच्या भावना विकसत आहेत आणि असंतोषाग्नीची खाई पेटली आहे. अशा वेळीं महात्मा गांधी निमित्तमात्र पुढें झाले व त्यांनीं 'निर्बंधभंग करा' अशी राष्ट्राला आज्ञा केली. म. गांधींच्या कल्पनाक्षेत्रांत नव्हतें येवढें जें स्वरूप आलें, त्याचें श्रेय म. गांधीजी आपणाकडे घेतील काय? मुळींच नाहीं. ते म्हणतात 'ही ईश्वरी लीला आहे, ही ईश्वरी प्रेरणा आहे, मी फक्त निमित्तमात्र आहें.' तात्पर्य, स्वातंत्र्यलालसा व तीव्र असंतोष हें उपादान कारण व याला योग्य स्वरूप देण्यास सर्वस्वी समर्थ असें निमित्त कारण म्हणजे महात्मा गांधी !!

वरील विवेचन लक्षांत घेऊन निमित्तकारणाची यथार्थ योग्यता प्रत्ये-

कानें लक्षांत ठेवावी व निमित्ताचा जेवढा प्रभाव आहे तेवढाच सात्त्विक अहंकार मनुष्याला असावा. सात्त्विक अहंकार म्हणजे ती आपल्या अस्तित्वाची जाणीव आहे व ती अवश्य पाहिजे. प्रत्येकाला मी आहे असें वाटतें हेंच ईश्वराचें स्फुरण होय व तें स्फुरण ईश्वरस्वरूपच होय. जगांत जसें ईश्वरी स्फुरण आहे तसेंच तें मानवी हृदयांतहि आहे. ज्ञानेश्वर म्हणतात—

येरव्हीं सर्वांच्या हृदयप्रदेशीं । मी अमुका आहे ऐशी ।।
जे बुद्धि स्फुरे अहर्निशीं । ते वस्तु गा मी ।। अ. १५।४२१

अस्तित्वाबद्दल जें बुद्धीचें स्फुरण असतें तें पाहिजेच. परंतु या सात्त्विक अहंकाराबाहेर रजतमोमिश्रित अहंकारांत जेव्हां मनुष्य जातो तेव्हां तो आसुरी संपत्तीचा दास होऊन अधःपतित होतो.

मी धनाढ्य आहें, मी कुलीन आहें, माझ्यासारखा दुसरा कोण आहे! मी ऐश्वर्यसंपन्न आहें, आज मी या शत्रूचा वध केला, उद्यां त्याचा करीन, सर्वांना पाणी पाजीन, इत्यादि बढाया मारणें हें मूर्खपणाचें लक्षण नव्हे काय ? एकादी व्यक्ति वा समाज, किंवा राष्ट्र जेव्हां एवढ्या अभिमानाच्या भमिकेवर जातें व बढाईखोर बनतें, त्या त्या वेळेला दैवी चमत्कार घडून येतात. 'मी' 'मी' म्हणणाऱ्यांना सुद्धां तुम्ही केवळ निमित्तमात्र आहांत ही जाणीव परमेश्वर जगांतल्या अनेक प्रकारांनी पटवीत असतो. प्रसिद्ध टिटॅनिक बोट बुडाल्याचें उदाहरण हाच सिद्धान्त सुचवीत नाहीं काय ?

"गर्वाचें घर खालीं" ही म्हण फार अर्थपूर्ण आहे. गर्व, ताठा, अभिमान यांचा प्रभाव देवादिकांवरसुद्धां होतो, व त्या वेळीं त्यांचा अधःपात होतोच. देव झाले तरी काय ? "द्योतनात देवाः ।" ते सत्त्वगुणांनीं प्रकाशमान असतात तोंपर्यंतच ते देव. सत्त्वगणाचें स्थान सोडून ते रजतमोगुणामध्यें आले, म्हणजे त्यांचाहि गर्व ईश्वर वेळोवेळीं नष्ट करीत असतो. केनोपनिषदाच्या तृतीय खंडामध्यें एक मजेदार गोष्ट आहे, ती अशीः—एकदां असें झालें कीं, सुरासुरांचें मोठें युद्ध होऊन त्यांत विजयश्रीनें सुरांच्या गळ्यांत माळ घातली. विजयभरानें बेभान झालेले देव परमेश्वराच्या कृपेनें आपणांस जय मिळाला हें विसरून "आम्हींच यंव् त्यंव् केलें !" इत्यादि म्हणूं लागले. ईश्वरानें यक्षाचें रूप धारण करून त्यांचा गर्वपरिहार केला.

देवांच्या पुढें हा यक्ष एकदम उभा राहिला. त्याचें दिव्य तेज पाहून सर्व

देव दिपून गेले. अग्नि मोठ्या धैर्यानें हा यक्ष कोण आहे हें पाहण्याकरतां पुढें सरसावला. यक्ष म्हणाला 'तूं कोण आहेस ? तुझी काय शक्ति आहे ?' अग्नीनें मोठ्या तोऱ्यानें "मी जातवेदस आहें, सर्व जगाला जाळण्याचें माझें सामर्थ्य आहे" असें म्हटलें. यक्ष म्हणाला "ठीक आहे ! ही गवताची काडी जाळ पाहूं !" असें म्हणतांच अग्नीनें ती काडी जाळण्याकरतां जंग जंग पछाडले पण त्याला यक्षानें पुढें टाकलेल्या त्या काडीला जाळतां न आल्यामुळें तो खजिल होऊन देवसमुदायांत परत आला. मागाहून वायूहि मोठ्या दिमाखानें यक्षाकडे गेला व "मी मातरिश्वा आहें, वायू आहें, सर्व जगांतल्या वस्तू उडवून देण्याचें माझें सामर्थ्य आहे" असें म्हणाला. यक्षानें नुस्ती मान डोलविली व पूर्वीचीच काडी त्याच्यापुढें ठेविली. ती काडी उडवून देण्याचा वायूनें अटोकाट यत्न केला पण ती हलली सुद्धां नाहीं. शेवटीं इंद्र त्या यक्षाकडे गेला त्याबरोबर यक्ष अंतर्धान पावला व आकाशांतून एक अत्यंत शोभायमान 'हैमवती' स्त्री पुढें आली व तिनें त्या देवांना हा "यक्ष नसून हा परब्रह्म ईश्वर आहे" असें सांगितल्यावर सर्व देव पश्चात्तप्त होत्साते ईश्वराचें स्मरण करूं लागले व त्यांनीं विजयाबद्दलचा आपला गर्व सोडून दिला.

भागवतांतील प्रथम स्कंदामध्यें अर्जुनाच्या अहंकारपरिहाराची अशीच एक गोष्ट आहे.

अर्जुनाला गांडीव धनुष्याचा मोठा अभिमान. त्याच्या साहाय्यानें काय पाहिजे तें करीन ही त्याला धमक, पण श्रीकृष्णांनीं निजधामास जातांना गोपस्त्रियांना द्वारकेपासून गोकुळापर्यंत सुखरूप पोंचविण्याचें काम अर्जुनास सांगितलें असतां तें त्याजकडून झालें नाहीं. अर्जुन त्या स्त्रियांसह वर्तमान चापबाण यांनीं सज्ज असतांना एका अरण्यांत आला. तेथील भिल्लानें अर्जुनाच्या जवळचें तें कांबीट (गांडीव धनुष्य) एकदम हिसकावून घेतलें, दोन श्रीमुखांत भडकावल्या व त्या स्त्रियांच्या अंगावरील होते तेवढे अलंकारहि लुबाडून घेतले ! अर्जुन अगदीं रडत रडत त्या स्त्रियांसह वर्तमान आला, व आल्यावर त्यानें धर्मराजाला गलितगर्व होऊन सर्व कथा सांगितली. परमेश्वर निजधामाला गेल्यावर तेंच धनुष्य, तेच बाण, तोच सारथी, तेच घोडे व तोच रथ जरी होता तथापि त्यांचा उपयोग कांहीं झाला नाहीं.

ईश्वराची शक्ति होती तोंवरच त्याला पराक्रम करतां आला, पण ती संपल्यावर भस्मांत घातलेल्या तुपाप्रमाणें सर्व साधनें निरुपयोगी ठरलीं-

तद्वै धनुस्त इषवः स रथो हयास्ते । सोऽहं रथी नृपतयो यत आनमन्ति ॥
सर्वं क्षणेन तदभूदसदीशरिक्तं । भस्मन्हुतं कुहकराद्धमिवोप्तमूष्याम ॥
—भा. स्कं १ अ. १५ श्लो. २१.

राजेलोक ज्याला शिरसावंदन करीत, तेंच धनुष्य, तेच बाण, तोच रथ, तेच घोडे, तोच रथी, पण या सर्व वस्तु श्रीकृष्णरहित झाल्यामुळें कोणतेंहि काम करण्यास समर्थ राहिल्या नाहींत. भस्मामध्यें हवन केलेलें बीज़ उखर जमिनींत पेरलें व गारुड्यानें खेळांत ऐश्वर्य दाखविलें तर तें जसें सर्व व्यर्थ होय, तशीच स्थिति अर्जुनाच्या साधनांची झाली.

श्रीसमर्थ रामदास व शिवाजी महाराज यांचीहि एक अशीच गोष्ट सांगतात. हिंदुपदपादशाही स्थापन केल्याचा अहंकार छत्रपति शिवाजी महाराजांच्या ठायीं डोकावूं लागला. समर्थांना हें समजतांच त्यांनीं एक युक्ति योजिली. किल्ल्यावर तटाचें काम चाललें होतें. मोठमोठे सुरुंग लावून खडक पाडण्याचा धडाका चालला होता. नुकताच सुरुंग उडवून एक मोठा खडक पाडला होता. त्यावर घणाचे घाव घालतांच दोन तुकडे होऊन त्यांतून एक बेडकी एकदम बाहेर पडली !

समर्थ म्हणाले "शिवबा! या बेडकीला पाणी कोण घालतो ? व अन्न कोण घालतो? इचें संरक्षण कोण करतो ?" या प्रश्नांतील खोंच शिवाजी महाराजांच्या लक्षांत आली व त्यांनीं हात जोडून चुक कबूल करून "ईश्वराच्या कृपेनेंच स्वराज्यस्थापना झाली. आपण फक्त निमित्तमात्र आहों!" अशी कबुली दिली. 'आम्ही काय कुणाचें खातों तो राम आम्हाला देतो' हें पद याच प्रसंगावरील असल्याचें सांगतात.

वरील अनेक उदाहरणांवरून ईश्वराचें कर्तृत्व केवढें आहे व मानवी कर्तृत्व किती आहे याची कल्पना होईल. तसेंच मनुष्य निमित्तमात्र आहे म्हणजे काय? आणि त्या निमित्ताची यथार्थ योग्यता काय आहे हें बरोबर समजेल. हें सर्व लक्षांत ठेवून जगांतील सांसारिक कर्तव्यें मनुष्यानें कोणत्या भावनेनें करावीं याचा विचार आतां पुढील प्रकरणामध्यें करूं.

## प्रकरण नववें

# निमित्तमात्र ही भावना व सांसारिक कर्में

ईश्वर कर्ता व करविता आणि मनुष्य केवळ निमित्तमात्र ही भावना सश्रद्ध व भाविक अंतःकरणांतच उत्पन्न होते. नास्तिक, अभाविक जगांत ईश्वर नाहीं, जग हें कांहीं तरी चाललें आहे, असल्या संशयात्म्याला हा विषय कळणार नाहीं व गीतेंत त्याला समाधानाचें स्थानहि आढळणार नाहीं हें पूर्वीं सांगितलेंच आहे.

जगावर सत्ता परमेश्वराची आहे. त्याच्या इच्छेप्रमाणें व सत्तेनें सृष्टीचे सर्व व्यवहार घडत आहेत. सृष्टिव्यवहारांतील एकाद्या कार्याचा विशिष्ट भाग मनुष्याला निमित्त करून त्याच्या हातून करविण्यासाठीं परमेश्वर मनुष्याला जन्माला घालतो. आणि परमेश्वरानें योजलेलें हें कार्य एकाद्या माणसानें न केलें तर त्यांत परमेश्वराची अवज्ञा होते; ही भावना सदैव जागृत ठेवून परमेश्वरस्मरणपूर्वक सर्व कर्में करावीं व तीं करणें हीच ईश्वराची पूजा आहे असेंच गीतेचें सांगणें आहे.

गीतेचा हा उपदेश ठसावा म्हणून परमेश्वर अर्जुनाला असें सांगतात कीं हें पाहा, प्रत्येक कर्म तूं मला अर्पण कर व प्रत्येक कर्म करतांना तें ईश्वरा-करतां आहे व ईश्वरी प्रेरणेमुळें घडत आहे हें स्मरण ठेव. जें तूं करशील, खाशील, हवन करशील, दान देशील, तप करशील तें सर्व तूं मला अर्पण करीत जा आणि प्रत्येक वेळीं मी परमेश्वर दूर नसून जवळच आहें, हृदयांत आहे व त्याचीच प्रेरणा कार्य घडवीत आहे असें अनुसंधान ठेव.

प्रत्येक प्रेरणा हृदयस्थाची आहे, प्रत्येक कर्म त्याच्या प्रेरणेनें चाललें आहे असें स्मरण ठेवणें व प्रत्येक कर्म ईश्वराला अर्पण करणें ही वृत्ति नुसती बोलण्यास व लिहिण्यास फार सोपी आहे, परंतु ती अंगीं मुरणें, त्या वृत्तींत रंगून जाणें, व तदाकार होणें हें कर्म फार कठिण आहे. तथापि तें असाध्य कर्मसुद्धां दृढ अभ्यासानें, मनोनिग्रहानें व वैराग्यानें सुसाध्य होतें. हें ज्याला साध्य झालें तोच ईश्वराचा भक्त समजावा व त्याचेकडून होणारीं कर्में निमित्तमात्र या भावनेनें होतात.

भगवद्भक्त, साधु व सत्पुरुष म्हणजे सर्व संसार सोडलेले व निष्क्रिय पुरुष अशी अलीकडे समजूत दिसते. परंतु भगवद्भक्ति, वैराग्य व त्याबरोबर

स्वभावविहित कर्में करणें हेंच गीतेमध्यें भगवद्भक्ताचें लक्षण अध्याय ११ च्या शेवटीं सांगितलें आहे. "सर्व कर्में माझीं म्हणजे परमेश्वराचीं होत या बुद्धीनें कर्में करणारा, मत्परायण, संगविरहित आणि सर्व भूतांचे ठायीं निर्वैर असा जो माझा भक्त तोच मला येऊन मिळतो" इत्यादि. नारद, पराशर, व्यास, शुक, भीष्म, वसिष्ठ, हनुमान इत्यादिकांना भागवतोत्तम म्हणजे परम भगवद्भक्त असें म्हणतात. त्यांचें चारित्र्य काय बरें शिकवितें ?

नारदांनीं अखंड ईशस्मरण ठेवून जगद्धितार्थ अनेक उलाढाली केल्या. व्यासांनीं अहोरात्र कित्येक दिवस खपून महाभारत ग्रंथ तयार केला. पराशरांनीं स्मृति लिहिली. शुकांनीं भागवत सांगितलें. भीष्म स्वत: जरी आमरण ब्रह्मचारी होते तरी स्वधर्माप्रमाणें स्वकीयांचें व राज्याचें रक्षण करण्याचें काम त्यांनीं मरेपर्यंत चालविलें होतें. हनुमान हे रामचंद्राचे परम भक्त होते. परंतु त्यांनींसुद्धां रावणादिक दुष्टांच्या शासनाचें काम सारखें चालविलेंच होतें. या सर्व भागवतांनीं आपण निमित्तमात्र आहोंत, ईश्वरानें सोपविलेलें विशिष्ट कर्म आपण केलेंच पाहिजे, या वृत्तीनेंच कर्म केलें म्हणून इतरांनींसुद्धां तीच वृत्ति कमाविण्याचा यत्न केला पाहिजे.

गीतेंतील भगवद्भक्त व प्राकृत मनुष्य या दोघांच्या विचारसरणींत मोठा फरक असतो. दोघेहि सांसारिक कर्में करितात. परंतु एकाला ईश्वराचें सामर्थ्य, जगत् व आपण कोण यांचें विस्मरण केव्हांहि होत नाहीं, आणि दुसऱ्याला मी देह आहें, मीच केवळ कर्ता व भोक्ता या पलीकडे कांहीं ज्ञान असत नाहीं.

संसार त्याग न करितां । प्रपंच उपाधी न सांडितां ।।
जनामध्यें सार्थकता । विचारेंचि होय ।। —दासबोध

ही विचारदृष्टि एकाला असते व दुसऱ्याला मुळीच नसते इतकेंच.

कर्मयोगी भगवद्भक्त व सामान्य प्राकृत जीव यांपैकीं पहिल्याला कर्तेपणाचा अभिमान असत नाहीं, कारण सर्वच कर्ता करविता ईश्वर अशी त्याची ठाम समजूत असते. परंतु प्राकृत जीव 'मी मी' या अहंकारानें मरतो व क्षणोक्षणीं सुखदु:खाचे तडाखे त्याला खावे लागतात. आणखी एक उदाहरण देऊन हा विषय स्पष्ट करितों.

चोऱ्या, मारामाऱ्या, बदफैलीपणा इत्यादि कुकर्में करणाऱ्यांना

तुरुंगांत जावें असें वाटत नाहीं. परंतु अपराधाकरितां शिक्षा म्हणन त्यांच्या इच्छेविरुद्ध त्यांना कारागृहांत घालतात व पाहिजे तें काम त्यांचेकडून करवून घेतात. या सर्व गोष्टी त्यांच्या इच्छेविरुद्ध घडत असल्यामुळें त्यांना काय बरें वाटत असावें ? पण स्वातंत्र्ययुद्धांत उडी घेतलेला एकादा राजबंदी आहे, तो तर समजून उमजून निर्बंधभंग करितो व कारागृह हें स्वातंत्र्याचें मंदिर म्हणूनच तो त्यांत प्रवेश करितो. कारागृहांत गेल्यावर तेथील नियमांप्रमाणें वागणें व शांत रीतीनें शिक्षा भोगणें हेंहि कर्तव्यच आहे असें तो समजतो. हा राजबंदी स्वेच्छेनें बंदी झालेला असतो, परंतु वरील गुन्हेगार हा बलात्कारानें बंदी झालेला असल्यामुळें दोघांच्या मनोवृत्तींत जमीन अस्मानाचें अंतर पडतें.

जो स्वेच्छेनें, श्रद्धेनें, आस्थेनें ईश्वराचा कैदी म्हणजे दास झाला, भक्त झाला, सेवक झाला, त्याचें शरीर जरी काम करितें तरी तें सर्व ईश्वराकरितांच करित असतें. त्याला होणारी प्रत्येक प्रेरणा ईश्वराची आहे, असें समजून तो स्वत: त्या वृत्तीनें वागत असतो. अर्थात् अशा भक्तांची काळजी परमेश्वराला घ्यावी लागते. हें पुढील श्लोकांवरून ध्यानीं येईल.

ददामि बुद्धियोगं तं येन मामुपयांति ते । गी. १०-१०

तेषामहं समुद्धर्ता मृत्युसंसारसागरात् ।।अ. १२-७

तेषां नित्याभियुक्तांना योगक्षेमं वहाम्यहम् ।। अ. ९-२२

एकदां भक्तानें आपली सर्व चित्तवृत्ति देवाला दिली म्हणजे त्याची सर्व चिंता देवाला लागते. पतिव्रता स्त्रीनें आपलें सर्वस्व पतीला अर्पण केलें कीं अर्थात् तिची सर्व लाज व अब्रू सांभाळण्याचें काम पतीकडे येतें. इमानी सेवकाची काळजी स्वामीला व मुलाची काळजी जशी आईलाच घ्यावी लागते, तसाच देव व भक्त यांचा व्यवहार होतो.

विद्वानाची पारख करण्याला विद्वानच व्हावें लागतें. वांझोटीला प्रसववेदनांची कल्पना कशी येईल? उत्तम शिक्षकाच्या शिक्षण कौशल्याचें महत्त्व बुद्धिमान् व अभ्यासी विद्यार्थीच जाणू शकतो. त्याप्रमाणेंच ईश्वराचें भक्तवात्सल्य कसें आहे हें जाणण्यास परमभक्तच व्हावें लागतें. आपण निमित्तमात्र आणि ईश्वरच सर्व कर्ता करविता अशी अखंड ज्योत ज्यांच्या अंत:करणांत पेटलेली असते त्यांचाच हा अनुभव आहे, येवढें विसरतांकामा नये.

लोभी, कर्मफलेच्छु, अहंकारी अशा रजोगुणी माणसांनासुद्धां पुष्कळ वेळां आपल्या कार्यांत कल्पनेपेक्षां अधिक यश आलें म्हणजे तें ईश्वरी कृपे-मुळें आलें असें वाटतें. कारण त्यांची मतीच चालत नाहीं व प्रयत्न तर मुळींच तेथें पोंचत नाहीं. एकाद्या वक्त्याला आपल्या व्याख्यानाला कल्पनेपेक्षां रंग आल्याचा अनुभव पुष्कळ वेळां येतो. कीर्तनकारांच्या कीर्तनांत अशी एकादे वेळीं बहार उडते कीं सांगून सोय नाहीं. नटांचा अनभवहि असाच आहे. त्यावरून " देणें ईश्वराचें " असेंच सिद्ध होतें.

परमेश्वराला एकादी गोष्ट घडवून आणावयाची असली म्हणजे तो एकाद्या माणसांत असा अभिनिवेश उत्पन्न करितो कीं त्याचें वर्णन करितां येत नाहीं. आईबाप मेलेलें पोरकें पोर असतें. परंतु त्याचा सांभाळ ईश्वराला करावयाचा असला कीं तो जनक आईबापापेक्षां अधिक अभिनिवेशाचीं माणसें उभीं करितो व त्या पोराचें संरक्षण करितो. संस्थेबद्दलहि हाच अनुभव आहे व कार्याविषयींचीहि हीच स्थिति आहे.

प्रस्तुत लेखकाचा स्वानुभवहि असाच आहे. श्रीक्षेत्र वाई येथील सुप्रसिद्ध प्राज्ञपाठशाळेकरितां रात्रंदिवस झटून पैसा मिळविणें, संस्थेवरील येणाऱ्या आक्षेपांचें निरसन करणें, आश्रयदाते, चालक, व शिक्षक, यांचीं तंत्रें सांभाळणें, वृत्तपत्रांत लेख लिहिणें, रोज २०।२५ पत्रें लिहिणें, १०।१५ गृहस्थांना भेटणें, कीर्तन, प्रवचन, व्याख्यानांचे कार्यक्रम करणें, संस्थेमध्यें आवश्यकतेप्रमाणें स्वतःस येणारा विषय शिकविणें, झाडलोट करणें, सारविणें, तात्पर्य, अगदीं लहान कामापासून तों जबाबदारीच्या मोठ्या कामांपर्यंत सर्व कामें करणें, हा कार्यक्रम सारखा ८।१० वर्षें लेखकाकडून कसा झाला याचेंच आश्चर्य वाटतें. ईश्वराला त्या संस्थेला नांवारूपाला आणावयाचें होतें, म्हणूनच त्यानें असा दांडगा अभिनिवेश उत्पन्न केला व राक्षसाप्रमाणें काम करून घेतलें.

प्राज्ञपाठशाळा सुटल्यावर ईश्वरानें लेखकामध्यें ब्राह्मणसंघटण व हिंदुसंघटण यांबद्दल चैतन्य उत्पन्न केलें व तेंहि काम २।३ वर्षें असें जोरानें व धडाडीनें घडवून आणिलें कीं संग्रहणीच्या आजारी स्थितीमध्यें रोज १०।१५ पत्रें व १।२ लेख लिहिणें, प्रत्येकाशीं चर्चा करणें, प्रसंगीं प्रवासास जाणें, येवढें काम कसें झालें याचा मोठा अचंबा वाटतो. तथापि

प्रत्येक लहानमोठ्या कार्यकर्त्याला वरील प्रकारचा अनुभव येणें अशक्य नाहीं.

परमेश्वराला महाराष्ट्रांत प्रागतिक विचाराचे देशकालज्ञ शास्त्री तयार करावयाचे होते म्हणून त्यानें गुरुवर्य वे. शा. सं. मराठेशास्त्र्यांना प्रेरणा केली. ती होतांच शास्त्रीबुवांच्या अंगीं असा संचार झाला कीं तो ब्राह्मण ३० वर्षें अव्याहत शास्त्राध्यापन करीत होता. त्यांच्या यत्नामुळें अनेक शास्त्री निर्माण झाले, ते बृहन्महाराष्ट्रांत पसरले आणि त्यांनीं धार्मिक व सामाजिक क्षेत्रांत उत्तम कामगिरी केली. प्रो. अण्णासाहेब कर्वे यांच्या ठिकाणीं स्त्रीशिक्षणाबद्दल व अंताजीपंत काळ्यांच्या ठिकाणी पैसा फंडाबद्दल व अनकांच्या ठिकाणीं अनेक कार्यांबद्दल प्रेरणा करून ईश्वरानें तीं कार्यें घडवून आणलीं हेंच खरें आहे.

महाराष्ट्रांतील सुप्रसिद्ध कारखानदार श्री. लक्ष्मणराव किर्लोस्कर यांनीं बेळगांवीं नागझरीवर जो कारखान्याचा प्रथम उपक्रम केला त्या वेळीं त्यांना आजच्या स्वरूपाची कल्पना होती काय? केवळ यत्नानेंच एवढें अवाढव्य स्वरूप आलें काय? नव विचारांचा ओघ हिंदुस्थानांत येत आहे, ईश्वर त्याला साहाय्य करीत आहे, अशा वेळीं एक कारखानदार म्हणून नांव घेण्यापुरतें निमित्त ईश्वर पुढें उभें करीत आहे हेंच त्यांतील खरें तत्त्व आहे!

सांगलीच्या दे. भ. वेलणकरांनीं तर प्रथम चार दोन माग पुण्यास एका भाड्याच्या घरांत चालविले होते; पण लिमिटेड कंपनीचें स्वरूप न देतां दुसऱ्या कुणाचेंहि एक पै भांडवल न घेतां आज श्री गजाननाच्या कृपेनें गजानन मिलला जें स्वरूप आलें आहे त्याला श्री. वेलणकर निमित्तमात्रच आहेत. इतक्या मजुरांचें, कामदारांचें व कारागिरांचें अन्नपाणी एका ठिकाणीं निगडित झालें आहे, ईश्वराला त्या सर्वांना एकाच ठिकाणांतून अन्नपाणी पोंचवावयाचें असल्यानें तो एकाद्या कारखान्याचें निमित्त पुढें करतो हेंच खरें!

भगवद्भक्तांचीं व कर्त्या पुरुषांचीं वरील प्रकारचीं अनेक उदाहरणें लक्षांत घेऊन आपणहि "निमित्तमात्र" या भावनेनें सर्व सांसारिक कर्में करण्यास शिकलें पाहिजे. हा एक अभ्यासानें वृत्ति बनविण्याचा मार्ग आहे. शक्य तेवढी बुद्धि चालवावी, दीर्घ यत्न करावा; परंतु प्रत्येक वेळीं प्रेरणा ईश्वराची आहे, हृदयस्थाची आहे हें स्मरण अखंड ठेवावें.

हें स्मरण नित्य ठेवणाऱ्या मनुष्याला मनस्ताप होत नाहीं. त्याचें समाधान बिघडत नाहीं आणि प्रत्येक कर्म त्याचेकडून उत्साहानें व निर्विकार वृत्तीनें होतें. धन्यानें सोंपविलेलें काम उत्तम करावयाचें एवढेंच ध्येय इमानी व कष्टाळु नोकर आपल्यापुढें ठेवितो. त्या कार्याबद्दल लाभहानि, सुखदुःख यांची त्याला कांहींहि क्षिति नसते. ईश्वरानें सोंपविलेलें काम उत्तम करावयाचें व ज्यामुळें ह्या विश्वाची घटना घडत आहे, त्याला तें अर्पावयाचें येवढेंच ध्येय सामान्य प्रापंचिक व्यावहारिक माणसांनी डोळ्यापुढें ठेविलें तरीहि पुष्कळ कार्यभाग होईल. पुष्कळ वेळां मनुष्य खिन्न, विकारवश व किंकर्तव्यतामूढ होत असतो. अशा वेळीं त्यानें शांत राहावें, विचार करावा व आपल्या हृदयस्थाचा हुकूम काय आहे, त्याची प्रेरणा काय आहे हें पाहावें. गीतेमध्येंसुद्धां (अ. १८ श्लो. ६२) शेवटीं तूं त्या हृदयस्थाला–ईश्वराला–सर्व भावानें शरण जा म्हणजे त्याच्याच प्रसादानें तुला शांति व उत्कृष्ट गति प्राप्त होईल असें म्हटलें आहे. परमेश्वर अत्यंत जवळ आहे. भागवतामध्यें भगवंतांनीं उद्धवाला जो उपदेश केला आहे त्यांतहि हृदयस्थाला शरण जा असेंच म्हटलें आहे. श्री एकनाथ महाराजांच्या ठसठशीत महाराष्ट्र भाषेमध्यें त्याचा सारांश देतों.

म्हणसी शरण रिघावें कवणें ठायीं । तरी मी असे तुझ्या हृदयीं ।
त्या हृदयस्थासी लवलाही । शरण पाहि रिघावें ।।
सर्वभावें सर्वस्वेंसीं । मज हृदयस्था शरण येसी ।।
तैं माझी सर्वगतता पावसी । सर्व भूतनिवासी हृदयस्थु ।। अ. १२–२४५
या लागीं सांडूनि अभिमान । मज हृदयस्था रिघालिया शरण
तुज मी उद्धरीन जाण । देवकीची आण उद्धवा ।।
सांडूनि रूप नाम अभिमान । स्फुरे जें कां उद्धवपण ।।
तें मज हृदयस्थाचें रूप जाण । त्यासि तुवां शरण रिघावें ।। अ. १२–२६४

प्रत्येकानें जवळ असणाऱ्या हृदयस्थ देवाला शरण जावें, त्याचें चिंतन करावें त्याचा विवेक करावा आणि स्वतःचें नाम, रूप व अभिमान यांविरहित जो मीपणा अंतःकरणांत स्फुरत असतो, तें त्याचें स्वरूप म्हणजे आत्मस्वरूप असें समजून प्राप्त कर्म करावें असाच मुख्य उपदेश आहे. भगवद्भक्त, सत्पुरुष हे दीर्घाभ्यासानें ही वृत्ति कमावितात व हृदयस्थाला शरण

जाऊन तद्रूप होतात. साधकानें या वृत्तीचा अभ्यास अवश्य करावा म्हणजे त्याचीसुद्धां प्रत्येक प्रेरणा ईश्वरी आहे हा अनुभव येईल.

कोणी असें म्हणतील कीं चोर, लुच्चे, दरवडेखोरसुद्धां पाहिजे तीं कुकर्मे करितील व प्रेरणा हृदयस्थाची म्हणून उत्तर देतील. परंतु तें म्हणणें खोटें आहे. कारण मनुष्य अत्यंत सात्त्विक भावांत आल्याविना त्याला प्रेरणा ईश्वराची आहे असें वाटतच नाहीं. अत्यंत सात्त्विक वृत्तीचा अखंड अभ्यास असला व ती अंगीं मुरली तरच प्रत्येक प्रेरणा ईश्वरी आहे हा अनुभव येतो. अर्थात् सात्त्विक वृत्तिवानांकडून कधींहि रजतमोगुणी कुकर्मे होतच नाहीत. चोर, दरवडेखोर इत्यादि शुद्ध तमोगुणी व देहात्मवादी लोक जर ईश्वरी प्रेरणा म्हणूं लागले तर शुद्ध सत्त्ववृत्तीचा अभ्यास व साधनें यांचें प्रयोजनच उरणार नाहीं. नुसत्या तोंडानें बडबडण्याचा हा विषय नाहीं. तो दीर्घ अभ्यास व वैराग्य यांनींच साध्य होणारा आहे, हें वाचकांनीं लक्षांत ठेवावें.

प्रत्येक प्रेरणा ईश्वराची असून ती मजकडून प्रत्येक कार्य घडविते असें म्हणणें व सदैव तदाकार असणें हें बहुत सुकृत व अभ्यास यांचें फल आहे. चोर म्हणेल कीं ईश्वरी प्रेरणेमुळें मीं चोरी केली तर फौजदारहि म्हणेल कीं ठीक आहे, मीहि ईश्वरी प्रेरणेमुळेंच तुला चोप देतों व न्यायाधीशहि स्वच्छ सांगेल कीं ईश्वरी प्रेरणेमुळेंच मी तुला शिक्षा ठोठावतों.

एका गांवीं एक वेदांती जोडपें होतें. दोघेहि वेदांताचें श्रवण, मनन, करीत व प्रत्येक व्यवहारांत वेदांतच बोलत. एकदां त्या जोडप्याच्या घरीं श्राद्ध होतें. दुपारचे १२ वाजले तरी ब्राह्मण आले नाहींत. यजमान पुजेंत होते व स्वयंपाक सिद्ध करून त्यांची बायको वाट पाहात होती. तिला फार क्षुधा लागली होती. अपराण्हानंतर आज अन्न मिळणार म्हणून तिनें हळूच खीर भुरकण्यास प्रारंभ केला. यजमान नीरांजन पेटविण्याकरितां चुलीजवळ आले व पाहतात तों खीर भुरकणें चालूं आहे 'ब्राह्मण जेवण्यापूर्वीं हें काय चालविलेंस' असें म्हणतांच तिनें "अहं वैश्वानरो भूत्वा" अग्निरूपानें ईश्वरच खीर खात आहे असें उत्तर दिलें. त्याबरोबर यजमानांनीं जळकें लाकूड घेऊन तिला बडव बडव बडविलें.

"हें काय हें काय" असें तिनें म्हणतांच त्यानें "नैनं छिदन्ति शस्त्राणि" अग हा आत्मा तोडला जात नाहीं, जाळला जात नाहीं तेव्हां ओरडतेस

तरी कशाला असें म्हणून तिला निरुत्तर केलें. तात्पर्य, हा विषय दुसऱ्यास फसविण्याकरितां नाहीं, दंभाकरितां नाहीं, कुकर्मांच्या समर्थनाकरितां नाहीं. तर लीनता, नम्रपणा, स्वोन्नति, निरहंकार, इत्यादि गुणांच्या म्हणजे मानव्याच्या उन्नतीकरितां आहे हें मनीं वागविलें म्हणजे या निमित्त प्रदीपांतील रहस्य सहज कळेल, इतकें सांगून हा प्रदीप पुरा करितों.

---

## प्रकरण दहावें

# ज्ञानाचें सामर्थ्य

ईश्वराच्या कृपेनें गीतेच्या प्रकाशामध्यें हा वेळपर्यंत बराच मार्ग आक्रमिला आहे. अमरप्रदीप, कर्मप्रदीप व निमित्तप्रदीप या तीन मुख्य विभागांमध्यें मनुष्य अमर कसा आहे, त्यानें कर्म कां व कसें केलें पाहिजे आणि एकंदर या जगद्शक्तीमध्यें तो निमित्तमात्र कसा आहे, याचेंहि विवेचन येथपर्यंत मांडलें आहे. गीताप्रदीपांतील शेवटचा गोड घास आतां ज्ञान-प्राप्तीच्या स्वरूपानें घ्यावयाचा आहे.

मनुष्यप्राणी हा बुद्धिमान आहे, त्याच्या बुद्धीस ज्ञानाचें खाद्य लागतें. शरीरास जसें अन्न तसें बुद्धीला ज्ञान हें अवश्य पाहिजे. त्यावांचून मानवी जीवित व्यर्थ होय. पशुपक्ष्यांपेक्षां मनुष्याचें मोठेपण केवळ ज्ञानांतच आहे. ईश्वराच्या या सृष्टीमध्यें अनेक ज्ञानशक्ति वावरत आहेत. मनुष्यप्राणी हा जगाच्या प्रारंभापासून अंतापर्यंत आपली बुद्धिशक्ति खर्च करून जगां-तील ज्ञान मिळवीत आहे.

पृथ्वी म्हणजे काय? तिचे धर्म कोणते? अग्नीचें दाहकत्व, तेजाचें प्रकाशकत्व, गुरुत्वाकर्षण, स्थितिगतिशास्त्र, विद्युत्सामर्थ्य इत्यादि अनेक शक्तींचें आकलन मनुष्यानें आजवर केलें असून त्याचा प्रभावहि या जगावर दिसत आहे. ज्ञान हें पवित्र आहे, ज्ञान हा सद्गुण आहे, फार काय, तर ज्ञान हें मोठें सामर्थ्य आहे असे वाक्प्रचार या जगांत रूढ आहेत. सारांश, एका तात्त्विक दृष्टीनें जगाकडे पाहिल्यास जग म्हणजे मानवी ज्ञानाच्या उलाढालींचें एक मोठें क्षेत्रच होय असें म्हणावें लागतें.

ज्ञानाच्या उलट जर कांहीं असेल तर तें अज्ञान, म्हणजेच पारतंत्र्य.

अज्ञान म्हणजेच अवनति वा अधोगति व अज्ञान म्हणजेच मृत्यु होय ! ! ज्ञानवान् मनुष्य उन्नतीला पोंचतो, स्वतंत्र होतो, व मृत्युमखांतून सुटून जातो. ज्ञानवान् समाज पराभूत होत नाहीं, मरत नाहीं व गुलामहि बनत नाहीं. जी स्थिति समाजाची तीच राष्ट्राची. ज्ञानवान्, ज्ञानसंपन्न आणि सदैव ज्ञानामार्गें लागलेलीं राष्ट्रें उत्कर्ष मिळवितात व अपकर्षांतून मोकळीं होतात. तात्पर्य, कोणत्याहि दृष्टीनें विचार केला तरी ज्ञानादेव तु कैवल्यं, ज्ञानानेंच मोक्ष, हा सिद्धान्त त्रिकालाबाधित आहे.

जगांतील ज्ञानाचा विचार केला तर ज्ञानाच्या उत्तरोत्तर तीन पायऱ्या दिसतात. सामान्य ज्ञान, विशेष ज्ञान, व तत्त्वज्ञान या त्या तीन पायऱ्या होत. फारशी बुद्धि खर्च न करितां नुसत्या कानांनीं व डोळ्यांनीं जें ज्ञान होतें, तें सामान्य ज्ञान होय. मुलें व अडाणी माणसें यांचें ज्ञान, हें सामान्य ज्ञान होय. सामान्य ज्ञानांतूनच विशेष ज्ञानाचा उदय होतो. भौतिक शास्त्रें, शास्त्रीय शोध, जगांतील विविध सुधारणा हीं सर्व विशेष ज्ञानाचींच द्योतकें होत. पाश्चात्य राष्ट्रें आज शास्त्रीय शोधांत फार पुढें गेलीं आहेत, असें आपण म्हणतों. मानवी जिज्ञासा अत्यंत दुर्दम्य आहे यांत शंकाच नाहीं. जगाचें, समाजाचें, सृष्टीचें निरीक्षण करीत करीत शेवटीं मानवी बुद्धि ही जिज्ञासेमुळेंच ईश्वराच्या ज्ञानाकडे मोर्चा फिरविते व तत्त्वज्ञानाच्या क्षेत्रांत उतरते. बुद्धीची पराकाष्टा व समाप्ति शेवटीं तत्त्वज्ञानांत होते म्हणून सर्वांमध्यें तत्त्वज्ञान किंवा ब्रह्मज्ञान श्रेष्ठ होय असें विद्वान् लोक म्हणतात.

जगामध्यें मनुष्याला इतर हजारों शास्त्रांचें, शोधांचें व शक्तींचें ज्ञान झालें तरी आपण पूर्ण आहोंत, आपल्यामध्यें न्यूनता कांहीं नाहीं असें कधींच वाटत नाहीं. ब्रह्मज्ञानाशिवाय पूर्णता नाहीं, समाधान नाहीं व कृतकृत्यता नाहीं, म्हणूनच तें ज्ञान मिळविणें हें मानवी जीविताचें परम साध्य होय. असें तत्त्व जगांतील सर्व धर्म प्रतिपादितात; अर्थात् गीता सुद्धां हें कृतकृत्य होण्याचें ज्ञान सांगत आहे.

मनुष्यानें प्रथम आयुष्याला प्रारंभ केला कीं त्याला सुस्वरूप व चतुर बायको पाहिजे असें वाटतें. बायको मिळाली कीं पुत्र पाहिजे, पुत्रप्राप्ति होतांच गृह, द्रव्य, पशु इत्यादिकांची हाव वाढते. सुविद्य, सुशील पुत्र झाले, मुली सुस्थळीं जाऊन पडल्या, सर्वांना आरोग्यहि उत्तम लाभलें, दीर्घायुष्य

प्राप्त झालें तरी कृतकृत्यता वाटत नाहीं.कांहीं तरी अपूर्णता आहे,वैगुण्य आहे असें वाटतेंच व आपल्यापेक्षां मोठें असलेल्या लोकांशीं तो आपली तुलना करितो व स्वतःला दुःखी समजून हुरहुरत असतो. तारुण्य, विद्या, विवेक, उत्तम स्त्री, उत्कृष्ट आरोग्य, सत्ता व रत्नपूर्णा पृथ्वीचें राज्य जरी मिळालें व मानुष आनंदाची पराकाष्ठा झाली तरी त्यापुढें साम्राज्याची हाव वाढते, व अद्याप मोठ्यांत मोठें असें कांहीं आहे व तें मला पाहिजे ही इच्छा वाढतच जाते.

मनुष्याला एका राष्ट्राचें, खंडाचें, फार काय पण पृथ्वीचें राज्य मिळालें व जगांतील सर्व उपभोग्य वस्तु जरी मिळाल्या तरी त्यामुळें त्याचें समाधान पूर्णतया होत नाहींच. अग्नीमध्यें वरचेवर तूप ओतलें असतां तो जसा अधिकाधिक भडकतो तसाच मनुष्याचा तृष्णा–अग्नि अधिकच भडकतो, यास्तव, सर्वश्रेष्ठ असें जें ब्रह्म तत्त्वज्ञान तें ज्ञानच मनुष्याची अपूर्णता घालवितें व मनुष्याला नराचें नारायण बनवितें. तात्पर्य, ज्ञानाचें सामर्थ्य हें अवर्णनीय आहे.

आपल्या वैदिक परंपरेंतील कोणताहि तत्त्वज्ञानाचा ग्रंथ पाहिला तर त्यांत कर्म, उपासना व ज्ञान असा विभाग दृष्टीस पडतो. मनुष्यास उद्देशून जे कर्माकर्माचे विधिनिषेध सांगितलेले आहेत तें कर्मकांड होय. ईश्वर-स्मरणपूर्वक जगांतील व्यवहार कसे पार पाडावेत हें सांगणारें उपासनाकांड होय. आणि ईश्वर, मनुष्य व जगत् यांचा संबंध काय आहे, याचा तात्त्विक व शास्त्रीय विचार ज्यांत केलेला आहे तें ज्ञानकांड होय. गीतेच्या १८ अध्यायांत कर्म, उपासना व ज्ञान यांचा उत्कृष्ट विचार केला असून त्यांचा परस्पर संबंधहि चांगला दाखविला आहे. मनुष्याची बुद्धि शेवटीं जेथें विराम पावते, मानवी बुद्धीला अत्यंत समाधान ज्यांत मिळतें, तें ज्ञान म्हणजेच जीव, ईश्वर व जगत् यांच्या परस्पर संबंधाचें ज्ञान होय. हें ज्ञान ज्याला होतें त्याला स्थितप्रज्ञ, भगवद्भक्त, गुणातीत असें म्हणतात असें गीतेमध्यें प्रतिपादन केलेलें आहे.

गीतेच्या दुसऱ्या अध्यायामध्यें स्थितप्रज्ञ कुणाला म्हणावें, तो बोलतो कसा, चालतो कसा, वागतो कसा, असा अर्जुनाचा प्रश्न आहे. त्याचें उत्तर

भगवंतांनीं दुसऱ्या अध्यायाच्या शेवटच्या १२ ते २० श्लोकांत दिलेलें आहे. त्या स्थितप्रज्ञाच्या लक्षणांमध्यें इंद्रियनिग्रहावर विशेष भर दिलेला आहे. बाराव्या अध्यायांत जीं भगवद्भक्ताचीं लक्षणें ८।१० श्लोकांत सांगितलीं आहेत, तेथें ईश्वराच्या भक्तीवर विशेष जोर दिला असून चौदाव्या अध्याया-मध्यें त्रिगुणापलीकडील गुणातीत ज्ञानी कसा असतो, हें सांगितलेलें आहे. या सर्व विवेचनावरून सर्वांत श्रेष्ठ ज्ञान जें आत्मज्ञान तें ज्याला होतें, तो कृतकृत्य होय; असाच गीतेचा सिद्धांत आहे.

इति गुह्यतमं शास्त्रमिदमुक्तं मयानघ ।
एतद्बुद्ध्वाबुद्धिमान् स्यात्कृतकृत्यश्च भारत ॥ गी. अ. १५ श्लो. २०

हे निष्पापा हें गुह्यांतलें गुह्य शास्त्र मी तुला सांगितलें आहे. हें समजून घेऊन मनुष्य ज्ञानी व कृतकृत्य होतो.

आपण सर्व मनुष्यें आहोंत. या मनुष्य शरीरांत जो जीव म्हणून आहे त्याचें स्वरूप काय आहे, हें आतां आपण पाहूं. गीतेच्या तेराव्या अध्याया-मध्यें क्षेत्राचें म्हणजे शरीराचें वर्णन आहे. या मनुष्यशरीरांत पंच महाभूतें, पंच ज्ञानेंद्रियें, पंच कर्मेंद्रियें, पंच विषय, बुद्धि, अहंकार, अव्यक्त, इच्छा, द्वेष, सुख, दु:ख, संघात, चेतना, धृति इत्यादि घटकद्रव्यें आहेत, असें म्हटलें आहे. पशु व मनुष्य यांमध्यें मुख्य अंतर बुद्धीचें म्हणजे ज्ञानाचें आहे. पशु-शरीराच्या घटकद्रव्यापेक्षां मानवी शरीराचीं घटकद्रव्यें तेजस्वी, शुद्ध व निर्मळ अशीं असतात. प्रत्येक जीव हा ईश्वरांश आहे. फार काय पण तो ईश्वरहि होऊं शकेल; परंतु त्या जीवात्म्यानें बुद्धीन्द्रियादि स्थूलसूक्ष्म शारीर-उपाधि अत्यंत शुद्ध, सात्त्विक व निर्मल केली पाहिजे.

दोन सारख्या वयाचे व एकाच संस्कृतीमध्यें वाढलेले विद्यार्थी घेतले तर एकाची बुद्धि अधिक खोल, कुशाग्र व दुसऱ्याची त्यापेक्षां कमी कां दिसते? पूर्वसंस्कार, पूर्वप्रज्ञा हें उत्तर जरी आपण सोडून दिलें तरी एकाच्या बुद्धींत चांचल्य, अस्थिरता व ग्रहणशक्तीचा अभाव हे दोष आहेत, असें आपण म्हणतच असतों. बुद्धीची ग्रहण व धारणशक्ति ही जितकी निर्दोष बुद्धि तितकी अधिक असते. हाच न्याय जीवात्म्याकडे लावावयाचा आहे. कोण-ताहि जीवात्मा घेतला तर त्याला स्थूल शरीर व मन, बुद्धि, अंत:करणादि सूक्ष्म शरीर यांची (उपाधि) जोड असतेच. स्थूलशरीराच्या शुद्धतेपेक्षां

सूक्ष्मशरीराची शुद्धता, पावित्र्य व निर्मलता यांचें महत्त्व अधिक आहे. मनुष्यदेहधारी जीवानें सूक्ष्म शरीराची शुद्धता ही कर्तव्य व ज्ञान यांच्या योगानें करावयाची असते.

ईश्वर व मनुष्य यांमध्यें कोणता मुख्य फरक आहे तो पाहा. ईश्वराची उपाधि उत्कृष्ट, विशुद्ध व शुद्ध सत्वप्रधान अशी आहे. आणि जीवाची उपाधि (म्हणजे सूक्ष्म शरीर) निकृष्ट, अशुद्ध व मलिन सत्त्वप्रधान अशी आहे. उपाधीच्या शुद्धतेमुळें सर्वज्ञत्व, सर्वेश्वरत्व व सर्वनियामकत्व हे गुण ईश्वराच्या ठिकाणीं आढळतात. परंतु उपाधीच्या अशुद्धतेमुळें जीवात्म्याला अल्पज्ञ, अल्पशक्ति, अल्पनियंता इत्यादि विशेषणें लाविलीं जातात. निराळ्या भाषेंत बोलावयाचें तर असें म्हणतां येईल कीं जीवाची उपाधि मडक्याप्रमाणें आहे व ईश्वराची उपाधि काचेच्या हंडीप्रमाणें आहे. मडक्यामध्यें मेणबत्ती पेटविली तर तिचा प्रकाश आंतून बाहेर येत नाहीं व बाहेरून आंतील कांहीं प्रकाश दिसत नाहीं. परंतु हंडीमध्यें मेणबत्ती पेटविली तर तिचा प्रकाश बाहेर पडतो व आंतहि पडतो. अंतर्बाह्य प्रकाशकत्व हंडींतील मेणबत्तीला असतें. जीवात्मा आपल्या सूक्ष्म शारीरिक उपाधीला सत्त्वगुणाच्या प्राधान्यानें हंडींतील मेणबत्तीप्रमाणें अंतर्बाह्य प्रकाशक करूं शकतो. अर्थात् या कार्यांत जेवढी त्याची प्रगति होईल, तेवढा तो ईश्वराच्या जवळजवळ जातो.

व्यवहारादि उपाधीमुळेंच लघुत्व व महत्त्व येतें असें आपण पाहातों. दोघे सद्गृहस्थ वय, विद्या, आरोग्य व द्रव्य या सर्व दृष्टींनीं तुल्यबल आहेत, असें आपण समजूं. परंतु एकाची स्त्री चतुर, दक्ष व निरोगी आहे आणि दुसऱ्याची अडाणी, अजागळ व अजारी आहे. एकाचीं मुलें व्यवस्थित, हुषार व चलाख आहेत. परंतु दुसऱ्याचीं मुलें अव्यवस्थित, मदड व मंद आहेत. स्त्री व मुलें यांच्या या भेदामुळें वरील दोन्ही गृहस्थांमध्यें कितीतरी अंतर असेल बरें! सांसारिक सुख, महत्त्वाकांक्षा, कार्यप्रवणता या सर्व दृष्टींनीं दुसरा गृहस्थ पहिल्यापेक्षां हिणकस दिसेल कीं नाहीं? आणखी एक उदाहरण देतों. मुलाबाळांचे टिळक व मुलाबाळांचे गांधी, तसेंच अनुयायीयुक्त टिळक व नुअयायीयुक्त गांधी यांमध्यें उपाधिद्वारां अंतर नाहीं असें म्हणतां येईल काय? टिळक व गांधी दोघे विभूतितुल्य खरे परंतु भोंवतालची उपाधि त्यांनाहि लघुता व महत्त्व देते, यांत संशय नाहीं.

जीवात्म्याची उपाधि अशुद्ध, मलीन अतएव मडक्यासारखी आहे असें जें वर म्हटलें त्यालाच अज्ञान असें दुसरें नांव आहे. जीवात्मा हा "ममैवांशो जीवलोके" या गीतासिद्धान्ताप्रमाणें जरी ईश्वरांश असला तरी त्याला अज्ञानामुळें मी कोण आहे हें कळत नाहीं. ईश्वराचा तो अंश असतांना साडेतीन हाताचा हा स्थूल देहच मी आहें अशी तो कल्पना करितो, व त्यामुळें त्याला अनेक दुःखें भोगावीं लागतात. एकाद्या राजाला स्वप्न पडावें, स्वप्नांत त्यानें भिकारी होऊन घरोघर भिक्षा मागावी व एका घरांत ओंजळ-भर जोंधळे मिळाल्यावर जसें त्यानें संतुष्ट व्हावें तशी स्थिति जीवाची होते. स्वप्नांतील भिक्षेचें स्मरण व भिक्षेच्या जोंधळयामुळें कृतार्थता या गोष्टी जागेपणीं राजाला आठवल्या तर त्याला किती आश्चर्य वाटत असेल बरें! अज्ञानामुळें जीवहि नसत्या गोष्टींत समाधान मानतो व ज्ञान झाल्यावर त्याला स्वतःच्या मूर्खपणाचें हंसूं येतें.

समजा कीं गंगानदीचें पात्र गच्च भरलेलें आहे. तुफान पाणी धो धो करीत वाहात आहे. अशा गंभीर जलाशयांत तुम्ही पंचपात्री, तांब्या, अगर घागर बुडविली तर काय होईल? जेवढ्या आकाराचें भांडें बुडवाल तेवढें पाणी तुम्हांस मिळेल. मोठा हौद नदींत बुडविला तर तोहि भरून येईल. पंचपात्री, तांब्या अगर घागर ही पुनः पात्रांत ओतली कीं पाणी पुनश्च गंगा-रूपच होईल. पाणी हें कधींहि मी पंचपात्रींतलें, तांब्यांतलें किंवा घागरीं-तलें असा अहंकार धारण करीत नाहीं. म्हणून तें गंगेशीं तद्रूप होतें. परंतु जीव हा परब्रह्माचा अंश असतां अज्ञानामुळें शरीर, स्त्री, द्रव्य इत्यादि अल्प उपा-धींचा अहंकार धारण करितो व स्वतःचें महत्त्व घालवितो. हें अज्ञान जीवाकडे कां आलें ? कधीं आलें ? कसें आलें? इत्यादि प्रश्न महत्त्वाचे असले तरी त्याचें विवेचन येथें विस्तारभयास्तव करीत नाहीं.

मुख्य विधेय एवढेंच कीं जीव हा परब्रह्म आहे, ईश्वर आहे परंतु तो अज्ञानामुळें अल्प उपाधीचा अभिमानी बनतो व त्यामुळें सुख दुःखादिकांना पात्र होतो.

सर्वसाधारणपणें प्रत्येक व्यवहारांतहि अल्पत्वाला दोष आहे. मह-दाला तो नाहीं असेंच आपण पाहतों. सोळा वर्षांचा मुलगा घोड्यावरून पडला कीं त्याची टर उडवितात. परंतु रावसाहेब अजागळपणें घोड्या-

वरून सपशेल खालीं पडले तरी ते घोड्यावरून खालीं आले असें म्हणतात. वाहात्या पाण्यांत पाहिजे तितक्या लोकांनीं स्नानें केलीं तरी अमंगलपणा वाटत नाहीं. परंतु भरून आणलेल्या तांब्यामध्यें कुणी बचकन् हात बुचकळला कीं तें पाणी प्यावेंसें वाटत नाहीं. भाताच्या तपेलींत कुत्र्यानें तोंड खुपसलें तर अल्पत्वामुळें तो भात टाकून देतात. परंतु सहस्रभोजनाकरितां भाताचे ढिगारे जेथें पडतात तेथें एकादा ग्रामसिंह येऊन जरी भातावर ताव मारूं लागला तरी सबंध भात अपवित्र न मानतां श्वानमुखाचा स्पर्श जेथें झाला असेल तेवढाच भात टाकून देतात व बाकीचा पवित्र मानतात! तात्पर्य इतकेंच कीं अल्प क्षेत्राला दोष आहे. महादाला तो नाहीं. म्हणूनच उपनिषदामध्यें "नाल्पेसुखमस्ति" अल्पत्वांत सुख नाहीं असें म्हटलें आहे.

जगांतील अनेक साधनें मनुष्याला मोठें करण्याकरितांच आहेत. ती शक्ति जागृत करून घ्या व मोठें व्हा असेंच सर्व शास्त्रें सांगत आहेत. तुकारामासारखे संतहि

संकोचोनि कासया झालासि लहान । करी आपोशन ब्रह्मांडाचें ।।

असें अध्यात्मदृष्ट्या सांगतात. हे विचारी जीवा, मनुष्या, तूं आपल्या अहंकाराचा संकोच करूं नकोस. येवढें शरीर मी, बायको, मुलें, घर, शेत येवढेंच माझें असा सदोष अहंकार धरूं नकोस. तर समाज मी आहें, राष्ट्र मी आहें, हें विश्वहि मी आहें, फार काय पण चराचर सर्व मी आहें असें समजून या ब्रह्मांडाची आपोष्णी घेण्याची महत्त्वाकांक्षा ठेव. हें साध्य करून घेण्याचें सामर्थ्य तुजमध्यें आहे. मन, बुद्धि यांची शक्ति ओळख, इंद्रियाचें नियमन कर, युक्ताहारविहारी हो, मनःप्रसाद संपादन कर. त्या प्रसादानें तुला चिरशांति मिळेल, असाच गीतेचा सर्वांना संदेश आहे.

जीवात्मा चिदंश आहे, चैतन्याचा अंश आहे. परंतु उपाधि, अज्ञान व प्रकृति यामुळें तो परतंत्र आहे. ईश्वर व जीव यांमध्यें मुख्य भेद हाच आहे. ईश्वर स्वतंत्र आहे, तर जीव अंशतः परतंत्र आहे. ईश्वरापुढें अज्ञान, माया, प्रकृति यांचें कांहीं चालत नाहीं. या सर्वांना ईश्वर आपल्या स्वाधीन ठेवतो व जीवाला त्याच्या आधीन राहावें लागतें. जीवात्मा हा स्थूल व सूक्ष्म शरीराच्या आधीन आहे आणि मन, बुद्धि इत्यादिकांच्या संस्काराधीन आहे. मन, बुद्धि व अंतःकरण यांवरील रजतमोगुणी संस्कार नष्ट करून केवळ शुद्ध

सात्त्विकतेचे संस्कार उत्पन्न करणें हें सामर्थ्य जीवात्म्याचे ठिकाणीं आहे, हें मात्र विसरतां कामा नये.

एकादा सुतार उत्तम कारागीर आहे, परंतु आपलें नक्षीकाम लांकडावर करूं लागला कीं तो लांकूड, वाकस, किकरें आणि इतर साधनें यांचे आधीनच असतो. म्हणजे हीं साधनें जशीं उत्कृष्ट अगर निकृष्ट असतील त्या मानानेंच याचें कामहि चांगलें अगर वाईट होत असतें. आपल्या हातीं असणारीं कौशल्योपकारक साधनें उत्कृष्ट ठेवावयाचें स्वातंत्र्य व सामर्थ्य सुताराला आहे, आणि तसा तो यत्नहि करीत असतो. जीवात्म्याचीहि याचप्रमाणें स्थिति आहे. त्यालाहि आपली बुद्धि शुद्ध, सात्त्विक व निर्मल करतां येते व ठेवितां येते.

समजा, एकादा उत्तम स्वयंपाकी आहे. अन्नपूर्णा अगदीं त्यावर प्रसन्न आहे. परंतु त्याचें वैशिष्ट्य तो ज्यामुळें दाखवील तो शिधा जर अगदीं गचाळांतला गचाळ असला तर उत्तम बल्लव बिचारा काय करणार? तो स्वतःच्या क्षेत्रांत पाहिजे तसे पदार्थ आणण्यास स्वतंत्र आहे पण मोलानें परक्या घरीं पाकसिद्धीस गेल्यावर तो परतंत्र आहे. तेथें असणारा यजमान जें सांगेल व जें आणून देईल त्यांतच त्याला आपली करामत दाखवावयाची असते. जीव हा पराच्या (मायेच्या ) अज्ञानाच्या तावडींत सांपडला आहे. त्याला अज्ञानाचें अथवा प्रकृतीचें दडपण एकदम झगारून देतां येत नाहीं. तथापि हळुहळू अनेक जन्मांच्या अभ्यासानें त्याला हें दडपणहि नष्ट करितां येतें; असेंच गीतेचें सांगणें आहे. जीवात्मा हा त्रिगणांनीं कसा बद्ध आहे, येवढें सांगून हें प्रकरण आतां आटोपतें घेतों.

बद्धो मुक्त इति व्याख्या गुणतो मे न वस्तुतः ।
गुणस्य मायामूलत्वात् न मे मोक्षो न बंधनम् ।। भागवत स्कं. ११.

जीवात्मा वस्तुतः मुक्तच आहे. परंतु तो सत्त्वरजादि गुणांच्या संयोगानें बद्ध आहे असें वाटतें. त्रिगुण हे प्रकृतिमूलक म्हणजे मायामलक आहेत. त्या मायेचा म्हणजे अज्ञानाचा निरास झाला कीं जीवाला मोक्षहि नाहीं व बंध तर नाहींच नाहीं, सत्त्व, रज व तम हे त्रिगुण अविनाशी पण देहधारी जीवाला देहाच्या आसक्तीनें बांधून टाकतात. सत्त्वगुण हा निर्मल व प्रकाशक आहे म्हणून तो सुख व ज्ञान (आत्मज्ञान नव्हे) यांनीं बांधन टाकतो. रजो-

गुण हा तृष्णा लोभ यांनीं जीवाला अधोगतीला नेतो, आणि तमोगुण तर असावधता, आळस व निद्रा यांनीं जीवाचें सर्वस्व नष्ट करितो.

जो मनुष्य विचारानें, ज्ञानानें या गुणांचा प्रभाव जाणतो व त्यांच्या स्वभावापासून अलिप्त राहण्याचा यत्न करितो तोच गुणातीत होतो. हेंच त्रिगुण जगांत प्रभाव दाखवितात व त्रिगुणाशिवाय दुसरा कर्ता नाहीं हें जो जाणतो तोच गुणातीत होय. ईश्वर हा निर्गुण आहे, अहंकार-विरहित आहे, तो साक्षी आहे, त्याच्या अध्यक्षत्वामुळें प्रकृतीचे या सृष्टींतील सर्व व्यापार व्यवस्थित तऱ्हेनें चाललेले आहेत. तो सर्वत्र आहे, कूटस्थ आहे, नित्य आहे, फार काय पण प्रत्येक प्राण्याच्या हृदयामध्यें तोच आहे. हृदयस्थ परमेश्वराला (म्हणजे जीवात्म्याच्या शुद्ध स्वरूपाला) सर्व भावानें शरण जाऊन जो जाणतो त्यावरच ईश्वराचा प्रसाद होतो त्याला त्या प्रसादामुळें शाश्वत शांति मिळते.

आत्मज्ञानाचा व ईश्वरज्ञानाचा महिमा हा असा आहे. हें ज्ञान प्राप्त करून घेणें हाच मानवी पुरुषार्थ होय. मनुष्य अत्यंत पापी असला, दुराचारी असला, पापकृत असला तरी त्याला या ज्ञानाचा अधिकार आहे, व हें ज्ञान होतांच तो मुक्त होऊन जातो.

अपि चेदसि पापेभ्यः सर्वेभ्यः पापकृत्तमः । अ. ४
सर्वं ज्ञानप्लवेनैव वृजिनं संतरिष्यसि ॥ गी. अ. ४ श्लो. ३६

---

## प्रकरण अकरावें

# ईश्वर कसा आहे ?

गेल्या प्रकरणामध्यें जीवात्म्याचें स्वरूप कसें आहे, हें संक्षेपानें सांगितलें जीवस्वरूप कळल्यावर शिवस्वरूप म्हणजे ईश्वरस्वरूप जाणण्याची इच्छा क्रमप्राप्त होते. जीव, ईश्वर व जगत् यांच्या परस्पर संबंधाचें ज्ञान हेंच सर्वश्रेष्ठ ज्ञान होय. यास्तव ईश्वरस्वरूप कसें आहे, हें आतां आपण पाहूं.

जगाच्या आरंभापासून ईश्वर कसा आहे हें जाणण्याचा प्रयत्न मनुष्य करीत आहे. अनेक ऋषी, तत्त्ववेत्ते, आचार्य व साधु यांनीं जरी ईश्वराचें स्वरूप स्वानुभवाप्रमाणें सांगितलें असलें तरी लोकांमध्यें ईश्वराविषयीं

परस्परविरुद्ध अशीं मतें आढळतात. लहानापासून थोरापर्यंत, बालापासून वृद्धापर्यंत फार काय पण अडाण्यापासून विद्वानापर्यंत सर्वांचे आक्षेप ईश्वराविषयीं आहेत व अगम्यत्वामुळें ते असणारच ! !

कुणी म्हणतो ईश्वर दयाळु आहे, तर दुसरा म्हणतो तो निर्दय आहे. एक म्हणतो ईश्वर सर्वसाक्षी आहे, तर दुसरा म्हणतो कीं त्याला डोळेच नाहींत. एक म्हणतो ईश्वर सर्वत्र समदृष्टि आहे तर कांहीं म्हणतात कीं तो पक्षपाती आहे. कुणी म्हणतो ईश्वर कांहीं करीत नाहीं तर दुसरा म्हणतो कीं त्यानेंच जग उत्पन्न करण्याचा हा विनाकारण खटाटोप केला आहे. तात्पर्य, परस्पर विरुद्ध अशीं मतें ईश्वराविषयींचीं आढळतात.

ईश्वर, पाऊस व हरदास यांना कुणी नांवें ठेवीत नाहींत असें नाहीं. कारण पाऊस पुष्कळ पडला तर नुकसान होतें म्हणून ओरड होते, कमी पडला तर तीच स्थिति ! व अगदीं बेताचा पडला असें तर कधींच होत नाहीं! हरदासानें पूर्वरंग लांबविला तर श्रोते म्हणतात तो रसिक नाहीं. आख्यान लांबविलें व पूर्वरंग आखडला तर म्हणतात तो व्युत्पन्न नाहीं. कुणी गायनाबद्दल तर कुणी नकलाबद्दल, कुणी पोषाखाकरितां तर शेवटीं त्याच्या स्वरूपाकरितां तरी नांवें ठेवतातच. तशीच स्थिति लोकांनीं आपल्या अज्ञानानें ईश्वराचीहि केली आहे. त्यालाहि लोक नांवें ठेवितात व त्याचेवर अनेक खोडसाळ आरोप करितात ! म्हणून भगवान् श्रीकृष्ण गीतेमध्यें ईश्वराविषयीं काय बोलतात, हें पाहूं !

न कर्तृत्वं न कर्माणि लोकस्य सृजति प्रभुः। गी. अ. ५
न कर्मफलसंयोगं स्वभावस्तु प्रवर्तते ॥ १४ ॥
नादत्ते कस्यचित् पापं नचैव सुकृतं विभुः।
अज्ञानेनावृतं ज्ञानं तेन मुह्यन्ति जंतवः ॥ १५ ॥

जगाचा प्रभु हा कर्तृत्व किंवा कर्मे हीं कांहीं निर्माण करीत नाहीं, कर्म व फल यांचा संयोगहि साधीत नाहीं तर हें सर्व स्वाभाविक होत असतें. ईश्वर कुणाचें पाप अगर पुण्य अंगावर ओढून घेत नाहीं. अज्ञानामुळें ज्ञान झांकलें जातें आणि त्यामुळें लोक मोहांत सांपडून फसतात.

मया ततमिदं सर्वं जगदव्यक्त मूर्तिना। गी. अ. ९–४
माझ्या अव्यक्त स्वरूपानें हें सर्व जग भरलेलें आहे.

मयाऽध्यक्षेण प्रकृतिः सूयते सचराचरम्। गी. अ. ९-१०

माझ्या अध्यक्षत्वामुळें प्रकृति स्थावर आणि जंगम सृष्टि निर्माण करीत असते.

नच मां तानि कर्माणि निबध्नन्ति धनंजय
उदासीनवदासीनमसक्तं तेषु कर्मसु ॥ गी. अ. ९-९

हे धनंजया प्रकृतीचीं कर्में मला बांधू शकत नाहींत. कारण मी त्यांच्याविषयीं उदासीनाप्रमाणें व आसक्तिविरहित असाच वागतों.

समोहं सर्व भूतेषु न मे द्वेष्योस्ति न प्रियः।
ये भजन्ति तु मां भक्त्या मयि ते तेषु चाप्यहम्॥ गी. अ. ९-२९

सर्व प्राण्यांविषयीं मी समभावानें राहातों मला कोणी प्रिय नाहीं व अप्रियहि नाहीं. जे मला भक्तिपूर्वक भजतात ते माझ्या ठायीं असतात आणि मी सुद्धां त्यांच्या ठायीं असतो.

गीतेच्या मतानें परमेश्वराचें स्वरूप वरीलप्रमाणें आहे. वेदान्तशास्त्रदृष्ट्या आणि आधुनिक तत्त्वज्ञानदृष्ट्यासुद्धां जगाच्या बुडाशीं एकमेव (अद्वितीय) तत्त्व असलें पाहिजे असेंच ठरलें आहे. हें जें जगत्व्यापी एक तत्त्व तेंच ब्रह्म व तेंच सत्तत्त्व होय. जगावर व जगामध्यें अंतर्बाह्य व्यापक असें एक तत्त्व आहे. त्याची सत्ता सर्वत्र आहे म्हणन त्याला (ईश-ऐश्वर्ये, सत्तायाम्) ईश्वर म्हणतात. या ईश्वराचें (ईश-ऐश्वर्यं) सामर्थ्य व ऐश्वर्य हीं अतर्क्य आहेत. तत्त्व एकच परंतु त्यालाच विविध उपासक आपापल्या समजुतीप्रमाणें विविध नांवें देतात.

चराचर जगताचें धारण करणारें जें तत्त्व आहे, त्यालाच शैव शिव म्हणतात, वैष्णव विष्णु म्हणतात, गाणपत्य गणपति म्हणतात, वेदांती ब्रह्म म्हणतात, बौद्ध त्याला बुद्ध म्हणतात, मुसलमान अल्ला म्हणतात आणि विविध सांप्रदायिक व धर्मप्रणेते त्या तत्त्वाला अशींच विविध नांवें देतात. नांवामध्यें, धर्मामध्यें पंथामध्यें व समजुतीमध्यें भेद असला तरी तत्त्व म्हणून जें आहे तें सर्वव्यापी, सर्वंकष व सर्वांतर्यामी असून एकच आहे. त्याचें अस्तित्व व अधिष्ठान हीच त्याची सत्ता आहे. त्याच्या सत्तेच्या (अध्यक्षत्वाच्या) आश्रयानें प्रकृति, माया (किंवा स्वभाव) हीच सर्व कांहीं घडवून आणिते.

सूर्योदय झाला कीं सूर्यविकासनी कमळ उमलतें, चंडोल पक्षी सुरस

गायन करितात आणि सर्व लोक आपापल्या उद्योगाला लागतात. परंतु यांपैकीं एकाहि कार्याचें कर्तृत्व सूर्याकडे येत नाहीं. दीपप्रकाशांत कुणी अभ्यास केला, कुणी पत्ते झोडले, वाईट कृत्यें केलीं किंवा खोटे दस्तऐवज लिहिले तरी त्याबद्दल दिव्याला कांहीं बरें वाईट वाटतें काय? मुळींच नाहीं. ईश्वराची स्थिति अगदीं अशीच आहे. त्याच्या स्वरूपानें जग भरलेलें आहे व त्याच्या सत्तेच्या नजरेंत प्रकृति सर्व कांहीं करीत आहे. ईश्वर हा कर्ता, *भर्ता, उत्पत्तिकर्ता, संहर्ता आहे असें म्हणतात परंतु तत्त्वतः तें बरोबर नाहीं.*

तो सृजी पाळी संहारी । ऐसें बोलती जें चराचरीं<br>
तें अज्ञान गा अवधारी । पांडुकुमरा ॥ ज्ञा. ५।१८२

मग हें सर्व करितो कोण? तर प्रकृति, माया, स्वभाव हींच सर्व करितात असें उत्तर आहे.

आतां हें ईश्वराचें साक्षित्व व अध्यक्षत्व कसें आहे हें पाहूं.

एकादें मोठें शहर वसविण्याचें काम चालू आहे. तर तेथें मजूर सारखे रावत असतात. मोकादम व मेस्त्री यांना मजुराच्या मानानें शारीरिक काम कमी असतें. त्यांना देखरेखच करावी लागते. ओव्हरसीयर हा तर अर्थातच वर नजर ठेवणारा असतो. त्याची नजर कामावरहि असते आणि ज्यांनीं हें काम आपणाकडे सोंपविलें तिकडेहि ती असते. मजूर, मुकादम, मेस्त्री, ओव्हरसीयर यांवर त्या भागाचे व त्या खात्याचे सर्वाधिकारी असतात. इंजीनियरनें राजा व त्याचे मंत्री यांचें म्हणणें ऐकून घेऊन एकदां नगररचनेचा नकाशा काढून दिला, व अंदाज बांधून दिला कीं त्याचें काम संपलें. देखरेख, नजर टाकणें हींच कामें उत्तरोत्तर वरवरच्या अधिकाऱ्याकडे असतात. परंतु राजाला यांतील कांहींहि करावें लागत नाहीं. नगर वसवा येवढा त्याचा हुकूमच सर्व कार्य घडवून आणतो. सत्तेचें म्हणजे अध्यक्षत्वाचें सामर्थ्यच असें आहे कीं कांहीं न करितां केवळ प्रेरणेनें सर्व कांहीं घडतें व राजानें शहर वसविलें, युद्ध जिंकलें, प्रांत काबीज केला असें म्हणण्यांत येतें.

राजापेक्षां अनंतपटीनें ईश्वराचें सामर्थ्य मोठें आहे. प्रेरणा अगर हुकूम तरी राजाला सोडावीं लागतील, परंतु ईश्वराला त्यांपैकीं कांहींच करावें लागत नाहीं. कांहीं न करितां केवळ अस्तित्वामुळें सर्व कर्तृत्व त्याचेकडे येतें.

अगा नगर हें रायें केलें । या म्हणण्या साचपण कीर आलें
परी निरुतीं पाहातां काय सिणले । राजाचे हात ।। त. अ. ९।१०९
जैसी रायें अधिष्ठिली प्रजा । व्यापारें आपुलालिया काजा
तैसा प्रकृतिसंग माझा । येर करणें हें तियेचें ।। ज्ञा. अ. ९-११०

एकादें नगर राजानें वसविलें, राजवाडा बांधला असें आपण म्हणतों व तें खरेंहि समजण्यांत येतें. परंतु तो राजवाडा बांधतांना त्याचे हात कामामुळें दुखत असतात काय ? किंवा अमकी प्रजा अमक्याच्या राज्यांतील आहे असें म्हणतात. परंतु त्या प्रजेच्या प्रत्येक व्यापाराला राजाची प्रेरणा कारणीभूत होते काय? मुळींच नाहीं. लोक स्वभावाप्रमाणें व्यापार करीत असतात; हुकमत राजाची असते एवढेंच. त्याप्रमाणें ईश्वराचें अधिष्ठान किंवा संग एवढाच फक्त असतो. इतर सर्व कारभार प्रकृतीचा आहे. हें ईश्वराचें वास्तव स्वरूप ध्यानीं घेऊन त्याजवर येणाऱ्या अनेक आक्षेपांचा विचार आपण करावयास शिकलें पाहिजे.

ईश्वराच्या स्वरूपाचा यथार्थ विचार केला तर " करावें तसें भरावें" "हांसत कर्म करावें भोगावें रडत तेंचि परिणामी" " आत्मैव ह्यात्मनो बंधु:" " उद्धरेदात्मनात्मानं" हाच सिद्धांत निघतो. सामान्य मनुष्य नेहमीं असा आक्षेप घेतो कीं 'काय हो, ईश्वर जर कर्ता करविता, विधाता, नियंता, शास्ता, असा आहे तर मग पाप व पुण्याबद्दल तुम्ही मनुष्याला दोष कां देतां? आणि जर मनुष्यच त्याच्या पापपुण्याचा व बऱ्या वाईटाचा कर्ता करविता असेल तर मग तुमचा रिकामटेकडा ईश्वर हा जेथें तेथें आणतां तरी कशाला ? "

ईश्वराचें स्वरूप ज्याला कळलें नाहीं, त्याचाच हा आक्षेप आहे. ईश्वर करतो किंवा करवितो म्हणजे काय याची त्याला कल्पना नाहीं. आपण पाण्याचा दृष्टांत घेऊं. एकच पाणी तें उसाच्या मळांत गेलें कीं गोड होतें, मिरचीच्या बुडांत गेलें कीं तिखट होतें, व कारल्याच्या वेलीच्या मुळांत गेलें कीं कडू होतें ना ? पाणी जात्या गोड नाहीं, तिखट नाहीं व कडूहि नाहीं "पाणी तेरा रंग कैसा, जिसमे मिले वैसा" ही म्हण प्रसिद्धच आहे. प्रत्येक बीजांतील शक्तीला वाढण्यास साह्य करणें हा पाण्याचा धर्म आहे. बीजामध्यें जी शक्ति असेल व जशी असेल तसाच अंकुर जलसाह्यानें येतो. मेघराजा हा अत्यंत औदार्यानें सर्वत्र वर्षाव करितो.

माळरान असो, उकिरडा असो, वाळवंट असो, मळा असो, बागाईत जमीन असो वा जिराईत असो. सर्वत्र समदृष्टीनें वर्षाव करणें हें मेघराजाचें कार्य आहे व तें तो समत्वानें करितो. परंतु प्रत्येक ठिकाणची जशी भूमिका तयार असेल, तसें तेथें फळ येतें. त्याला मेघराज तरी काय करणार ?

ईश्वर हा पर्जन्याप्रमाणें अगर जलाप्रमाणें किंवा दीप अथवा सूर्य-प्रकाशाप्रमाणें जें जेथें असेल त्याचा प्रकाशक आहे. पाणी हें उसाला कडू करीत नाहीं किंवा मिरचीला गोड करीत नाहीं. तसाच ईश्वरहि दुष्टाला सुष्ट अगर सुष्टाला दुष्ट करीत नाहीं किंवा पशुपाळाप्रमाणें हातांत काठी घेऊन कुणाचें नियमन अगर रक्षणहि करीत नाहीं तर तो केवळ सर्व-प्रकाशक आहे.

समाजांतील लोकांची जर अशी समजूत असती कीं ईश्वरच कर्ता, करविता, नियंता, शास्ता, त्राता आहे व मनुष्य हा नुसता लाकडाच्या ओंडक्या-प्रमाणें आहे, त्याला स्वातंत्र्य नाहीं व कर्तृत्व नाहीं, तसें असतें तर मनुष्यप्राणी निजलेला उठला नसता किंवा त्यानें ओठावर पडलेलें जांबूळहि गिळलें नसतें. परंतु जगांतील कर्मप्रवृत्ति दुर्दम्य आहे आणि प्रत्येक मनुष्य आपल्या कर्तृत्वाच्या गोष्टी बोलत आहे त्यावरून मानवी कर्तृत्वाला मुळींच अवसर नाहीं असें नाहीं हें आपोआप सिद्ध होतें.

मानवी पराक्रम व मानवी कर्तृत्व संपतें कुठें व ईश्वराच्या कर्तृ-त्वाला प्रारंभ होतो कुठें हें नेमकें सांगणें कठीण आहे. तशी रेषा मारतां येत नाहीं म्हणून एक पक्ष म्हणतो कीं सर्व कांहीं मनुष्यच करितो व दुसरा म्हणतो कीं, सर्व ईश्वरच करवितो. मनुष्य करतो कां ईश्वर करतो किंवा करवितो असें या विषयाचें स्वरूप आहे. कांहीं एक मर्यादे-पर्यंत मनुष्यच करितो हें खरें पण त्याची बुद्धि कुंठित झाली व कर्तृत्व थांबलें कीं तेथें ईश्वराचें कर्तृत्व येतें हीहि गोष्ट तितकीच खरी आहे "प्रयत्नांतीं परमेश्वर" या म्हणीमध्यें खोल अर्थ आहे तो असा कीं मानवी यत्नाची पराकाष्ठा झाली कीं पुढें परमेश्वराच्या कृपेंत व कर्तृत्वांत ती गोष्ट जाते. उदाहरणार्थ निमोनिया झाला. धन्वंतरींनीं आपले उपचार केले, डॉक्टर आणले, सर्व उपाय केले व शश्रूषा उत्तम केली. या सर्व प्रयत्नांना आयुष्य असेल तरच यश येतें व तें आहे कीं नाहीं हें मनुष्याला अगम्य आहे, म्हणून

तेथें ईश्वराचें कार्यक्षेत्र लागतें. मानवी प्रयत्न संपल्यावरच मग मनुष्य ईश्वराचा धांवा करितो व त्याला आळवितो.

मनुष्याच्या बुद्धीची धांव जेथें संपते व बुद्धीची धांव चालली तरी कर्तृत्व जेथें खुंटतें तेथेंच ईश्वराचें स्मरण होतें व त्याचें कार्यक्षेत्र लागतें. हा सिद्धांत वाचकांनीं लक्षांत ठेवावा. मानवी बुद्धीच्या व कर्तृत्वाच्या दौर्बल्यांतच ईश्वरी सत्तेचा उगम आहे. मानवी बुद्धि कुठें कुंठित होईल याचा नेम नाहीं. अडाण्याची बुद्धि तेव्हांच कुंठित होते व तो म्हणतो ' मला कळत नाहीं. ही देवाची लीला आहे.' पण त्यापेक्षां साक्षर, साक्षरापेक्षां शिक्षित, शिक्षितापेक्षां सुसंस्कृत व सुबुद्ध माणसाची बुद्धि अधिकाधिक चालते म्हणून त्याला लवकर ईश्वर आठवत नाहीं; हें योग्यच आहे. अडाणी मनुष्याची बुद्धि अल्प मर्यादेपर्यंत चालली तर मोठ्या प्रतिभासंपन्नाची बुद्धि पुष्कळ दूरपर्यंत जाईल. परंतु ती बुद्धि मानवीच असल्यामुळें तिला कुठें तरी थांबलेंच पाहिजे. बुद्धि जरी लांबवर चालली तरी कर्तृत्व तेथें पोंचेलच असें नाहीं. हिंदुस्थानाला स्वराज्य पाहिजे व तें अमुक अमुक मार्गांनीं मिळवावें असें अनेक बुद्धिमंतांनीं आजवर सांगितलें नाहीं काय ? पण जरी सांगितलें असलें तरी राष्ट्राचें कर्तृत्व स्वराज्य घेण्याच्या योग्यतेचें झालें नाही. तें कर्तृत्व वाढविणें ही अनेकांच्या आवांक्याबाहेरची गोष्ट आहे. अर्थात् ईश्वरी प्रेरणा, संकल्प व मानवी कर्तृत्व यांचा संयोग जेव्हां होईल, तेव्हांच स्वराज्य मिळेल असे उद्गार विचारांतीं बाहेर पडतात.

या व अशाच अनेक उदाहरणांवरून अनुभवानें मानवी लघुता व मानवी पराक्रम यांचे नियम आपण ठरवावे व ईश्वरावर श्रद्धा ठेवून जोमानें उद्योग करावा. दुबळ्या आस्तिकापेक्षां कर्ता नास्तिक पुरवला हें म्हणणें अगदीं खरें आहे. मूळ शास्त्र, मूळ तत्त्व हीं बाजूला राहून समाजांत भलत्या कल्पना शिरल्या आहेत. त्यांचें उच्चाटण अवश्य झालें पाहिजे. अधिष्ठान, कर्ता, साधनें, त्यांची हालचाल व त्यानंतर पांचवें दैव म्हणजे देवता हें एक कार्यसिद्धीचें कारण आहे असें गीतेच्या १८ व्या अध्यायांत सांगितलें असून ब्रह्मसूत्र भाष्यांत श्री शंकराचार्यहि असेंच म्हणतात. ' यत्न तो देव जाणावा, ' 'केल्यानें होत आहे रे,' 'न ऋते श्रांतस्य सख्याय देवा:' हेच सिद्धांत आपण लक्षांत ठेवावे व आस्तिक बुद्धीनें ईश्वर स्मरणपूर्वक सदैव उद्योग करावा.

इंग्रज लोक मोठे चिकित्सक व नास्तिक खरे. पण मोठी अगम्य आपत्ति आली कीं ते सुद्धां ईश्वरप्रार्थना करितात. महात्मा गांधीसारखा कर्मयोगी निदान आज दुनियेंत नाहीं. पण ते नित्य दोन वेळां ईश्वर भजन करितात. ईश्वर आहे असें मानणें, त्यावर श्रद्धा ठेवणें व त्याला भजणें यामुळें मनुष्याच्या कर्तृत्वाला मोठा जोरच येईल. नास्तिक नीतिनिष्ठापेक्षां आस्तिक ईश्वरनिष्ठाचा आनंद व आत्मविश्वास केव्हांहि अधिक असतो.

कांहीं आक्षेपकांना ईश्वर समदृष्टि, कृपासागर, दयाळु, सर्वसाक्षी असें म्हटलेलें अगदीं खपत नाहीं. ईश्वराविषयीं असें कुणी म्हटलें तर ते कपाळाला आठ्या चढवितात व जगांतील विषमता, निर्दयता व ईश्वराचा पक्षपातहि सोदाहरण दाखवूं लागतात. एकंदर जगाकडे जरा सूक्ष्म दृष्टीनें पाहिलें व मानवी अंतःकरणाच्या निरनिराळ्या मनोवृत्ति पाहिल्या तर ईश्वराच्या दयाळुपणामुळेंच हें जग चाललें आहे, असें म्हणावें लागेल.

आपल्या समाजाचा तर अधःपात सर्व दृष्टीनें झालाच आहे. पै पैशा-करितां खोटें बोलणारीं, एक चहाचा कप मिळतांच उलट सुलट साक्षी देण्यास तयार होणारीं, व्यवहारांत मजुरीचा, दुधातुपाचा किंवा धान्याचा जो दर असेल त्यापेक्षां पैसा दोन पैसे अधिक देतांच कुमार्गास प्रवृत्त होणारीं, जन्मा-मध्यें शपथ घेण्यापुरतें एकदांच खरें बोलणारीं, प्रत्येकास गंडा घालण्याचा विचार करणारीं, पैशाच्या कामांत तर आई, भाऊ, बहीण, मुलगी असा कांहींहि भेदाभेद न करितां सर्वांच्या द्रव्यावर समदृष्टीनें ताव मारणारीं माणसें या जगांत कांहीं कमी आहेत काय ? ज्यांचीं कृत्यें ऐकलीं तर अंगावर शहारे येतात, ज्यांची मनोवृत्ति पाहिली तर दूर जावेंसें वाटतें, जे घराकडे आले तर ज्यांना पादरक्षेजवळच उभें करावेंसें वाटतें, व शिक्षेचा प्रसंग आल्यास ज्यांना उपाशीं व भर दुपारीं फांशीं देणेंसुद्धां दयाच होय, असें मनांत येतें, अशा नरपशूंनासुद्धां ईश्वर, उत्तम हवा, रुचकर पाणी, स्वादिष्ट अन्न, आणि जगांतील उपभोग्य पदार्थ देतो ही त्याची या जगावर कृपाच नव्हे काय? ईश्वराच्या करुणेच्या गोष्टी या जगांत इतक्या दिसतात कीं त्यांची कल्पनाच करवत नाहीं. हजारों गणित्यांनीं जर जगांतील उलट सुलट गोष्टींची बेरीज केली तर क्रौर्यापेक्षां कृपाकृत्यांची बेरीजच अधिक होईल.

ईश्वरावर विषमता व निर्दयता हे आरोप येत नाहींत. कारण त्याचें

वर्तन सदैव सापेक्ष असतें. " वैषम्य नैर्घृण्ये न सापेक्षत्वात् " असें श्री बादरायण ब्रह्मसूत्रांमध्यें लिहितात. ईश्वराचे ठायीं वैषम्य व नैर्घृण्य (निर्दयता) हीं नाहींत; कारण त्याचें वर्तन सापेक्ष असतें. या सूत्रांत 'सापेक्षत्वात्' हा हेतु दिलेला आहे.

एका व्यावहारिक दृष्टान्तानें हें सूत्र सुबोध करितों. एक चांगले संपन्न व सुसंस्कृत गृहस्थ होते. त्यांची पत्नीही सुशील होती. त्यांना दोन आवळे जावळे मुलगे १०–१२ वर्षांचे होते. या मुलांना सुशिक्षण देणें व त्यांच्या ठिकाणीं उत्तम संस्कार उत्पन्न करणें हें काम तें जोडपें मोठ्या आस्थेनें करी. परंतु त्या दोघांतील प्रभाकर हा आईबाप व शिक्षक यांचा सदुपदेश ऐकून व्यायाम करी, फिरावयास जाई, खेळ खेळे, अभ्यास करी, उत्तम पुस्तकें वाची व चांगली संगत धरी. परंतु दिनकराची स्थिति अगदीं प्रभाकराविरुद्ध असे. व्यायाम नको, अभ्यास नको, लवकर उठावयास नको, कुसंगति, कुचाळ्या, कुमार्गप्रवृत्ति इकडे त्याचा ओढा असे. आईबापांनीं पक्षपात न करितां दोघां मुलांवर सारखी दृष्टि ठेविली होती. किंबहुना दिनकर हा अवखळ म्हणून प्रभाकरापेक्षां त्याचीच काळजी ते अधिक घेत. अशी स्थिति असतां एकदां पुढील चमत्कार घडला.

मुलांची वार्षिक परीक्षा, खेळांचे सामने, कवितांच्या भेंड्या, तालमीचा वाढदिवस या सर्व बाबतींत प्रभाकर उत्तम ठरला व प्रत्येक कार्याबद्दल मिळालेलीं बक्षिसें व खाऊचे पुडे घेऊन तो घरीं आला, व मातुःश्रींना नमस्कार करून त्यानें हें सर्व त्यांचेपुढें ठेविलें. आईबापांना आनंद वाटला व त्यांचीं मुलाशीं प्रश्नोत्तरेंहि झालीं. इतक्यांत त्या घरीं त्याच वेळीं दिनकरासह एक घोळका गलबला करीत शिरला. तें पाहून हें काय प्रकरण आहे असें वडील म्हणाले. घोळक्यांतील एक पोक्त गृहस्थ म्हणाला, हा तुमचा मुलगा मला माहीत नाहीं. हा आज सकाळीं माझ्या दुकानांत येऊन बसला व मी गिऱ्हाइकांना माल देण्यांत गुंतलों असें पाहून यानें ही पाहा माझ्या पेटींतून आंगठी चोरली. पोलिसच्या स्वाधीन करणार होतों परंतु म्हटलें एकदां आईबापांना कळवावें.

हें ऐकांतच दिनकराचे वडील लाल झाले व त्यांनीं हातांतील छडीनें त्याला मरेमरेतोंपर्यंत चोपलें. राग शांत झाल्यावर सद्‌गुणी मुलगा जो

प्रभाकर त्याच्या पाठीवरून हात फिरविला व सर्व मुलांसह तो सगळा खाऊ खाण्याची त्यांनीं आज्ञा केली; पण दिनकरास त्यांनीं त्या दिवशीं उपाशी ठेवलें ! ! विचारवंतांनो, आतां असा विचार करा कीं दिनकर व प्रभाकर हे दोघे जुळे मुलगे ! आईबापांची दोघांवर सारखी दृष्टि ! किंबहुना ती दिनकरावर अधिक ! असें असतां एक सद्‌गुणी व दुसरा दुर्गुणी निपजला नाहीं काय ? व बापानें केलेलें वर्तन सापेक्ष म्हणजे जशास तसें, हें वर्तन योग्य नव्हतें काय ?

येथें आईबापांवर विषमता आणि निर्दयता यांचा आरोप करण्यास तिळमात्र तरी जागा आहे काय ? ते समदृष्टि असतां प्रभाकराच्या सद्‌गुणाचें बक्षीस खाऊ व शाबासकी आणि दुर्गुणाचें प्रायश्चित्त छड्यांचा मार व उपास हें योग्य नव्हतें काय ? दिनकर दुर्गुणी नसता तर हें वैषम्य दिसलें असतें काय ? तात्पर्य, ईश्वराची दया ही अशी आहे. प्रत्येक प्राण्याला त्याचें कर्मफळ बरोबर देणें यांतच ईश्वरी दया व न्याय आहे. 'करावें तसें भरावें' हा न्याय प्रसिद्ध आहे. जगामध्यें निर्दयतेच्या, विषमतेच्या, क्रौर्याच्या गोष्टी कितीहि दिसल्या तरी त्या सापेक्ष आहेत.

भगवान् गीतेमध्यें सापेक्ष वर्तनाचें स्पष्टीकरण करितात तें असें--सापेक्षत्व म्हणजे जशास तसें वागणें असें म्हणतां येईल. पण जशास तसें वागणें म्हणजे सूड घेणें, तमोगुण प्रकट करणें असले अर्थ आज व्यवहारांत रूढ आहेत. ईश्वरी नियति ही अगदीं काटेकोर आहे. धारवाडी काट्या-प्रमाणें अगदीं बिनचुक फल देणें हें कार्य त्या शक्तीमुळें जगांत चाललें आहे.

ये यथा मां प्रपद्यंते तांस्तथैव भजाम्यहम् ।* गी. अ. ४ श्लो. ११

जे ज्याप्रमाणें मला शरण येतात (माझा आश्रय घेतात) त्याप्रमाणें त्यांना मी फळ देतों. म्हणजे असें कीं कोणीहि ईश्वरी नियमांचें उल्लंघन करूं शकत नाहीं. ईश्वराच्या घरीं सर्वांना सारखा न्याय मिळतो. प्रत्येकाला त्याच्या योग्यतेप्रमाणें बरोबर न्याय देणें यांतच ईश्वराची महान् दयासांठवलेली आहे. शुद्ध न्यायामध्येंच शुद्ध दया आहे. न्यायाविरुद्ध जी दयाती दया नव्हे.

पोथ्या, पुराणें वाचलेले व कीर्तनें ऐकलेले कांहीं लोक असा आक्षेप घेतात कीं " नास्तिक, चांडाळ, पापी स्त्रीपुरुषांचासुद्धां उद्धार अखेरीस

* या संबंधीं स्वतंत्र विवेचन पुढें पहा.

परमेश्वर करितो व सज्जनाचें मात्र तो विनाकारण सत्त्व पाहातो." हाहि आक्षेप अज्ञानजन्य आहे. प्रथम हें ध्यानांत ठेवलें पाहिजे कीं सज्जनछळाचीं म्हणून जीं आख्यानें व उपाख्यानें आपण ऐकतों तीं सर्वथा तशींच आहेत अगर होतीं असें नाहीं. सांगणाऱ्याला व लिहिणाऱ्याला आपल्या सांगण्यांत व लिहिण्यांत कांहीं तरी रस उत्पन्न करावासा वाटतो. नीरस गोष्ट अगर तत्त्व कुणीहि फारसें ऐकूं इच्छित नाहीं. अद्‌भुतता व अतिशयोक्ति हीं सर्वत्र असतात तशींच तीं कथा पुराणामध्येंहि आहेत.

पुराणांतील पुष्कळ कथा जुन्या परंपरेच्या दृष्टीनें सुद्धां प्रक्षिप्त आहेत. वेदांतील शुनःशेप व हरिश्चंद्र यांच्या कथा आणि हरिश्चंद्राची सुप्रसिद्ध कथा यांत महदंतर आहे. अजामिळाची लोकप्रसिद्ध कथा व भागवतांतील कथा यांचीहि स्थिति तीच आहे. शिवाय या फुगवून सांगितलेल्या कथांना अर्थवाद म्हणतात. रोचनार्थ म्हणजे लोकांमध्यें आवड उत्पन्न व्हावी म्हणून मोठ्या फलश्रुति सांगण्याची पद्धत सर्वत्र आहे. गणपतिस्तोत्र ५–७ श्लोकांचें आहे. त्यांत त्याचीं १२ नांवेंच आहेत. परंतु तेवढीं घेतलीं कीं विद्यार्थ्याला विद्या, धनार्थ्याला धन, पुत्रार्थ्याला पुत्र प्राप्त होतो असें म्हटलें आहे तें सर्व खरें नसून प्रवृत्ति व्हावी एतदर्थ अर्थवादात्मक ती स्तुति आहे.

पापी, चांडाळ, नास्तिक मनुष्याला ईश्वर भेटतो असें नाहीं. परंतु अत्यंत पापी, चांडाळ व नास्तिक यांच्या आयुष्यांतहि असा एकादा क्षण येतो कीं त्या वेळीं त्यांना अनुताप होतो, वृत्ति एकदम पालटते व त्यांच्या आयुष्य क्रमांत मोठा फरक पडतो. अट्टल दारुडा सुद्धां पूर्ण दारु सोडून सन्मार्गाला लागत नाहीं काय? तुळसीदास हा अत्यंत स्त्रैण व कामुक परंतु त्याला स्त्रीच्या उपदेशानें उपरति झाली. स्त्रीच्या प्रेमाच्या ठिकाणीं एकदम भगवंत प्रेम उत्पन्न झालें व अनन्यता आली. पंडित मोतीलाल नेहरू आणि देशबंधु दास हे केवढे अमीर उमराव! एकाचे कपडे म्हणे फ्रान्स देशांतून धुऊन येत असत ! पण अशा माणसांच्या मनावर महात्मा गांधींचा विलक्षण परिणाम झाला ना ? आणि त्यांनीं खादीचीं जाडीं भरडीं वस्त्रें आंगावर घालून देशाकरितां फकीरी पत्करली नाहीं काय ? जीं माणसें येवढीं देशभक्त बनलीं तीं देवभक्त बनणार नाहींत काय ? गीतेंत भगवंतांनीं मोठें आश्वासन दिलें आहे.

अपि चेत् सुदुराचारो भजते माम् अनन्यभाक् ॥
साधुरेव स मंतव्यः सम्यक् व्यवसितो हि सः । गी. अ. ९ श्लो. ३०

अत्यंत दुराचारी असला पण एकदां पश्चात्तापानें तो पोळला व ईश्वराच्या ठायीं त्याची निष्ठा अढळ झाली तर त्याचा उद्धार सत्वर होतो हें तत्त्व अगदीं खरें आहे. जें व्हावयाचें तें जर होतेंच तर ईशस्मरण व भजन कशाला करावें ? वरचेवर ईशस्तुति केलीच पाहिजे काय ? ईश्वर स्तुतीनें प्रसन्न होतो ही कल्पनाच चमत्कारिक नाहीं काय ? सर्वत्र जर ईश्वरच भरलेला आहे तर मूर्तिपूजा कां करावी ? या तऱ्हेचे आणखीहि आक्षेप ईश्वराविषयीं आहेत. त्यांचा संक्षेपानें विचार करून आतां आटोपतें घेतों.

या जगांत कर्मसृष्टीचे म्हणजे निसर्गाचे व्यापार अगदीं बरोबर चालले आहेत. ते सर्व मनुष्याच्या इच्छेवर मुळींच अवलंबून नाहींत. जें व्हावयाचें तें होतेंच, पण जें झालें तेंच बरोबर झालें असा निश्चय बुद्धीमध्यें पाहिजे. तो निश्चय नसेल तर मनुष्य उगाच हळहळत असतो. ईश्वरभजनामुळें मनःसमाधान, चित्तशुद्धि व सात्त्विक शांत वृत्ति यांची प्राप्ति होते. यामुळेंच अनेक आपत्तींस धैर्यानें तोंड देण्याचें सामर्थ्य येतें. साधुसंत, सत्पुरुष, सत्त्ववान् विभूति यांच्यावर अनेक अघटित संकटें आलीं तीं त्यांनीं शांतपणें व ईश्वरावर निष्ठा ठेवून सोसलीं अशीं उदाहरणें किती तरी आहेत. अनेक दुःखें, संकटें, यातना सहन करण्याचें धैर्य अंगीं येण्यास ईश्वरचिंतनाचा उपयोग फार होतो.

वरचेवर ईश्वराची स्तुती व भजन करीतच बसावें काय ? तसें मुळींच करूं नये. कारण ईश्वरालाहि तें पसंत नाहीं. ईश्वर स्तुतीनें प्रसन्न होत नाहीं. तर तो स्वकर्तव्य केल्यानेंच प्रसन्न होतो. स्वकर्तव्याचीं सुमनेंच देवावर वाहावींत, स्वकर्तव्य टाकून देऊन जे नुसतें हरिहरि म्हणत बसतात त्यांच्यावर ईश्वरकृपा होते असें नाहीं. वय, विद्या, परिस्थिति यांचा विचार करून धर्म, समाज व राष्ट्रसंबंधीं कर्तव्यें पार पाडण्याचें सामर्थ्य ईश्वराजवळ मागावें. सद्बुद्धीची याचना परमेश्वराकडे करावी. ही प्रार्थनासुद्धां सकाळीं व सायंकाळीं नियमित वेळीं एकांतांत करावी. त्या वेळीं आत्मनिरीक्षण करावें, स्वदोषाचा विचार करावा व गुण वाढविण्याचा प्रयत्न करावा. देवाजवळ कांहीं मागितलें तर त्याचें गाठोडें त्यानें बांधून ठेविलें आहे असें समजूं नये. तुकोबा म्हणतात.

नाहीं देवापाशीं मोक्षाचें गाठोडें । आणोनि निराळें देईल हातीं ॥
इंद्रियाचा जय साधूं नियमन । निर्विषय कारण असे तेथ ॥

वाचकहो, आपणास कांहीं साध्य करावयाचें असेल तर इंद्रियनिग्रह करा, सर्वसिद्धीचें कारण जें मन त्याला प्रसन्न करा, मनःशक्ति वाढवा. तुम्हांतील सुप्त शक्ति जागृत करून घ्या. या सर्व गोष्टींकडे मनाचा कल होण्यास ईश्वरचिंतन (कांहीं काल) हें एक साधन आहे, इतकेंच तुम्ही लक्षांत ठेवा.

दुर्बल मनुष्यच शकुनावर विश्वास ठेवतो, ग्रहांची इष्टानिष्टता पाहतो, कुंडली घेऊन ज्योतिषाकडे पळतो. परंतु जो सबल आहे व समर्थ आहे त्याचें यावाचून मुळींच अडत नाहीं. ईश्वरोपासनेची स्थितिहि तशीच आहे. गृहशिक्षण, पूर्वसंस्कार व परिस्थिति यांचें आनुकूल्य असेल तर लहानपणापासून ईश्वराच्या चिंतनाकडे प्रवृत्ति होईल. परंतु तसें नसेल तर तारुण्याच्या पहिल्या जोमांत कुणीहि ईश्वराची आठवण काढीत नाहीं. अनासक्ति, निरहंकार व ईश्वरभक्ति हीं नव्या रक्तामध्यें एकदम येत नाहींत. प्रपंचांतील धक्केचपेटे खाल्ले, आपत्ति सोसल्या, चार दोन जिवावरचीं दुखणीं आलीं, द्रव्यनाश अकल्पित रीतीनें झाला, पोटचीं व पाठचीं गेल्यामुळें दुःख झालें कीं मग ईश्वर आठवतो. अनेक ताप, अडचणी व स्वतःचें दौर्बल्य यांची जाणीव, प्रपंचाला इंगा फिरल्यावरच होते व मीपणाची नांगी नरम पडते. ईश्वरस्मरण म्हातारपणींच होतें, याचें कारण त्रिविध तापानें तप्त झालेली मनःस्थिति हेंच होय. मनुष्याला केव्हां तरी आपलें दौर्बल्य चांगलें जाणवतें व त्यामुळें त्यानें योजलेल्या गोष्टी होतील कीं नाहीं, अशी त्याला शंका येते त्या वेळीं तो ईश्वराला शरण जातो.

ईश्वराला शरण जाणें, त्याचें चिंतन करणें म्हणजे स्वहृदयस्थ परमात्म्यालाच शरण जाणें होय. ईशतत्त्व परमार्थतः जवळ आहे, फार जवळ आहे, तें दूर नाहीं. ईश्वरस्मरण म्हणजे आत्मस्मरण व ईशचिंतन म्हणजेच आत्मचिंतन होय. हें ज्ञान मनुष्याला नसतें. त्याच्या मनाला एकादें सगुण साकार स्वरूप पाहिजेसें वाटतें व त्याच्या ध्यानपूजनांत तें मन रमतें. मूर्तिपूजा ही गौणच आहे; परंतु ती केवळ एकाग्रतेकरितां आहे. विभूति, वीर, ऋषी हीं

आदरस्थानेंच होत. माता, पिता, गुरु ह्यांचीहि सेवा याच वृत्तीनें करावी असें म्हटलें आहे.

परमेश्वर सर्वत्र भरलेला आहे हें खरें; परतु त्याचें विशेष अस्तित्व कुठें आहे हें जाणण्याची इच्छा प्रत्येकाला होते तशीच ती अर्जुनालाहि झाली. भगवतांनीं गीतेंत अर्जुनाला विभूतियोग याचकरितां सांगितला. विभूति हें ईश्वराचें प्रतीक होय. प्रतीक म्हणजे प्रतिनिधि. प्रतीक म्हणजे परमेश्वर नव्हे. मनुष्याला जेव्हां दौर्बल्याची जाणीव होते तेव्हांच तो ईश्वराला शरण जात असतो. विद्यार्थी दौर्बल्यामुळें शिक्षकाला शरण जातो. रोगी वैद्याला शरण जातो.

ज्यांना मूर्तिपूजा नको असेल त्यांनीं मानसपूजा करावी. मूर्तिपूजेच्या पुढची पायरी तीच आहे. डोळ्यांपुढें कांहींच प्रतीक नसलें तर ध्यान, चिंतन कशाचें करणार? ज्यांच्या धर्मांत मूर्ति नाहींत, त्यांनीं डोळे मिटले तर मशिदी व चर्चें आणि त्यांतील दृश्यें हींच त्यांच्या डोळ्यांपुढें उभीं राहतात. तसल्या स्वरूपापेक्षां शास्त्रोक्त प्रतीकेंच श्रेष्ठ नव्हेत काय ?

सर्वत्र जर परमेश्वर भरलेला आहे तर तो प्रतिमेमध्यें–मूर्तिमध्यें नाहीं, असें म्हणतां येईल काय ? अवघें ब्रह्मरूप रिता नाहीं ठाव । प्रतिमा तो देव कैसा नोहे ।। असें श्री तुकाराम म्हणतात.

जें ब्रह्म सर्वत्र आहे तेंच प्रतिमेंत आहे. सर्वत्र परब्रह्माची व देवाची भावना असत नाहीं. परंतु देवालय व मूर्ति या कल्पना आल्या कीं संस्कारामुळें भावना बदलते. जगांत सर्व खेळ भावनेचा व श्रद्धेचा आहे. "श्रद्धामयोऽयं पुरुषः ।।" असाच सिद्धांत आहे. श्रद्धा व निष्ठा असली कीं सत्कर्मप्रवृत्त होते. सत्कर्मामुळें चित्तशुद्धि होते. चित्तशुद्धीमुळें वैराग्य बाणतें, ईश्वरज्ञानाचा विचार करण्यास बुद्धि समर्थ होते. बुद्धी अत्यंत शुद्ध, निर्मल व निर्दोष झाली कीं अनासक्तीनें जगांतील कर्मे होऊं लागतात आणि याच परिणत बुद्धीला ईश्वरसाक्षात्कार होऊन तो मनुष्य स्थितप्रज्ञ होतो, गुणातीत होतो व भक्तहि होतो.

५२५२

## प्रकरण बारावें

# चैतन्याचा विकास म्हणजेच हें जग

जीव, ईश्वर व जगत् यांचें ज्ञान म्हणजेच अध्यात्मज्ञान होय. ज्ञानप्रदीपामधील विषयहि तोच आहे. दहाव्या प्रकरणांत जीवस्वरूप सांगितलें, गेल्या प्रकरणांत ईश्वरस्वरूप कथन केलें, आतां अवशिष्ट जें जगत्स्वरूप तें सांगून हा ग्रंथ पूर्ण करितों.

जीव व ईश्वरस्वरूप समजल्यावर जगाकडे मानवाची दृष्टि आपोआप जाते. कारण जग हेंच मानवाचें कर्तृत्वक्षेत्र आहे. जगावाचून मनुष्य राहूं शकत नाहीं आणि जगावेगळी त्याला कर्तृत्व दाखविण्याला निराळी जागाहि नाहीं. सत्त्व, रज व तमोगुणांचा विकास म्हणजे हें जग ! नामरूपात्मक विविध पदार्थांचें प्रदर्शन म्हणजे हें जग ! ईश्वराच्या अघटित घटनापटुत्वाची साक्ष देणारेंहि हें जगच आहे. जगाव्यतिरिक्त अर्थात् जगाशिवाय ईश्वराचें लीलाकैवल्य तरी कुठें दिसणार ?

जीव हा ईश्वराचा अंश, व ईश्वर केवळ परब्रह्म असें ठरल्यावर मग जगत् तरी निराळें काय असणार !

अवघी एकाचीच वीण । तेथें कैचें भिन्न भिन्न ।।

जीव व जगत् हीं जर त्या परमेश्वरापासूनच होतात तर त्यांना भिन्नता कशी आली ? व तें जगत् मिथ्या तरी कसें ठरणार ?

जीव व ईश्वर यांच्या उपपत्तीप्रमाणें जगाच्या उपपत्तीविषयीं अनेक वाद प्रचलित आहेत. नैय्यायिकांचा आरंभवाद म्हणून प्रसिद्ध आहे. जगांतील जीं पंचमहाभूतें त्यांचे जे सूक्ष्म परमाणु (परम अणु) त्यांपासून जग झालें असें ते मानतात. अगदीं जगाच्या प्रारंभीं पृथ्वी, आप, तेज, वायु व आकाश यांचे अत्यंत सूक्ष्म परम अणु होते. एका अणूचा दुसऱ्या अणूशीं संयोग झाला व तो द्व्यणुक बनला. त्यापुढें तीन अणु, चार अणु असें होतां होतां हें येवढें जग उत्पन्न झालें आहे असा त्यांचा सिद्धांत आहे. परमाणूंचा परस्पर संयोगप्रारंभ हेंच जगाचें कारण ! म्हणून एका नैय्यायिकाची अशी गोष्ट सांगतात कीं त्याला मरणसमयीं देवाचें नांव घेण्यास सांगितलें, परंतु तो " पीलवः पीलवः पीलवः " (परमाणु, परमाणु, परमाणु) असेंच म्हणाला व त्यानें प्राण सोडला.

सांख्यशास्त्राचा गुण परिणामवाद आहे. दुधाचें दही बनतें. मृत्तिकेचा घट बनतो, सुवर्णाचे अलंकार होतात त्याप्रमाणें परब्रह्माचें जग बनलेलें आहे. प्रकृति व पुरुष अशीं दोन तत्त्वें ते मानतात. प्रकृतीनें पुरुषाचा संग केला म्हणजे जगदुत्पत्ति होते असें सांख्यमत आहे.

वेदांत्यांनीं या जगासंबंधीं विवर्तवाद स्वीकारलेला आहे. दोरीवर सायंकाळीं जसा सर्पाचा भ्रम होतो, दुपारीं शिंपीवर जसा रुप्याचा भ्रम होतो; त्याप्रमाणें अज्ञानामुळें परब्रह्मावर जगाचा भ्रम होतो. वास्तविक जग दिसतें तसें तें नसून त्याचें तात्त्विक स्वरूप निराळें आहे.

आरंभवाद, परिणामवाद, विवर्तवाद यांशिवाय अजातवाद म्हणजे जग उत्पन्नच झालेलें नाहीं असें म्हणणारा एक पक्ष आहे. क्षणिक विज्ञानवादी बौद्ध हे जगाचें अस्तित्व बाह्यतः नसून तें बुद्धीमध्यें आहे व क्षणिक आहे असें म्हणतात. या मताच्या जवळ जवळ 'दृष्टिसृष्टिवाद' आहे. वंध्येचा मुलगा, आकाशाचीं पुष्पें, सशाला शिंगें, बागुलबुवा, या वस्तु जशा अत्यंत मिथ्या आहेत, तद्वत् हें जग आहे असेंहि प्रतिपादन केलें जातें.

या भिन्न भिन्न मतांचा परिणाम आपल्या समाजावर फार बराच झालेला आहे व जिकडे तिकडे माया व मिथ्या यांचा काथ्याकूट चालू आहे. पुरुषार्थी, उद्योगी, कर्तृत्ववान माणसांना दुर्बल करणारा हा मिथ्यावाद आहे. गीतेनें हा वाद मान्य केलेला नाहीं. गीता म्हणते " जगांत परमेश्वर आहे, समाज आहे, राष्ट्र आहे, अभ्युदय आहे, याकरितां यज्ञचक्र चालविलें पाहिजे. कर्तव्यरूपी कुसुमानें ईश्वर संतुष्ट होतो. ईश्वरप्राप्तीकरितां धर्म, समाज, व राष्ट्रसंबद्ध कर्तव्यें केलीं पाहिजेत. कारण सर्व जगांत एकच परमात्मा भरलेला आहे."

वासुदेवः सर्वमिति स महात्मा सुदुर्लभः ॥ गी. अ. ७ श्लो १०
सर्वत्र वासुदेव आहे, " जें जें भेटे भूत । तें तो मानिजे भगवंत " ज्ञाने. अ. १०
असा भक्तियोग जाणणारा महात्मा क्वचितच असतो.

समाजांत तप, तेज, त्याग, जोरकसपणा, धैर्य, धडाडी, उत्साह, उद्योग, पौरुष इत्यादि गुण पाहिजेत म्हणून भगवंतांनीं " मी स्वतः कर्म करितों, कर्तव्य करितों, जग मिथ्या म्हणून स्वस्थ बसत नाहीं असें स्पष्ट म्हटलें आहे."

तस्मात् युद्ध्यस्व । मामनुस्मर युद्ध्यच, । कुरु कर्मैव तस्मात् त्वम् । कार्य

कर्म समाचर, । नियतं कुरु कर्मत्वं, असा उपदेश गीतेंत पदोपदीं आहे त्याचा अर्थ काय बरें असावा ? जिज्ञासा मारणारा, पौरुषाची खच्ची करणारा, दौर्बल्य वाढविणारा, आलस्य पुष्ट करणारा जगन्मिथ्यात्व वाद हा गीतेला मान्य नाहीं तर जग हें मिथ्या नसून चैतन्याचा विकासच आहे असें गीतेचें मत आहे.

सूर्य व प्रकाश यांमध्यें भेद आहे काय ? ज्वाला व अग्नि यांचें भिन्नत्व दाखवितां येईल काय ? पाणी, व द्रवपणा, दिवा व प्रकाश, साखर आणि गोडी यांमध्यें जेवढें भिन्नत्व आहे तेवढेंच ईश्वर व जग यांमध्यें आहे. दिव्याहून प्रकाश जसा वेगळा काढतां येत नाहीं, पाण्याहून द्रवपणा जसा वेगळा दाखवितां येत नाहीं, तसें ईश्वराहून वेगळें जग नाहीं. ईश्वराच्या एका अंशानेंच तें व्यापून टाकलेलें आहे असें गीताशास्त्र म्हणतें.

हें नामरूपात्मक दिसणारें जगत् भ्रम नसून किंवा मिथ्या नसून हें सर्व परब्रह्म आहे. हा सर्व त्या एका चैतन्याचा विकास आहे असेंच आपण ध्यानांत ठेवावें "सर्वं जगदिदं ब्रह्म" "अयमात्मा ब्रह्म" हीं वेदवाक्यें तोच सिद्धान्त प्रतिपादन करितात. श्रीमत् भगवद्गीतेमध्यें,

एकांशेन स्थितो जगत् । अ. १० श्लो. ४२

माझ्या एका अंशानें म्हणजे अवयवानें हें सर्व जगत् होऊन मीच राहिलों आहे असें म्हटलें आहे. श्री शंकराचार्यसुद्धां एके ठिकाणीं—

विश्वं यावद्विभाति द्रुमनगनगरारामचैत्याभिरामं ।
तावत् चैतन्यमेकं प्रविकसति यतस्तत्तदात्मावशेषम् ।। शतश्लोका

या विश्वांत जें वृक्ष, पर्वत, नगरें, आराम, चयनस्थानें, उपवनें इत्यादि शेंकडों रूपानें भासतें तो सर्व एका चैतन्याचा विकास होय असें म्हटलें आहे. याहिपेक्षां महाराष्ट्र साधुसंतांचे तडफदार व स्पष्ट विचार पुढील ओव्यांमध्यें दिसून येतील.

ज्ञानेश्वर ज्ञानेश्वरींत विविध ठिकाणीं म्हणतात—

ऐसेनि हें विश्व येथें । मीचि विस्तारिलोसें निरुतें ।।
आतां पै माझेनि एके अंशें । हें जग व्यापिलें असे ।।
यालागीं भेद सांडोनि सरिसें । साम्यें भज ।।
माझिया विस्तारलेपणाचेनि नांवें । हें जगचि नोहे आघवें ।।

या लागीं मजपासूनि भूतें । आनें नव्हती हें निरुतें ।।
आणि भूतावेगळिया मातें । कांहींच न मनीं हो ।।
म्हणौनि जग परौते । सारूनि पाहिजे मातें ।।
तैंसा नोहे उखितें । आघवें मीचि ।।
म्हणौनि विश्वपण जावें । मग तें मातें घेयावें ।।
तैंसा नव्हे आघवें । सकटचि मी ।।

मीच विश्वरूपानें विस्तार पावलों आहें. माझ्या एका अंशानें जग व्यापिलेलें आहे. म्हणून जग व मी यांमध्यें भेद मानूं नकोस व एकत्वानें जगाची सेवा कर. माझा विस्तार म्हणजेच हें जग नव्हे काय? म्हणून प्राणिमात्र मजहून भिन्न नाहींत व मी त्याहून भिन्न नाहीं हें अगदीं खरेंखुरें समज. जग बाजूला सारून मला पाहाणें चुकीचें आहे. जग व मी हीं सर्व एकच आहोंत. विश्वपणा म्हणजे जगाचें स्वरूप सोडून मला पाहूं लागशील तर तें ठीक नाहीं. अरे, सर्व कांहीं मीच आहे. (सर्वं विष्णुमयं जगत्)

एकनाथ भागवतांत सांगतात—

तेवी जगदाकारें सकळ । भासे केवळ चिदात्मा ।
मूळीं चिदात्माचि कारण । तेथूनि जें जें तत्त्व झालें जाण ।।
तें तें निखळ चैतन्य घन । जग संपूर्ण चिद्रूप ।
तेवीं जगाचें चिन्मात्रमूळ । जग सकळ चिद्रूप ।।
बीज ऊंस दोन्ही एकरूप । तैसा प्रपंच जाण चित्स्वरूप ।। अ. १२

जग हें चिद्रूप आहे. चैतन्याचें स्वरूप आहे. हाच अर्थ वरील ओव्यांमध्यें स्पष्ट आहे.

श्रीसमर्थ म्हणतात—

ओस मुलुखीं काय पहावें । लोकांवेगळें कोठें रहावें ।।

म्हणून जिकडे जग तिकडे जगन्नायक असें तत्त्व ते प्रतिपादन करितात.

श्रीतुकाराममहाराजहि

विश्वीं विश्वंभर । हेंचि वेदांतीचें सार ।।
जगीं जगदीश । शास्त्रें वदती सावकाश ।।
व्यापिलें नारायणें । ऐसें गर्जति पुराणें ।।

वेद, शास्त्रें व पुराणें यांवरून जगासंबंधीं असाच निर्वाळा देतात.

जगाविषयीं पुष्कळ अनिष्ट कल्पना आहेत, त्या नष्ट व्हाव्या म्हणून वेदांपासून तुकारामापर्यंतचे आधार देऊन आम्हीं हा चिद्विकासवाद मांडला आहे. प्रपंची, पुरुषार्थी, व्यावहारिक माणसानें हाच वाद ( हेंच तत्त्व ) ध्यानांत ठेवला पाहिजे व जगांतील आपलीं कर्तव्यें अविरतपणें चालू ठेविलीं पाहिजेत. गीता मनुष्यमात्राला सांगते कीं 'अरे तूं मोठा आहेस, ईश्वर आहेस, तुझें तत्त्वज्ञान जगाला शिकीव, शंभर वर्षे जग, कर्तव्य कर, राज्यें करा, साम्राज्यें मिळवा, जगाचा उपभोग घ्या, चांगलें खा, चांगलें प्या, चांगलें ऐका, वाचा व चांगलेंच पाहा.'

गीतेच्या या उपदेशानुसार या ईश्वराच्या जगांत भूतांचें पालन ही देवपूजा होय. लोकसेवा, धर्मसेवा, राष्ट्रसेवा, उद्योगसेवा हीच ईश्वरपूजा असें समजावें. या सृष्टीच्या रम्य बागेंत ईश्वरानें हजारों मानवकुसुमें उत्पन्न केलीं आहेत. त्यांतील पुष्कळांचा विकास अद्याप व्हावयाचा आहे. निरक्षरांना साक्षर करून, साक्षरांना विचारी बनवून, अस्पृश्यांना स्पृश्य करून, पतितांना शुद्ध करून, निरुद्योग्यांना उद्योगी बनवून, निरुत्साह्यांना उत्साहोत्थित करून हजारों मानवकुसुमें वाचकहो, तुम्ही विकसित करा, स्वतः विकसित व्हा, त्यांचा सुगंध हाच ईश्वराला प्रिय आहे. धर्म, राष्ट्र, समाज, शिक्षण, उद्योग अशा विविध क्षेत्रांत जितकीं मानवकुसुमें विकसित होतील व जेवढ्यांची मालिका ईश्वराच्या मस्तकावर वाहिली जाईल तेवढा ईश्वर हा तुम्हाआम्हांला अत्यंत जवळ आहे. अनासक्ति, अनहंकृति, निर्मल वृत्ति, शुद्ध भावना यांनीं युक्त होऊन हजारों तरुण जेव्हां स्वतःला विसरून जगांतील अनेक उद्योग करूं लागतील त्या वेळीं त्या ईश्वराची कृपा आपल्यावर झाल्याविना राहणार नाही. ॐ शांति शांतिः शांतिः

यत्र योगेश्वरः कृष्णो यत्र पार्थो धनुर्धरः ।
तत्र श्रीर्विजयो भूतिर्ध्रुवा नीतिर्मतिर्मम । गी. अ. १८ श्लो. ७८

## उपसंहार

वाचकहो, गीता–प्रदीपाला प्रारंभ करितांना प्रथम जो उद्देश सांगितला होता तो आतांपर्यंत सिद्धीस गेला आहे. गीता ग्रंथ लहान व सुटसुटीत असा असला तरी त्यांतील विषय इतका गहन आहे कीं

त्याचें आकलन सामान्य मनुष्यास होत नाहीं. संसाराला प्रारंभ करण्यापूर्वी या ग्रंथाचें अध्ययन तरुणांनीं करावें असें लोकमान्याप्रमाणें मलाहि वाटतें. परंतु सर्व तरुणांना संस्कृत येतें असें नाहीं व आलें तरी अध्ययन करून विषय समजतो असें नाहीं. संसाराला प्रारंभ केल्यावर अनेक प्रश्न तरुण स्त्रीपुरुषांपुढें उभे राहतात. त्यांचीं उत्तरें गीतेच्या आधारानें या प्रदीपांत देण्याचा यत्न केला आहे. गीताप्रदीपाचे मुख्य भाग चार आहेत. पहिल्या अमरप्रदीपांत मनुष्याचें अमरत्व देह, कर्म व आत्मदृष्ट्या कसें आहे हें दाखविलें. त्यापुढें कर्मप्रदीपांत कर्म म्हणजे काय ? तें कां करावें ? कोणतें कर्म करावें, कोणतें न करावें व तें कसें करावें याचें विवेचन केलें. निमित्त प्रदीपामध्यें निमित्ताची यथार्थ कल्पना देऊन आपण निमित्तमात्र आहोंत या भावनेनें सांसारिक कर्में भक्तिमार्गदृष्ट्या कशीं करावींत याचें दिग्दर्शन केलें. शेवटीं, ज्ञानप्रदीपामध्यें जीव, ईश्वर व जगत् यांचें स्वरूप सांगून हा ग्रंथ उत्साही, उद्योगी व उत्कर्षेच्छु तरुण वाचकांच्या स्वाधीन केला आहे.

उत्तिष्ठत । जाग्रत । प्राप्यवरान्निबोधत ॥

---

## परिशिष्ट १ लें

### ये यथा मां प्रपद्यंते तांस्तथैव भजाम्यहम् —गी. अ. ४ श्लो. ११

गीतेंतील हा श्लोक पुष्कळांच्या तोंडीं आहे. या श्लोकाचा अर्थहि एका दृष्टीनें अगदीं उघड, सरळ व असंदिग्ध आहे; तथापि या श्लोकाचा अर्थ कोणी भक्तिपर तर कोणी कर्मपर व व्यावहारिक असा करितात. कांहींना या श्लोकाचें सार ' जशास तसें ' असें सांगितलें तर बरें वाटतें. कांहीं तर या अर्थावर सुडाची व खुनशीपणाची भावना आरोपित करितात. प्रस्तुत आम्हांला केवळ वेदांतशास्त्र दृष्ट्या या श्लोकाचा अर्थ काय आहे, हें पाहावयाचें आहे.

### पूर्वापर संबंध

गीतेच्या चौथ्या अध्यायांतील हा ११ वा श्लोक आहे. प्रथम त्याचा पूर्वापर संबंध पाहिला पाहिजे. अज, अव्यय असा भूतेश्वर आत्ममायेनें सगुण विग्रह धारण करितो व दुष्टदमन, साधुरक्षण आणि धर्मस्थापना करतो. परमेश्वराचें हें दिव्य जन्मकर्म जो परमार्थतः (तत्त्वतः) जाणतो तो देहपाता-

नंतर मुक्त होतो, असा विषय नऊ श्लोकांपर्यंत आला आहे. दहाव्या श्लोकामध्यें, याप्रमाणें तत्त्वतः मला जाणणारे, ज्ञानतपानें पुनीत झालेले, षड्रिपुवियुक्त झालेले, माझा आश्रय केलेले असे अनेक साधक माझ्या स्वरूपाप्रत आलेले आहेत असा जुना दाखलाहि दिला आहे. पूर्वीं कित्येकांना या ज्ञानतपानें मोक्ष मिळाला असला तरी तो सर्वांना मिळाला नाहीं, यावरून परमेश्वराचे ठिकाणीं रागद्वेष आहेत काय ? कारण त्यामुळेंच तो कित्येकांना मोक्ष देतो व कित्येकांना देत नाहीं अशी शंका वरील ११ व्या श्लोकापूर्वीच्या अवतरणांत श्रीशंकराचार्यांनीं उपस्थित केली आहे व ती सयुक्तिक आहे. अर्थात् अर्जुनाच्या या शंकेचें उत्तर 'ये यथा मां' या श्लोकामध्यें उत्तम प्रकारें दिलेलें आहे.

श्रीभगवान् म्हणतात कीं, माझ्या ठिकाणीं रागद्वेष नाहींत व वैषम्यनघृण्यहि नाहीं. मी सर्वांना मोक्ष देण्यास सदैव सिद्ध आहें. "ये यथा मां प्रपद्यंते तांस्तथैव भजाम्यहम्॥"जे ज्या प्रकारानें, ज्या हेतूनें व ज्या फलेच्छेनें मला शरण येतात त्यांना त्याच प्रकारानें, त्या हेतूनें व त्यांना जें फळ पाहिजे असेल तें देऊन मी त्यांचेवर अनुग्रह करितों. पुष्कळ साधक मजकडे विविध उद्देशांनीं येतात. ज्यांना मोक्ष पाहिजे असेल त्या मुमुक्षु व ज्ञानी लोकांना मी मोक्ष देतों. ज्यांना माझें ज्ञान पाहिजे असेल त्या जिज्ञासूंना मी ज्ञानग्रहणशक्ति देतों. जे दुःख व पीडा यांच्या निवारणार्थ मला भजतात त्यांचें तें दुःख मी नष्ट करितों. तात्पर्य, यांपैकीं माझें कोणतेंहि कृत्य रागद्वेषनिमित्तक नाहीं. जो ज्या भावनेनें मला शरण येतो त्याची ती इच्छा मी कर्मसापेक्ष पूर्ण करितों. या जगांतील माणसेंसुद्धां सर्वव्यापी जो मी परमेश्वर त्याच्या मार्गाचेंच अभ्युदय–निःश्रेयस साध्य व्हावा म्हणून सर्व प्रकारांनीं अनुकरण करतात.

## आचार्यांचा अर्थ

श्रीमदाचार्यांच्या भाष्यानुसार भगवंताच्या म्हणण्याचा हा वरील आशय आहे. हा आशय वाचतांना पुढील सातव्या अध्यायांतील विषयांचें स्मरण होतें. तेथें श्लोक १५ ते १७ मध्यें असें म्हटलें आहे कीं, नराधम, आसुर, दुष्कृति, मूढ लोक हे मुळीं मला शरण येत नाहींत. ( माझें नांवसुद्धां घेत नाहींत ) जे पुण्यवान् शरण येतात तेसुद्धां चार प्रकारचे असतात. त्यांतील कांहीं आर्त तर कांहीं जिज्ञासू, कांहीं अर्थार्थी तर कांहीं ज्ञानी असतात. त्यांतील ज्ञानी

हा मात्र माझा आत्मा असतो. कारण त्याला मोक्ष पाहिजे असतो व तोच मी अधिकारानुरूप त्याला देतों. शांकरभाष्यामध्यें 'ये यथा मां' याचा वरील-प्रमाणें केलेला अर्थ बरोबर आहे हें चौथ्या अध्यायांतील पुढच्याच म्हणजे १२ व्या श्लोकावरूनहि दिसत आहे. त्या श्लोकाचा अर्थ असा आहे.

या मनुष्य लोकांत कर्मजन्मसिद्धि (फल) त्वरित मिळतें म्हणून कर्म-फलेच्छेनें येथें पुष्कळ लोक (मला न भजतां) इंद्र, अग्नि, वरुण इत्यादि देवतांनाच भजतात. यावरून मनुष्यप्राण्यांना विविध भोग पाहिजे असतात, व त्याकरितां ते विविध देवतांना भजतात. विविध देवतोपासना व भोग यांना कंटाळून कांहीं लोकच ईश्वराच्या भजनाकडे वळतात आणि अशा लोकांचे सुद्धां चार वर्ग पडतात! त्यांत जे ज्या भावनेनें ईश्वराला शरण जातात, त्या भावनेनुरूपच ईश्वर फल देतो इत्यादि सिद्धांत निघतात. याचें सार अगदीं मोजक्या शब्दांत सांगावयाचें झाल्यास ईश्वराचें वर्तन सापेक्ष असतें असेंच सांगितलें पाहिजे. सापेक्ष शब्दाचे दुसऱ्याची अपेक्षा असणारे, जितक्यास तितके, तंतोतंत, यथोचित्, अनुरूप व ग्राम्य अर्थ सोडून 'जशास तसें' असे अर्थ आहेत.

ईश्वर या जगांत प्राणिमात्रांच्या कर्मानुरूप म्हणजे सापेक्ष, यथोचित् फळ देतो, हा सिद्धांत वरील श्लोकांत श्रीकृष्णांनीं सांगितलेला आहे. त्याचा शास्त्रीय अर्थ समजावा म्हणून ईश्वर व सापेक्ष या शब्दांची मीमांसा अधिक केली पाहिजे. परमेश्वर हा या लोकांचें कर्म, कर्तृत्व, त्याचा अभिमान व त्याचें फल यांपैकीं कांहीं उत्पन्न करीत नाहीं. तर प्राण्याच्या स्वभावा-नुसार (कर्मबीजशक्त्यनुसार )हें सर्व चाललें आहे. ईश्वर कोणा भक्ताचें पापहि घेत नाहीं , पुण्यहि घेत नाहीं. अज्ञानानें ज्यांचें ज्ञान नष्ट झालें आहे असे प्राणी वृथाभिमानानें मी करतों, करवितों इत्यादि म्हणतात. मी सर्वांशीं सम आहें. माझा कोणी शत्रु नाहीं, मित्र नाहीं. परंतु जे मला अनन्य भक्तीनें भजतात त्यांच्यामध्यें मी असतों व माझ्यामध्यें ते असतात. या स्थिरचर जगांत ईश्वरच भरलेला आहे. तथापि सर्वांच्या हृदयांत तो आहे. सर्व भूतांच्या हृत्प्रदेशामध्यें हे अर्जुना, ईश्वर वास्तव्य करीत असतो; त्याच्यापासूनच सर्वांना प्रेरणा मिळते. इत्यादि गीतावाक्यें ईश्वरस्वरूपनिर्णयाला चांगलींच उपयुक्त आहेत.

दृष्टांत देऊन ईश्वरस्वरूपाचें विवेचन पुढीलप्रमाणें करतां येईल.

## ज्ञानेश्वरींतील दृष्टांत

श्रीज्ञानेश्वरमहाराज दिव्याच्या दृष्टांतानें ईश्वरस्वरूप सांगतात. जैसा दीप ठेविला परिवरी। कवणातें नियमी ना निवारी ।। आणि कवण कवणिये व्यापारी। राहाटें तेंहि नेणे ।। १२८ ।। तो जैसा साक्षीभूतु। गृहव्यापारप्रवृत्तिहेतु ।। १२९ (अ. ९) घरामध्यें लावलेला दिवा हा सर्वांना प्रकाश देतो, त्याच्या प्रकाशांत अनेक व्यवहार होतात, परंतु तो कोणालाहि कोणत्याहि व्यवहाराला प्रवृत्त करीत नाहीं; किंवा निवृत्त करीत नाहीं, फार काय पण त्या दिव्याला कोणता मनुष्य कोणता व्यापार करीत आहे याचेंहि ज्ञान नसतें असा केवळ साक्षी व प्रत्येक व्यापाराचा प्रेरक जसा दिवा आहे तसाच ईश्वर आहे. सूर्याच्या दृष्टांतानेंहि हें ईश्वरस्वरूप समजण्यासारखें आहे. तो उगवला कीं जगांतील लाखो व्यापार चालू होतात. तो सर्वांचा प्रेरक व सर्वांना प्रकाशदाता आहे; परंतु तो केवळ साक्षी आहे. जो मनुष्य जे संस्कार व ज्या वासना घेऊन येतो त्याला तदनुरूप कर्म करण्याला सूर्यप्रकाशाचें साहाय्य होतें. सर्वांना साहाय्य एका प्रकाशाच्या सत्तेचेंच. परंतु प्राण्यांचीं कर्में, वासना, इच्छा या भिन्नभिन्न व त्रिविध गुणात्मक असल्यामुळें यांना कर्में जशीं करावींशीं वाटतात, तसें त्यांना सूर्यप्रकाशाच्या साहाय्यानें होत असतें.

## करावें तसें भरावें

'करावें तसें भरावें', 'यथा बीज तथांकुरः', 'यो यत्श्रद्धः स एव सः' 'यो यो यां यां तनुं' या ठिकाणीं हाच सिद्धांत सांगितला आहे. जसें कर्म तसें फळ मिळतें. पेरिलें तें उगवतें. ज्याची जशी श्रद्धा असेल तसाच तो बनतो. जो ज्या देवतेचें भजन करूं इच्छितो, त्याची तीच श्रद्धा मी दृढ करीत असतों. जसा ध्वनि तसा प्रतिध्वनि, जसें बिंब तसें प्रतिबिंब इत्यादि अनेक वाक्यांचा अर्थ जशास तसें या म्हणीप्रमाणेंच सांगितला जात आहे. हीं सर्व वाक्यें कर्म जसें कराल तसें फळ मिळेल असें अट्टाहासानें सांगतात. म्हणजे फल सांगण्याचा या वाक्याचा हेतु आहे. कर्म चांगलें करावें, चांगलें वागावें हें सांगण्याकरितां हीं वाक्यें नाहींत. तें सांगणारीं इतर पुष्कळ आहेत; हें येथें लक्षांत ठेविलें पाहिजे. ईश्वराच्या फलदातृत्वामध्यें भेद कां दिसतो?

तर प्राण्यांच्या ठिकाणीं रागद्वेषादि असतात व त्यायोगानें ते कर्म करतात म्हणून. तात्पर्य कर्म हेंच फलसूचक आहे. ईश्वर हा साक्षीभूत आहे व येथें 'प्रतिफळे भावना आपुलाली ॥' असा न्याय आहे.

भगवान् बादरायणांनीं ब्रह्मसूत्रामध्यें २–१–३४ आणि २–३–४२ या ठिकाणीं ईश्वरस्वरूपाचें सापेक्षत्वाचें विवेचन मोठें मार्मिक केलें आहे. त्या सूत्रांवरील शांकरभाष्य जिज्ञासूंनीं मुळावरून समग्र वाचण्याजोगें आहे. आचार्य म्हणतात, ईश्वर निरपेक्ष आहे. परंतु प्राणिकर्मसापेक्ष विषम सृष्टि त्याला उत्पन्न करावी लागते हा त्याचा अपराध नाहीं. ईश्वर हा पर्जन्याप्रमाणें आहे. सर्व धान्यांच्या उत्पत्तीला ईश्वर हा साधारण कारण असला तरी त्या त्या बीजाच्या ठिकाणीं जी विशिष्ट शक्ति असते तीच धान्योत्पत्तीचें असाधारण कारण होय. गहू, जोंधळा, हरभरा, हीं सर्व धान्यें पावसामुळें येतात. परंतु वरील प्रत्येक धान्यांत जी विषमता आहे व प्रत्येक धान्यकणांत त्या त्या रूपानेंच उद्‌भूत होण्याची जी शक्ति आहे ती पर्जन्य देत नाहीं व काढून घेत नाहीं. ज्या बीजांत जी शक्ति असेल, तिचें विकसन करणें एवढें पर्जन्याचें कार्य आहे.

असा या भाष्यखंडाचा आशय आहे. शेवटीं भगवान् आचार्यांनीं ईश्वर हा प्राणिकर्मविशेषांच्या अपेक्षेनें त्यांच्यावर निग्रह व अनुग्रह करितो असें म्हटलें असून उपसंहार करतांना या सिद्धांतास पोषक म्हणून त्यांनीं गीता स्मृतींतील "ये यथा मां प्रपद्यंते" हेंच वाक्य दिलेलें आहे. या श्लोकाचें भाषांतर श्रीसमर्थांनीं मनोबोधामध्यें असे हो जया अंतरीं भाव जैसा। वसे हो तया अंतरीं देव तैसा ॥ असेंच केलें आहे आणि 'जसा भाव तसा देव' या सिद्धांताचें विवेचनहि दासबोध द. ३–१० ओं. १३–१९ व द. ४–८ ओं. १२ ते १५ मध्यें वरील शांकरभाष्यानुसार केलेलें आहे.

'ये यथा मां' या श्लोकार्धांतील उत्तर भागामध्यें "तथैव भजाम्यहम्" असें वाक्य आहे. यांतील तथैव हा अवधारणात्मक एवकार आहे याकडे पुष्कळ लोक दुर्लक्ष करतात. खरें स्वारस्य त्या एवकारामध्येंच आहे. अगदीं जसें असेल तसेंच, नेमकेंच; कमी नव्हे व अधिक नव्हे तंतोतंतच असा अर्थ तो एवकार दाखवितो.

## ईश्वराचें प्रयोजन काय ?

या जगांत सर्वत्र कर्मच जर फल देत असतें व करावें तसें भोगावें असा जर न्याय आहे, तर तेथें ईश्वराचें तरी प्रयोजन काय असा प्रश्न येतो. त्याचेंहि उत्तर दिलें पाहिजे. कर्म हें जड आहे. तें झाल्याबरोबर नष्ट होतें. प्रत्येक कर्माचें फळ त्या वेळीं मिळतें असें नाहीं. कर्म व कर्मजन्य अदृष्ट फल या दोहोंपासून जेव्हां सुखदुःख अनुभवास येईल त्याच वेळीं फळभोग होतो, असें म्हणतां येतें. आत्म्याशीं असंबद्ध असणाऱ्या सुखदुःखाला फल म्हणतांच येत नाहीं. कर्मफलाचा कर्त्याशीं संयोग चेतनांवाचून होणें शक्य नाहीं. कारण कर्म आणि अपूर्व हीं दोनहि काष्ठाप्रमाणें जडच आहेत. ती चिच्छक्ति म्हणजेच ईश्वर होय. तिजकडून कालांतरानें कर्माचें फल मिळतें. कर्मफलदाता जसा ईश्वर आहे, तसाच जीवाकडून कर्म करविणाराहि ईश्वरच आहे. ईश्वर हा सर्व-भूताध्यक्ष, साक्षी, चेतविता असल्यामुळें त्याची चेतनाशक्तीच सर्वत्र प्रेरक असते व प्रत्येक जीवामध्यें चेतनाशक्ति वास करीत असते. ती शक्ति अध्यास-मूलक असते. चिताचा जडावर व जडाचा चितावर जो सारखा अध्यास चालला आहे, त्या घर्षणामध्येंच चिच्छक्ति आहे. तिच्या ठिकाणीं कारयितृत्व आहे. जीवामध्यें चेतनाशक्ति नसेल तर त्याच्याकडून कांहीं होणार नाहीं. या चेतनाशक्तीच्या आश्रयानेंच जीवाकडून त्याची बुद्धि, कर्म, वासना, संस्कार यांना अनुरूप अशीं कर्में घडत असतात. सर्वत्र चेतनाशक्तीचें अधिष्ठान सारखें असतांना सृष्टीमध्यें जो विषमपणा दिसतो तो प्राण्याच्या बुद्धीच्या ठिकाणीं असलेल्या भिन्नभिन्न संस्कारांमुळेंच होय. चेतना शक्तीच्या अनु-ज्ञेनेंच जीवाच्या कर्तृत्व, भोक्तृत्वादि संसाराची सिद्धि आहे व मोक्षाचीहि आहे. सारांश, कर्मफलदाता ईश्वर आहे, तो करविता आहे, म्हणूनच प्राण्यांच्या कर्मानुरूप सुखदुःखादि फलें तो देत असतो.

## परमेश्वराचीं विविध स्वरूपें

चेतनाशक्ति, सत्ता, आश्रय या दृष्टींनीं ईश्वरस्वरूपाचें हें वरील विवेचन आहे. ‘एकं सत् विप्रा बहुधा वदन्ति’ ‘उपासकानां कार्यार्थं ब्रह्मणो रूपकल्पना’ या सगुण दृष्टीनें ईश्वराकडे पाहिलें तर प्रत्येक प्राण्याला त्याच्या भावनेनुरूप ईश्वर निरनिराळा दिसत असतो. ईश्वर स्वयंसिद्ध आहे. तो स्वस्वरूप आहे. परंतु एकच परमेश्वर हा विविध प्राण्यांना वेगवेगळा भासतो. कोणी

त्याला उदार म्हणतात, तर कोणी त्याला कृपण म्हणतात. कांहीं त्याला अत्यंत कृपाळू समजतात तर कित्येक त्याच्या इतका क्रूर नाहीं असें म्हणतात. दुर्योधन हा ईश्वरावर विषमतेचा आरोप करील तर भगवान् श्रीकृष्ण हा सर्वांशीं सम आहे असें धर्मराज सांगेल. हा प्रत्येकाच्या बद्धीचा, भावनेचा, कर्माचा व त्याच्या संस्काराचा विषय आहे. या भेदाचा संबंध ईश्वराकडे मुळींच नाहीं. कंसाच्या वधाकरितां भगवान् श्रीकृष्ण जेव्हां रंगमंडपांत शिरले तेव्हां मल्लांना ते वज्रासारखे, राजांना सम्राटासारखे, स्त्रियांना मदनासारखे, गोपांना मित्रासारखे, दुष्टांना काळासारखे व आपल्या मातापितरांस पुत्रासारखे दिसले असें वर्णन भागवतामध्येंहि आहे. श्रीकृष्ण जसे होते तसेच होते. परंतु प्रत्येकाची पाहण्याची जी भिन्न दृष्टि होती तीप्रमाणें त्याला ते दिसले. हा प्रभाव त्या दृष्टीचाच नव्हे काय ? श्रीकृष्णांचें हें विविध दर्शन सापेक्ष म्हणजे जशास तसें असेंच नव्हे काय ? व्यवहारांत एकच गृहस्थ मुलाचा बाप, बायकोचा नवरा, पुतण्याचा काका, भाच्याचा मामा, स्नेह्यांचा मित्र, ऋणकोचा सावकार व पक्षकाराचा वकील अशा विविध नात्यांनीं दिसत नाहीं काय ? जें नातें जोडावें, ज्या नात्याच्या दृष्टीनें त्याच्याकडे पाहावें तसा प्रत्येक मनुष्य दिसतो हें आपण व्यवहारांत प्रत्यहीं पाहात नाहीं काय ? याच अनुभवानें प्रत्येकाचें स्वरूप पाहिलें पाहिजे.

## हुंब्यास हुंबा

मनुष्याच्या दुर्दैवाप्रमाणें कांहीं शब्दांचेंहि दुर्दैव असतें. ‘ जशास तसें ” हा शब्दप्रयोगहि यथायोग्य, अनुरूप, सापेक्ष या अर्थीं असतांना त्याचा रूढ अर्थ ठोशास ठोसा देणें, शेराला सव्वाशेर असा मारहाणीचाच समजण्यांत येतो हा त्या शब्दांचा दोष नसून लोकांचा आहे. श्रीसमर्थांनीं जशास तसें या शब्दांचा अर्थ चांगला व्यक्त केला आहे. परंतु तेथें दृष्टान्त मारहाणीचा असल्यामुळें मख्य अर्थ वाचक घेत नाहींत. दासबोध दशक १९–९ ओं० २९, ३० मध्यें हा अर्थ सांगितला आहे.

हुंब्यास हुंबा लावून द्यावा । टोणप्यास टोणपा आणावा
लौंदास पुढें उभा करावा । दुसरा लौंद ॥
घटासी आणावा धट । उद्धटासी उद्धट ॥
खटनटासी खटनट ॥ अगत्य करी ।
जैशास तैसे जेव्हां भेटे । तेव्हां मजालसी थाटे ॥ ३०

जगांतील प्रत्येक व्यवहाराचें सूक्ष्म अवलोकन केल्यास असें दिसतें कीं, जो मनुष्य, अनुरूप, यथायोग्य, नेमकें, तंतोतंत म्हणजे जशास तसें वागतो त्यालाच सुख होतें व त्याचाच उत्कर्ष होतो. पुष्कळांना अनुरूप वागतांच येत नाहीं. प्रश्न समजून नेमकें उत्तर देणें, रोग समजून घेऊन अचूक औषध देणें, परिस्थिति समजून घेऊन तंतोतंत वागण, जमा पाहून खर्च करणें, अंथरूण पाहून पाय पसरणें असा व्यवहार करणारीं माणसें एकंदरींत फार थोडीं आढळतात. त्यांच्या प्रत्येक व्यवहारांत कोठें अधिक तर कोठें उणें असें वर्तन आढळतें. जेथें रागावण्यास पाहिजे तेथें न रागावणें, शांत राहाण्याच्या प्रसंगीं क्षुब्ध होणें, औदार्यप्रसंगीं कृपण असणें, असलें वर्तन समाजांत होत असतें. बिनचूक, तंतोतंत, अनुरूप, यथायोग्य वागणें हें कार्य फार कठिण आहे. हा मोठा सूक्ष्म धर्म आहे. कार्याकार्य–व्यवस्थितीचें ज्ञान या धर्माला लागतें. हा यथायोग्य वागण्याचा, कर्मानुरूप फळ देण्याचा धर्म ईश्वरच आचरूं शकतो. ईश्वराच्या सृष्टींतील प्रत्येक गोष्ट पाहून मनुष्यानें यथायोग्य वर्तन करण्यास शिकलें पाहिजे. परंतु तसें कोणी शिकत नाहीं. यथायोग्य आचरण म्हणजे सूड नव्हे, खुनशीपणा नव्हे, पक्षपात नव्हे तर हें वागणेंच खरें न्यायाचें व समतेचें समजावें. भगवद्भक्त ईश्वराचें चिंतन करतो. म्हणून ईश्वरहि त्याचें चिंतन करतो. ईश्वराशिवाय साधू अन्य जाणत नाहींत व साधूंच्या हृदयांतच ईश्वरहि वास करीत असतो; व हेंच वर्तन योग्य समजलें पाहिजे.

## शुद्ध न्यायांतच शुद्ध दया

प्राणिमात्राला त्याच्या कर्माप्रमाणेंच फल देणें हा ईश्वरी न्याय आहे. या नियमाला अपवाद नाहीं. ईश्वर हा सर्वांना सारखा, (म्हणजे ज्याला त्याला त्याच्या त्याच्या योग्यतेप्रमाणेंच) आहे, हा ईश्वराचा नियम अविचलत व अनिवार्य आहे.

हें सर्व लक्षांत घेतल्यावर लोकमान्य टिळकांनीं गीतारहस्य पृ. ३९०–३९६ वर जें विवेचन केलें आहे तें मार्मिक व सयुक्तिक आहे असें म्हणणें भाग पडतें. सत्पुरुष हे निर्वैर, शांत, समचित्त असे असतात. त्यांचा संबंध दुर्जनांशीं न यावा हें उत्तम. स्वतः दुर्जन न होणें हें सत्पुरुषांना शक्य आहे. फार तर ते संबं-

घहि टाळतील. परंतु दुर्जनाकडून उपसर्ग पोंचूं लागला तर कसें वागावें हा प्रश्न कांहीं सोडून देण्याजोगा नाहीं. रहस्यकार म्हणतात:—

## सिद्धावस्था व व्यवहार

"दुष्टाचा प्रतिकार साधुपणानें होत असेल तर प्रथम तसाच करावा. कारण 'न पापे प्रतिपापः स्यात्', 'असाधुं साधुना जयेत्' दुसरा नकटा म्हणून आपलें नाक कापून घेऊं नये. एकानें गाय मारली म्हणून दुसऱ्यानें वासरूं मारूं नये, इत्यादि वाक्यें व न्याय तसेंच सांगतात. परंतु साधुपणानें वर्तन करून जर दुष्टाचें निवारण होत नसेल तर जशास तसें होऊन दुष्टाचें निवारण करूं नये, त्याच्या दुष्ट कृत्यास साधुपुरुषांनीं खुशाल बळी पडावें असें आमच्या ग्रंथकारांनीं कोठेंहि प्रतिपादन केलेलें नाहीं. ... .. ... ... निर्वैर व शांत अशा पुरुषाच्या आचरणासंबंधानें लोकांची सध्यां जी गैरसमजूत झालेली आहे, ती कर्मयोगमार्ग लुप्तप्राय होऊन सर्वच संसार त्याज्य मानणाऱ्या संन्यासमार्गाचें हल्लीं चोहोंकडे प्रस्थ वाढल्यामुळेंच झालेली आहे. निर्वैर म्हणजे निष्प्रतिकार झालें पाहिजे असा गीतेचा उपदेश किंवा उद्देशहि नाहीं." रहस्यकारांचें हें विवेचन त्यांच्या भूमिकेशीं तादात्म्य पावूनच ग्रहण केलें पाहिजे.

---

## परिशिष्ट २ रें

# नव्या स्मृतीचीं मूलभूत तत्त्वें

### भगवंताच्या सहज समाधीचा भंग

एका काली क्षीरसागरीं शेष-मस्तकावर भगवान् पहुडले होते. पृथ्वीचा भार धारण करणाऱ्या शेषाला भगवानाच्या मंचकाचा मान आपणास मिळाला म्हणून आनंद झाला होता. महालक्ष्मी आपल्या ऋद्धिसिद्धि इत्यादि दासींसह भगवंतांचे पाय चुरण्यांत आणि इतर सेवेंत तत्पर होती. नाभिकमलजन्य ब्रह्मदेव हा चतुर्मुखांनीं चतुर्वेदांचें पारायण करीत होता. नारदांनीं वीणेच्या मधुर आवाजांत भजन चालविलें होतें. तुंबर व किन्नर गात होते. वायु सुख-स्पर्श वाहात होता. वनस्पति प्रफुल्ल झालेल्या होत्या. आणि भगवंताच्या सहज समाधि स्थितीला सर्व तऱ्हेचें साहय व्हावें म्हणूनच जणूं पंचमहाभूतें समधात-

पणें आपआपले व्यापार करीत होतीं. भगवंताच्या सहज–समाधीचा भंग कित्येक वर्षें झालेला नव्हता. पण तो त्या दिवशीं होण्याचा योग आला तो असा:

## दुर्धर आक्रांत ! स्मृतिकारांची टोलेजंग परिषद !

काय झालें, पृथ्वीवर गडबड उडाली, उत्पात झाले, क्रांत्या झाल्या ! खूप पाऊस पडून अन्न मिळेनासें झालें! शिकलेल्यांना व बिन शिकलेल्यांना सारखीच उद्योगाची पंचाईत पडली! काय करावें, कसें करावें, या मंत्राचा जप अहर्निश होऊं लागला. जो तो युक्ति व बुद्धि सांगूं लागला. आत्मनिरीक्षण करून त्याप्रमाणें वागण्याची बुद्धि नष्ट झाली. कोणी कोणाचें ऐकेना ! मता-मतांचा गलबला झाला. व्यक्तिस्वातंत्र्याच्या व समान हक्काच्या आरोळ्या सुरू झाल्या. विद्यार्थी, स्त्रिया, समाजांतील खालचे वर्ग इत्यादि झाडून गद-गदून हलून गेले. कोणी म्हणे अस्पृश्यता नष्ट करा. कोणी म्हणे जाती मोडा. कोणी म्हणे देवांचें बंडच नष्ट करा तर कोणी म्हणूं लागले कीं, सगळे जुनें ग्रंथ, धर्मशास्त्रें इत्यादि पेटवून टाका! हा आक्रांत पाहून प्रथम सर्व स्मृति-कार,सूत्रकार, शास्त्रकार,भाष्यकारएक झाले व त्यांची टोलेजंग परिषद भरली.

## अटीतटीचे वाद व ब्रह्मदेवाचें आगमन

मीमांसा शास्त्राचे जनक जैमिनी आचार्य म्हणाले कीं, वैदिक क्रिया अपूर्वा करितां असतांना अश्रद्ध मानव त्या तशा नाहींत म्हणतो याला काय करावें? न्याय, वैशेषिक शास्त्रजनक गौतम व कणाद म्हणाले कीं,‘जैमिनी महामुने, आपली मांडणीच मुळीं सदोष आहे.’या दोघांमध्यें प्रकरण हातघाईला आलेलें पाहून आपस्तंब व बौधायन हे सर्व सूत्रकार आणि मन्वादि स्मृतिकारहि तेथें आले व म्हणाले, ‘ अहो, असे भांडतां काय? धर्मामध्यें सगळेंच अपूर्व व अदृष्ट असलें पाहिजे हें तुमचें म्हणणें बरोबर नाहीं. अहो, धर्माचा दृष्टाशीं, व्यव-हाराशीं, अभ्युदयाशीं संबंध आहे.’ हें ऐकतांच स्मृतिकार, सूत्रकार,आणि भाष्य-कार यांच्यामध्येंहि मोठ्या अटीतटीचे वाद प्रसंग उद्भवले. अहोरात्र पूर्वोत्तर पक्ष झाले पण निर्णय होईना. तेव्हां अकस्मात् ब्रह्मदेवहि अग्नि, वरुण, सोम, शंकर, यांसह तेथें येऊन उभे ठाकले. सर्व देवांचें अकस्मात् आगमन झालेलें पाहून ऋषिमुनींनीं व शास्त्रकारांनीं उठून उत्थान दिलें. अर्घ्यपाद्यांनीं पूजा केली व वादविषय समजावून दिला.

## क्षीरसागराकडे शिष्टमंडळ

सकल देवगणांसमवेत ऋषिमुनी, शास्त्रकार, स्मृतिकार इत्यादींची यथास्थित चर्चा झाली. पण देव कांहीं निर्णय देऊं शकले नाहींत. मग सर्वानुमतें असें ठरलें कीं, क्षीरसागरीं जाऊन भगवंतांना सर्व निवेदन करावें व भगवान् देतील तो निर्णय अखेरचा समजावा. त्याप्रमाणें ब्रह्मदेव हे, सकल देव, सकल सूत्रकार, भाष्यकार, स्मृतिकार, यांसह गोमातेचें रूप धारण केलेल्या पृथ्वीला पुढें करून तिच्या मागोमाग क्षीरसागरास पोंचले.'जय भगवन्, जय भगवन्' अशा आरोळ्यांनीं क्षीरसागर दणाणून गेला ! परमेश्वर भक्तवत्सल होता. इतकी गडबड स्वर्ग, मृत्यु, पाताळांत झाल्यावर आणि क्षीरसागरापर्यंत तिची गर्जना पोंचल्यानंतर सहजसमाधींतून हळूहळू उत्थान पावूं लागले.

भगवान् उत्थान पावल्यावर ऋद्धिसिद्धींनीं अमृताचा सुवर्णकलश पुढें केला. पायांखालीं सुवर्णपीठ सारिलें. इतक्यांत पृथ्वी गोरूपानें पुढें येऊन प्रणाम करती झाली. ब्रह्मदेव आले, इंद्र वरुण आले, सोम आदित्य आले, ऋषि आले, मुनी आले, सूत्रकार आले, भगवंतांनीं तो सर्व प्रकार पाहिला, स्मित हास्य केलें, आश्चर्य प्रगट केलें आणि ब्रह्मदेवांना विचारलें कीं 'हें काय प्रकरण आहे ? '

ब्रह्मदेव म्हणाले, 'भगवन्, आपण सर्वज्ञ आहांत, मी आपणांस सांगावें असें नाहीं. मृत्युलोकांतील स्थिति, लोकांच्या कल्पना, त्यांच्या भावना, त्यांचे नवे विचार, नवे आचार, यांमुळें असें कांहीं झालें आहे कीं समाजस्थिति व लोकव्यवहार चालणें कठिण झालेलें आहे. आपण आजवर जे आदेश व आज्ञा आम्हांस दिल्या, त्यांविरुद्ध हल्लीं मृत्युलोकांत बंड उद्भवलें असून, या सर्व नव्या विचारांना वाव तरी दिला पाहिजे, किंवा ते सर्व चिरडून टाकून दरारा बसविला पाहिजे! अखिल चराचराचे जनक आपण आहांत. तेव्हां नव्या विचारांचें जनकत्वहि आपणाकडेच आहे म्हणून या नास्तिकांचा व धर्मभ्रष्टांचा परामर्श घ्यावा तरी कसा, हें आम्हांला सांगा. '

श्री भगवान् म्हणाले,'अहो, ब्रह्मदेव व महादेव, सर्व देव हो ऐका.' इतके शब्द बाहेर पडतात तोंच सर्व देव कान टवकारून ऐकूं लागले. भगवान् म्हणाले, 'मृत्युलोकांतील लोक काय म्हणतात? देव व धर्म नको म्हणतात काय? त्यांचें म्हणणें तरी काय आहे?' ब्रह्मदेव म्हणाले, "छे, छे, देव नको, धर्म नको असें

म्हणणारे फार थोडे. पण आज ज्याला लोक धर्म समजतात तो धर्म नको एवढेंच त्यांचें म्हणणें. जगांत ईश्वर नाहीं असें म्हणणारा अल्प वर्ग आहे.

भगवान् म्हणाले, " अहो, प्राकृतांना चित् व जड हींच तत्त्वें कळतात, यांत आश्चर्य कसलें ? हे प्राकृत जेव्हां सुसंस्कृत होतील, तेव्हां जडाचें अस्तित्व चिदावर अवलंबून आहे, आणि सर्व जगाचें मूळ तत्त्व केवळ चिदच आहे हें त्यांच्या ध्यानांत कालानें येईल. जगांत एक चराचरव्यापी शक्ति आहे. ती शक्ति मानवांतसुद्धां आहे. ती शक्ति मानवांना निमित्त करून अघटित घटना घडवीत असते. त्या शक्तीच्या प्रेरणेनेंच व सत्तेनेंच हें जगत् चाललेलें आहे, असें यापुढें तुम्हीं सर्व सांगत चला. ईश्वराचें सगुण स्वरूप, त्याची मूर्ति, देवळें, त्याचीं नांवें, विविध अवतार, यांचें स्तोम तुम्हीं यापुढें माजवूं लागलां कीं विग्रह उत्पन्न होईल म्हणून अवतारांचा धर्म, व प्रेषितांचा धर्म, त्यांचें कार्य आतां संपलें असें सांगून अखिल मानव्याला उपकारक अशा मानवधर्माचीच तुम्हीं चर्चा करावी. मनुष्य म्हणजे काय? त्याचें शील, दानत, इभ्रत, आणि इतर सर्व सद्‌गुण–समुच्चय यांच्यावर भर देऊन **मनुष्यानें ईश्वर कसें व्हावें हें विशेषत्वानें त्यांना सांगा. फार काय ईश्वरभक्त बनण्यापेक्षां ईश्वरच व्हा असें सांगा.**

"प्रत्येक मनुष्यप्राणि हा ईश्वराचा अंश आहे आणि या विसाव्या शतकांत अनेक साधनांनीं मनुष्यप्राणि हा ज्ञानाचा म्हणजे ईश्वराचा शोध करीत आहे. तेव्हां यापुढें मनुष्यावर कृत्रिम बंधनें, कृत्रिम आज्ञा न लादतां, त्याच्या शक्तीचा, युक्तीचा व बुद्धीचा पूर्ण विकास होईल असें तत्त्वज्ञान सांगण्यास प्रारंभ करा."

भगवंताच्या मखांतून हे शब्द ऐकल्यावर स्मृतिकार चकित झाले, सूत्रकार स्तब्ध झाले आणि चातुर्वर्ण्य व्यवस्थेसंबंधानें असलेलें भगवद्‌वचन ते उच्चारूं लागले. त्यावर भगवान् म्हणाले कीं, 'होय, गीतेंत मी चातुर्वर्ण्य उत्पन्न केलें असें म्हटलेलें आहे व तें गण व कर्म हीं ध्यानांत घेऊन उत्पन्न केलें! पण, स्मृतिकार हो, जें मी उत्पन्न केलें असें म्हटलें तेथें तें अनंत कालपर्यंत तसेंच टिकेल असें मात्र म्हटलेलें नाहीं. हें जगत् मुळीं धात्वर्थदृष्टचा कुटिल गतीनेंच जाणारें आहे, तेव्हां सत्य ब्रह्माच्या आधारावर या जगांत अनेक परिवर्तनें होत असतात. म्हणून चातुर्वर्ण्य हेंहि परिवर्तनशील आहे. आजच्या जगांत हें चातुर्वर्ण्य हा

जन्मतः उच्चनीचपणा व हा स्पर्शास्पर्श उपयोगी नाहीं. आजचा स्मृतिकार हा मी सांगतों असा असला पाहिजे."

ब्रह्मदेव म्हणाले, " आजवरच्या स्मृतिकारांच्या व्याख्या रागद्वेषरहित, सर्वज्ञ, देवज्ञ, ब्रह्मनिष्ठ, असे ते असावेत अशा आहेत, आपण आतां निराळी व्याख्या सांगणार काय? "

श्रीभगवान् म्हणाले,

"आजचा स्मृतिकार हा सर्वभूतहित, समत्व दृष्टीनें पाहाणारा पाहिजे. सर्वत्र समता, निर्द्वंद्व स्थिति, आणि ब्राह्मी स्थिति हें वैदिक धर्माचें ध्येय आहे. प्रथमपासून मनुष्य हा जन्मतः श्रेष्ठ कनिष्ठ आहे. ,उच्चनीच आहे, स्पृश्यास्पृश्य आहे ही **भावना समत्वाला बाधक आहे** आज प्रत्येक व्यक्तीला लेखन,भाषण-स्वातंत्र्य आणि इतर सर्व अधिकार हे समाजानेंच दिलेले आहेत. दिलेले सर्व सामान्य वैयक्तिक अधिकार जर कुणी मूर्खपणानें घालवील तर त्याला इलाज नाहीं, पण अमुक मनुष्य अमुक ठिकाणीं जन्मला म्हणून तो खालचा आहे किंवा वरचा आहे ही भावना समूळ नष्ट झाली पाहिजे. जन्मतः सर्व माणसें सारखीं, त्यांत उच्च नाहीं, नीच नाहीं; स्पृश्य नाहीं, अस्पृश्य नाहीं. प्रत्येकानें आपल्याला जें उत्तम करतां येईल तें करून आपली योग्यता वाढवावी."

भगवंताचें हें म्हणणें संपल्यावर सर्व देवहि प्रभुमुखचंद्राकडे चातकाप्रमाणें टकमकां पाहूं लागले. भगवान् सांगत आहेत तरी काय? याचा उलगडा त्यांना होईना व असें झाल्यास सर्वत्र अनवस्था माजेल, आजवर चाललेलीं आपापलीं कर्मे सोडून लोक पाहिजे तें करूं लागतील अशी शंका ब्रह्मदेवांना आली व त्यांनीं ती पुढें मांडली.

भगवान् म्हणाले, " देवहो, स्मृतिकारहो, तुम्हीं माझ्या गीतासंदेशाकडे जरा लक्षपूर्वक पाहा. तेथें मनुष्यानें सहज कर्म, स्वभावज कर्म, स्वभावनियत कर्म करावें असेंच म्हटलेलें आहे. मनुष्य आपल्या प्रकृतीप्रमाणें व स्वभावा-प्रमाणें कर्मे करीत असतो. ज्याच्या स्वभावांत जें नाहीं व ज्याचा जो प्रकृति-धर्म नाहीं, तो त्याच्याकडून होत नाहीं. तेव्हां शरीर आहे तोंपर्यंत कर्म केलें पाहिजे, व तें आपल्या प्रकृतिधर्मानुसार जें उत्तम करतां येईल तें करून तेंच ईश्वराला अर्पण केलें पाहिजे. या विसाव्या शतकांत गंधपुष्पादि, धूपदीपादि, पूजेपेक्षां स्वकर्मकुसुमांची पूजा मला फार आवडते. म्हणूनच मानवांनीं जगाचे

व्यवहार चालण्याकरितां आणि स्वतःचें धारण पोषण होण्याकरितां अनेक कर्में करून तीं मला अर्पण करावीं असें मीं म्हटलें आहे.

स्वकर्मणा तमभ्यर्च्य सिद्धिं विंदति मानवः। गीता अ. १८ श्लो. ५६

हें व्याख्यान ऐकल्यावर भक्तिमार्गी आणि मीमांसक हे सर्व चपापले आणि, "किमिदम्, किमिदम्, कथमिदम्" असें उद्गारले. मानवाच्या प्रत्येक कर्मानें जर ईश्वर संतुष्ट होतो, तर मग स्नानसंध्या, जपतप, पूजा इत्यादींचें महत्त्व तें काय राहिलें? आणि या सर्वांपासून अपूर्वोत्पत्ति होते, असें जें आजवर आम्हीं सांगितलें त्याची वाट काय? भगवान् म्हणाले, " देवहो, मीमांसकहो, भक्तहो, ऐका, नीट ऐका, आजवर प्रत्येक कर्मांत अदृष्ट व अपूर्व आहे असें तुम्हीं सांगत होतां. पण तें काय आहे? असें कोणी विचारीत नव्हते. आतां बुद्धीला तर्काला पटणारें अपूर्व सर्वांना कळतें. कोणत्याहि कर्माचें दृष्ट व अदृष्ट फल, हें सुज्ञ मनुष्य तेव्हांच आकलन करतो. दीर्घ कालानें मिळणारें फल हें अदृष्ट व त्वरित मिळणारें फल हें दृष्ट होय. या दृष्टीनें स्नानसंध्या इत्यादींचें जसें दृष्ट व अदृष्ट फल आहे, तसेंच प्रत्येक कर्माचेंहि आहे. या तर्कशुद्ध पद्धतीनें यापुढें विचार केला पाहिजे. कोणत्याहि कर्माची पोकळ भीति, त्याची पोकळ फल-श्रुति आणि अर्थवाद हीं सर्व अडाणी समाजाकरितां असतात. लहान मुलाला जशी खाऊची लालूच दाखवून कार्यतत्पर करतात त्यांतलाच हाहि प्रकार होता. शौच, मुखमार्जन व स्नान यांतच मोठें पुण्य आहे व अपूर्व आहे असें समाजाला वाटणें हें अनिष्टच नव्हे काय? पुण्यप्रद अशीं कर्में जीं शिक्षण, रुग्णसेवा, परोपकार, दया, दाक्षिण्य, सत्शील, यांमध्येंच पुण्य नाहीं काय? तेव्हां स्मृतिकारहो, तुम्हीं आतां अभ्युदयपोषक, निश्रेयस साधक, परिणामीं हितकर आणि दृष्ट-फलदायक, असा धर्म सांगा. म्हणजे आज मृत्युलोकांत जी अनवस्था उडलेली दिसते, ती नष्ट होईल.

## नवा धर्मशास्त्रप्रणेता

सर्वज्ञकल्प आपस्तंबादि सूत्रकारांना आणि मन्वादि स्मृतिकारांना हें भगवंताचें म्हणणें पटलेंसें दिसलें. पण त्यांना अशी पंचाईत पडली कीं, आपले पूर्व ग्रंथ विद्यमान असतांना हे निराळे ग्रंथ आम्हीं कसे तयार करणार? व ते कसे सांगणार? त्यांची ही अडचण ब्रह्मदेवाचे लक्षांत आली व त्यांनीं त्यांना सांगितलें कीं, यापुढें सर्व स्मृतिकारांनीं व सूत्रकारांनीं आपलें तेज एकवटून एक नवाच

धर्मशास्त्रप्रणेता उत्पन्न करावा. जुन्या धर्मशास्त्रकर्त्यांना हें कठिण असलें तरी नव्या स्मृतिकारानें भगवंतांनीं सांगितलेल्या मूलभूत तत्त्वांवर एक स्मृति रचावी हेंच योग्य होय.

भगवान् म्हणाले, "हे कमलोद्भवा, आपली युक्ति खाशी आहे. आपण सर्वज्ञ आहांत. तेव्हां तुम्हीं सर्वांनीं स्वस्थानीं जाऊन तपश्चर्येस प्रारंभ करावा व आम्ही सांगतों त्याप्रमाणें एकवटलेल्या तेजोद्भव स्मृतिकारानें ग्रंथरचना करावी. माझ्या गीतेंतच नव्या स्मृतीचीं मूलभूत तत्त्वें आहेत. सर्व धर्मशास्त्राचें सार त्यांत आहे. सर्व विधिनिषेधांवर गीता ग्रंथ म्हणजे एक उताराच होय. त्यांत जें मीं शेवटीं अर्जुनाला सांगितलें कीं, विमृश्यैतदशेषेण यथेच्छसि तथा कुरु ॥ बाबा! या सर्वांचा विचार कर व मग इच्छेप्रमाणें वाग. स्मृतिकारहो, मनुष्याला विचार करावयास लावा. तो कसा करावा हें शिकवा. बरें वाईट त्याला सर्व समजून द्या. समजण्याची पात्रता वाढवा व मग तो पाहिजे तें करूं द्या. करतो तो भोगतो, करावें तसें भरावें, कर्म म्हटलें कीं फल आहे. फलांत आसक्ति आली कीं दुःख आहे, बंधन आहे, हें समजणारा मनुष्य उच्छृंखल होईल हें शक्य नाहीं.

एवढें बोलून भगवान् स्वस्थ बसले व सहज-समाधीमध्यें डोलूं लागले. ब्रह्मदेवांनीं,ऋषिमुनींनीं व सर्वांनीं देवाची स्तुति केली.पुष्पवर्षाव केला व सहस्र प्रणिपात करून स्वस्थानीं येण्याकरितां ते सर्व अमृत प्राशन करून परतले. देवी लक्ष्मीनें सर्वांचा परामर्श घेतला आणि नवा स्मृतिकार उत्पन्न होण्याकरितां सर्वांनीं आपआपलीं तेजें एकवटावीं असें सांगितलें. भूमातेनें, देवांनीं आणि यक्षगंधर्वांनीं माना डोलविल्या. ते सर्व तपश्चर्येकरतां स्वस्थानाप्रत गेले व त्या सर्वांनीं मिळून सर्वांच्या बुद्धीनें नवी स्मृति करण्याचें ठरविलें.

ग्रंथ संग्रहालय
क्र. 9242

REFBK-0005242

# हिंदुसमाजोद्धारक वाङ्‌मयमाला

१ हिंदु समाज समर्थ कसा होईल ?
(आवृत्ति दुसरी) किं. १ रु.

*२ आर्यसंस्कृतीचा उत्कर्षापकर्ष
(पूर्वार्ध) किं. १ रु.

*३ ब्राह्मण पोटजातींचें एकीकरण
(पूर्वार्ध व उत्तरार्ध) किं. १॥

*४ धर्मशास्त्र-मंथन
किं. १ रु.

५ ब्रह्मज्ञान व बुवाशाही
किं. १॥ रु.

पत्ता:-महादेवशास्त्री दिवेकर
मिरज S. M. C.

*हीं पुस्तकें शिल्लक नाहींत.